
शनिवार । ८ मे १९८२ । दीड रुपया

# माणूस


मुक्काम रत्नागिरी

## किनारपट्टीवरील वेठबिगार



बबन

पृष्ठ . . . ४



नारायण, सुमती, लक्ष्मी . . . शिंदे कुटुंब

**याशिवाय. . . .**

जिथे कुठे मुक्त आत्मा आढळेल
समजा की ते माझंच घर आहे
—अमृता प्रीतम

पृष्ठ . . . १८

# सप्रेम नमस्कार...

□ कर्नाटकातल्या गोकाकवाद्याच्या चळवळींना येथल्यापेक्षा महाराष्ट्रातल्या मराठी वर्तमानपत्रांनी वाजवीपेक्षा जास्त महत्त्व दिल्यामुळे महाराष्ट्रात बरेच गैरसमज झालेले दिसतात व त्याचा परिणाम म्हणून कोल्हापूरच्या आमदारांनी कोर्टात जाण्याची भाषा सुरू केली आहे, तर पुणे महानगरपालिकेने कर्नाटक सरकारचा एका ठरावाद्वारे निषेध केला आहे, म्हणून खरी परिस्थिती काय आहे याची माहिती पाठवत आहे.

१) आतापर्यंत कर्नाटकात कोणालाही आपल्या मातृभाषेत किंवा इंग्रजीत शिक्षण घेता येत होते. ते यापुढेही चालू राहणार आहे. जेथे सोय आहे तेथे बिगर कानडीयांना त्यांच्या मातृभाषेत म्हणजे मराठी, उर्दू, तेलगू, तामीळ व मल्याळममध्ये शिक्षण घेता येईल व सोय नसेल तेथे इंग्रजीतून शिक्षण घेता येईल. तेव्हा कन्नड भाषेचे शिक्षण सक्तीचे झाले तरी जे पाहिजे ते माध्यम घेऊन शिक्षण घेता येईल.

२) गोकाक समितीची सूचना एवढीच होती की (अ) मातृभाषा आणि इंग्रजीबरोबर (किंवा कोठल्याही दोन भाषांबरोबर) कन्नड भाषेचे शिक्षण तिसऱ्या इयत्तेपासून सक्तीचे होईल व (आ) आठवीपासून ज्या तीन भाषा घ्यावयाच्या त्यात कन्नडला प्रथम दर्जा देऊन कन्नडला १५० गुण असतील, दुसऱ्या भाषेला १०० गुण व तिसऱ्या भाषेला ५० गुण. म्हणजे कन्नडची सक्ती फक्त भाषाशिक्षण म्हणून होणार होती.

३) गुडूराव सरकारने प्रथम गोकाक समितीचा अहवाल नोव्हेंबर १९८१मध्ये मान्य केला होता; परंतु खासदार एफ. एम. खानासारख्या उर्दूवाद्यानी चळवळ केल्यामुळे त्याच्या अंमलबजावणीला उशीर झाला, त्यामुळे गोकाकवाद्यांनी चळवळ उभारली.

४) आता नवीन सरकारी निर्णयाप्रमाणे कन्नडचे शिक्षण तिसरीपासून एक भाषा म्हणून सक्तीचे होत आहे व आठवीपासून प्रथम दर्जाची भाषा म्हणून नव्हे तर दुसरी भाषा म्हणून. प्रथम दर्जाची भाषा आता कोणतीही घेता येईल; परंतु आता कन्नड भाषा अजिबात न शिकता शालेय शिक्षण पुरे करणे यापुढे शक्य होणार नाही. याचा अम्मल १९९० मध्ये एस. एस. सीला बसणाऱ्यावर होईल.

५) सारासार विचार केल्यावर असा निष्कर्ष काढता येईल :(अ) भाषावार प्रांतरचना झाल्यावर त्या त्या प्राताला (राज्याला) त्या राज्याच्या भाषेला प्राधान्य देणे यात काहीही चूक नाही. (आ) मी स्वतः भाषाशिक्षक असल्यामुळे हे मी ठाम म्हणू शकतो की, विद्यार्थी ज्या भाषेच्या माध्यमातून शिक्षण घेतो त्या भाषेवर त्याचे जास्त प्रभुत्व असते. त्यामुळे एखाद्या कर्नाटकातल्या मराठी भाषिकाने कन्नडचा भाषा म्हणून सक्तीने अभ्यास केल्यास त्याचे नुकसान होण्यापेक्षा फायदाच होईल.

२४ एप्रिल **श्री. मा. श्रोत्री, धारवाड**

□ २४ एप्रिल ८२ चा अंक हाती आला. 'एस्. एम्., एका संध्याकाळी, मक्काम मिरज' हा आनंद बागलकोटे यांचा लेख वाचला. एस्. एम्. नी १३ एप्रिलच्या संध्याकाळी मिरजेत राष्ट्रकल्याणाचे सूत्र सांगितले असे बागलकोटे म्हणतात; पण १६ एप्रिल ८२ च्या 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये एस. एम. सांगलीत जे बोलले त्याचे वृत्त वाचून धक्का बसला.

महाराष्ट्र टाइम्सचा सांगलीचा वार्ताहर एस. एम. पत्रकारांशी बोलताना जे म्हणाले ते लिहितो की, समान नागरी कायदा मुसलमानांना लावण्यात काही अर्थ नाही. कायद्याने प्रश्न सुटणार नाही, तर परिवर्तनाची आवश्यकता आहे.

एस. एम. यांचेबद्दल आदर बाळगूनही असे विचारावेसे वाटते की, कायद्याने प्रश्न सुटणार नाहीत, परिवर्तनाचीच आवश्यकता आहे असे आपणास मनापासून वाटत असेल तर मग राखीव जागेच्या कायद्यासाठी अस्पृश्यता निवारण कायद्यासाठी आपला पाठिंबा का ? याही कायद्यांची आवश्यकता नाही. जनतेचे प्रबोधन, परिवर्तन करावे, राखीव जागाची आवश्यकता पटवून द्यावी म्हणजे प्रश्न आपोआप सुटतील.

पण हे प्रश्न परिवर्तनाने सुटणार नाहीत हे नक्की असल्यामुळे कायदे करावे लागले. धर्मनिरपेक्षता, सेक्युलॅरिझम ( इहवाद ) मानणाऱ्या राष्ट्रांत निरनिराळ्या धर्मियांसाठी त्यांच्या सोयीनुसार निरनिराळे कायदे करणे किंवा असणे ही त्या धर्मनिरपेक्षतेची, इहवादाची आणि लोकशाहीची चेष्टा आहे. या राष्ट्रात राहणाऱ्या, या राष्ट्राचे नागरिक असणाऱ्या सर्व धर्मांच्या, पंथांच्या नागरिकांना एकच समान नागरी कायदा असायला हवा, नव्हे आवश्यकच आहे. शंभर वर्षे जरी परिवर्तन करीत बसलो तरी मुसलमानांचे


**साप्ताहिक माणूस**

**वर्ष : एकविसावे**

**अंक : एकूणपन्नासावा**

**८ मे १९८२**

**किंमत : दीड रुपया**

संपादक
**श्री. ग. माजगावकर**

सहाय्यक
**दिलीप माजगावकर**
**सौ. निर्मला पुरंदरे**

वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

परिवर्तन होईल असे वाटत नाही. मुसलमानांचे परिवर्तन आणि बाकी मंडळींना कायदा, म्हणजे हा मुसलमानाचा अनुनयच नव्हे काय?

(मी एस. एम. च्या पूर्वीच्या समाजवादी पक्षाचा, सध्या जनता पक्षाचा, समाजवादी म्हणून ओळखला जाणारा कार्यकर्ता आहे. तरीही एस. एम. चे हे विचार मनाला खटकले म्हणून हा प्रपंच !)

२४ एप्रिल अविनाश आपटे, नगर

¤ आपल्या दि. १०–४–८२ च्या अंकातील डॉ. शरद अभ्यंकर यांच्या 'अल्ट्रा–मॉडर्न बुवाबाजी – दुनिया झुकती है' या लेखाबद्दल.

त्यांनी 'श्वा युवा मघवा' या पद्धतीने सर्वच पुस्तकांना एकाच दावणीला बांधून त्यांना कंडम ठरविले आहे. ती पुस्तके का वाईट आहेत याचे काहीच विश्लेषण न करता. खरे म्हणजे डॉ. साहेब प्रयोग व प्रचीती या या तत्त्वाचे पुरस्कर्ते. त्यांचे ज्योतिषशास्त्राचे थोतांड इ. विषयावरील विचार या स्वरूपाचे होते; पण या लेखात तसे काहीच आढळले नाही. त्यांनी उल्लेख केलेली सर्वच पुस्तके त्याज्य आहेत का ? त्यातील काही पुस्तके चांगली, काही पुस्तकातील काही भाग खरा व काही चुकीचा व काही खरोखर चुकीचा असे काही संभवत नाही का ?

अशी मते सरसकट व्यक्त करीत जाणे म्हणजेसुद्धा एक प्रकारची बुवाबाजी वा अंधश्रद्धा नव्हे का ?

By the way बुवाबाजी म्हणजे नक्की काय ? माझ्या मते त्या त्या बुवाचे काही विचार त्यांचे शिष्यगणच अवास्तव स्वरूपात त्या बुवाचेच विचार म्हणून ठामपणे व कळत वा नकळत सांगत जातात व बुवाबाजी सुरू होते. अशा विचारावरून त्या बुवाला ओळखला जातो. अशी चुकीची समीकरणे बनतात. जसे गांधीवाद व सावरकरवाद हे त्याच्या शिष्यानीच जास्त बदनाम केले नाहीत का ?

श्रद्धा व अंधश्रद्धा यात नक्की फरक काय ? इतके दिवस डॉ साहेब शास्त्रीय पद्धतीने विचार व्यक्त करतात अशी आमची श्रद्धा होती; पण ती या लेखाने अंधश्रद्धा ठरली आहे. श्रद्धा व अंधश्रद्धा यातील फरक माझ्या मताने 'माझ्या श्रद्धा तेवढ्या खऱ्या श्रद्धा व लोकांच्या श्रद्धा काही वेळेला अंधश्रद्धा' असा आहे. आपल्या श्रद्धा कोणीही अंधश्रद्धा म्हणून बाळगतो का ?

२५ एप्रिल श्रीराम अनंत केतकर, दादर

## भा. क. संघटना, शहादे

¤ धुळे जिल्ह्यातील सातपुड्याच्या चौथ्या रांगेतील, अक्राणी महाल तालुक्यातील, जिल्हा परिषदेच्या बहुतांश शाळेत, इयत्ता १ली, २री व ३रीची दि. १५-१६ व १७ एप्रिल रोजी होणारी परीक्षा प्रत्यक्ष झालीच नसून शाळा, मास्तरांच्या पिशवीत भरते, तशीच परीक्षाही पिशवीतच झाली आहे आणि हजारो आदिवासी विद्यार्थी शिक्षणापासून वंचित ठेवले जात आहेत, असा गंभीर व खळबळजनक आरोप अक्राणी पंचायत समितीचे सभापती श्री. रूपसिंग पराडके आणि भारतीय कष्टकरी संघटनेचे श्री. धरमचंद चोरडिया व लक्ष्मण कदम यांनी एका पत्रकाद्वारे केला आहे.

चांदशैली माड, थावी, निगदी, खामला या चार गावी तर प्रत्यक्ष सभापती श्री. रूपसिंग पराडके यांनी पायी जाऊन परीक्षेच्या वेळी भेटी दिल्या असता तेथे शाळा नव्हती, मास्तर नव्हते, विद्यार्थी नव्हते आणि परीक्षाही नव्हती ! त्यांनी यासंबंधी गावप्रमुखाचे जबाब घेतले आणि त्यासह आपली तक्रार

पृष्ठ ३१ वर

कै. रामभाऊ म्हाळगी यांनी अथक परिश्रम करून उभा केलेला ठाण्याचा बालेकिल्ला आम्ही कायम राखणार या प्रतिज्ञेनेच भाजपचे कार्यकर्ते १९ मेच्या लोकसभा निवडणुकीसाठी कामास लागलेले आहेत.

गिरणी कामगाराचा प्रश्न हाताशी घेऊन दत्ता सामंतही याच मैदानात इंकाँशी दोन हात करीत आहेत.

जनता पक्ष गलितगात्रच !

अशा स्थितीत–

# ठाण्याची प्रतिष्ठेची निवडणूक कोण जिंकणार ?

खास वार्तापत्र .... पुढील अंकी

मुक्काम रत्नागिरी

# कायदा कोणाच्या बाजूने उभा राहणार ?

श्री. ग. मा.

१८ वर्षे नोकरी. पहाटेपासून रात्रीपर्यंत काम. दोन वेळचं जेवण फक्त. वर्षाकाठी एखादादुसरा कपडा. तोही जुनापाना. मिळाला तर मिळाला,नाही तर नाही. आणि पगार किती ? शून्य ! १८ वर्षांनंतर काम सोडताना शिल्लक एक नवा पैसाही नाही !

समुद्राकाठचे गाव. घराच्या अंगणातच विहीर. पाण्याची विपुलता; पण आठ–आठ दिवस आंघोळ नाही ! कारण भिजवायला कपडाच नाही. असलेली एकमेव चड्डी भिजवली तर ती वाळेपर्यंत लाज झाकणार कशी ?

अंगणात पाच-पंचवीस माड. यांना रोज पाणी घालायचे. विहिरीतून उपसून. रोज पन्नास बादल्या तरी उपसायच्या. शिवाय लाकूडफोड, स्वयंपाकपाणी. विहिरीचा दोरखंड ओढून-वळून तळहाताची सालंही निघालेली !

अंगावर मारहाणीच्या अनेक खुणा. आठवड्यातून एक–दोन वेळा तरी या खुणा उमटायच्याच. हाताला जी वस्तू लागेल त्यानं हा कार्यक्रम व्हायचा. लाकूड असेल तर लाकडानेसुद्धा.

तुरुंगातील मारहाणीमुळं उल्हासकर दत्त हा वेडा झाल्याचं सावरकरांनी आपल्या जन्मठेपेत लिहिलं आहे. हा रत्नागिरीजवळच्या भाटये या गावातला ' बबन ' आता उल्हासकर दत्त होण्याच्या अवस्थेलाच आलेला आहे !


आम्ही त्याला पाहिला, त्याच्याशी बोललो तेव्हा नुकतीच त्याला मारहाण झालेली असावी. त्याच्या एका हाताच्या कोपराजवळचे मास दिसत होते.

अठरा वर्षे तो मालकाकडे ही जन्मठेप भोगतोय !

अठरा की आठ ? त्याला दोन आकड्यामधला फरकच कळत नव्हता. त्याचे वयही त्याला धड सांगता येत नव्हते. मालकाच्या एका मुलाने सांगितले की, गेली अठरा वर्षे हा बबन त्यांच्याकडे कामाला आहे. बबन सांगतो सहा वर्षे. या दोन कालावधीत दहा वर्षांची तफावत आहे; पण ती ध्यानात येण्याइतकी बुद्धी, जाणीव बबनजवळ शिल्लक उरलेली नाही ! मानसिकदृष्ट्या तो ठार झालेलाच आहे. लाकडाचा एखादा ओंडका, गोठ्यातले एखादे जनावर आणि बबन मला तरी सारखेच वाटले !

बबन अगदी लहान असताना मुंबईत होता. त्याचे वडील त्याच्या लहानपणी वारले. आई त्याला टाकून दुसरीकडे निघून गेली. एकाकी अनाथ बबन वयाच्या पाचव्या-सहाव्या वर्षी रत्नागिरीजवळच्या पावसला त्याच्या नातेवाइकाकडे आला. तिथे त्याची खाण्यापिण्याची आबाळ होऊ लागल्यामुळे, वयाच्या सातव्या वर्षीच, तो, पावसहून मुंबईला पळून जाण्यासाठी, रत्नागिरीला येण्याकरिता भाटये खाडीवर आला. तिथे सध्याच्या मालकाची व बबनची गाठ पडली व मालकाने त्याला कामासाठी म्हणून घरी आणले. तेव्हापासून तो थेट आजतागायत बबन म्हणजे जन्मठेपीचा एक कैदीच !

आज त्याचे वय असावे चोवीस-पंचवीस; पण त्याने इतक्या वर्षात रत्नागिरीतल्या थेएटरात जाऊन एखादा सिनेमा काही पाहिलेला नाही. हॉटेलात काही खाल्लेले नाही.



नारळसंशोधन केंद्राचे प्रमुख
श्री. जयसिंग पाटील

वर्ण गडद काळा, बाभळीच्या सालीसारखा. रत्नागिरीच्या त्या सुप्रसिद्ध रंगाची सावलीदेखील बबनपेक्षा उजळ ठरेल ! ◻

रत्नागिरीच्या सरकारी विश्रामधामात मी उतरलो होतो. २५ एप्रिल. शिवजयंतीचा दिवस. सकाळी सगळे आटपून पाटीलसाहेबांची वाट पाहत होतो.

पाटीलसाहेब म्हणजे श्री. जयसिंग लालसिंग पाटील. येथील नारळ संशोधन केंद्राचे प्रमुख. कृषितज्ज्ञ. आदल्याच दिवशी त्यांची ओळख झाली होती व किनारपट्टीवरील वेठबिगारीबद्दल आमचे बरेच बोलणे झाले होते. ते आज आणखी काही माहिती आणून देणार होते; पण प्रत्यक्षात त्यांनी बबनचेच उदाहरण माझ्यासमोर ठेवले.

आम्ही यासंबंधी बोलत असतानाच रत्नागिरीतले आणखी एक सामाजिक कार्यकर्ते श्री. श्री. अ. देसाई तेथे आले. तासभर आणखी बोलणी-गप्पा झाल्या. मला पुण्याला यायला निघायचे होते म्हणून मी आवरासावर केली व जेवायला म्हणून आम्ही तिघेजण बाहेर पडलो.

विश्रामगृहाच्या दाराशी पुन्हा सगळ्यांचा विचार बदलला. बबनची आजच सुटका का करू नये ? शिवजयंती आहे. मुहूर्त चांगलाच आहे !

माझे पुण्याला निघणे थोडे लांबले. आम्ही तिघेजण येथील चीफ ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेट यांच्या घरी गेलो. रविवार असल्याने कोर्टाला सुट्टी होती.

पोलिसांची मदत घेऊन बबनची सुटका करावी म्हणून पोलिसांशी संपर्क साधला; पण शिवजयंतीमुळे सगळे पोलीस बंदोबस्तात अडकलेले. कोणी मोकळे नव्हते.

शेवटी तास-दोन तास धावपळीत गेल्यानंतर पाटीलसाहेबांनीच उचल खाल्ली.

स्टेशनला मालकांकडून त्यांनी बोलावून घेतले व मॅजिस्ट्रेटसमोर हजर केले. जबानी झाली. एका वेठबिगाराची तरी त्या शुभदिनी मुक्तता झाली !

◘

असे किती तरी वेठबिगार त्या टापूत असल्याचे माहितगार सांगतात. पण शासनाला याचा पत्ता नाही ! वेठबिगारी संपली असे अहवाल खुशाल वर पाठवले जातात !

गेल्याच महिन्यात घडलेले आणखी एक प्रकरण. हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने यावर अधिक काही लिहिता येत नाही. स्थानिक वृत्तपत्रात आलेल्या खालील बातमीवरून ज्याला जो काही बोध घ्यायचा असेल तो त्याने घ्यावा.

" साडेतीन वर्षांच्या वेठबिगारीतून भाटचे येथील गरीब महिलेची सुटका! "या पंचस्तंभी मथळ्याखाली रत्नागिरीहून प्रसिद्ध होणाऱ्या 'दै. रत्नभूमी' या वृत्तपत्राच्या पहिल्या पानावर दि. २८ मार्चच्या अंकात प्रसिद्ध झालेली ही बातमी अशी :

रत्नागिरी दि. २७ : (मार्च): रत्नागिरीपासून जवळच असलेल्या भाटये गावातील अब्दुल सत्ताहर हसन मुजावर याच्याकडे वेठबिगारीवर गेली साडेतीन वर्षे कामास असलेल्या सौ. लक्ष्मी नारायण शिंदे या पंचेचाळीस वर्षाच्या महिलेची रत्नागिरी पोलिसांनी मुक्तता करून तिला तिच्या नवऱ्याच्या ताब्यात दिले.

या वेठबिगार-प्रकरणी रत्नागिरी पोलीस ठाण्यात करण्यात आलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, मुजावर यांनी सौ. लक्ष्मी शिंदे हिला दरमहा पंधरा रुपये पगार व पोटास अन्न एवढ्यावर गेली साडेतीन वर्षे रात्रंदिवस राबवून घेतली. मुजावर यांनी तिला कधीही घरी पाठवले नाही. त्यामुळे लक्ष्मीबाई व तिच्या मुलांची आणि पतीची गाठभेट झाली नाही. साडेतीन वर्षांच्या काळात लक्ष्मीबाई फक्त दोन वेळाच घरी गेली; परंतु तिला ताबडतोब मुजावर यांनी घरी बोलावून घेतले. लक्ष्मीबाई मुजावरच्या कामासाठी जेव्हा बाजारात जात असे तेव्हा ती रस्त्यातच नवऱ्यास भेटे. लक्ष्मीबाई रानात मुजावर यांच्या शेळया घेऊन जावयाची, त्या वेळी तिचा नवरा तिची भेट घ्यावयाचा.

भाटचे येथील नारळ संशोधन केंद्राचे एक सहृदयी गॅझेटेड ऑफिसर (पाटीलसाहेब) भेट देण्यासाठी गेले असता त्यांना ही घटना आढळून आली. त्यांनीच या प्रकरणी लक्ष घालून लक्ष्मीचा नवरा नारायण शिंदे यास या वेठबिगारप्रकरणी शासनाकडे दाद मागण्यास सांगितले. त्याप्रमाणे नारायण शिंदे याने रत्नागिरी पोलीसठाण्यात तक्रार केल्यानंतर या वेठबिगारप्रकरणाची चौकशी सुरू झाली.

लक्ष्मीबाईच्या वेठबिगारीची कथा हृदयाला चटका लावणारी आहे. साडेतीन वर्षांत ती कधीही आपल्या मुलात गेली नाही किंवा सणासाठीही तिला घरी पाठवण्यात आले नाही ! तिच्याकडून शेतीची कामे, शेळयामेंढ्या राखणे, घरची कामे करून घेतली जात. तिला जेवणासाठी तांदूळ, डाळ, मिरची, मसाला एवढे पदार्थ देत असत. ती गोठ्यात भात शिजवून खात असे. साडेतीन वर्षात लक्ष्मीला घरी जावयास मिळाले नसल्यामुळे तिच्या मुलीचेही लग्न ठरवता आले नाही. लक्ष्मीबाईला मुजावर याने दिलेल्या पैशाची फेड किती झाली याची चौकशी करण्यासाठी लक्ष्मीबाईचा नवरा नारायण मुजावरकडे गेला असता, मुजावरच्या बायकोने त्याच्या थोबाडीत मारून त्याला हाकलून लावले !


लक्ष्मीच्या नवऱ्याने रत्नागिरी पोलीसस्टेशनला फिर्याद दिल्यावर इन्स्पेक्टर आर. एम. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सबइन्स्पेक्टर सावळे यांनी तपासाला सुरुवात केली. तेव्हा या प्रकरणी त्यांनी शासकीय शेतमजूर किमान वेतन निरीक्षक एम. एच. चव्हाण यांच्याशी संपर्क साधला. त्या दोघांनी फिर्यादी नारायण आणि त्याची बायको लक्ष्मी यांची जबानी लिहून घेतली. सौ. लक्ष्मीने दिलेल्या जबानीतील माहितीनुसार श्री. मुजावर यांनी पाचशे रुपये आगाऊ उचल म्हणून तिला दिले आणि त्यांनी लेखी करार करून, जेवून-खावून दरमहा पंधरा रुपये पगारावर तिला कामावर ठेवून घेतले. घरकामाव्यतिरिक्त तिला मुजावर यांच्याकडील शेळ्या-बकऱ्या चारण्यासाठी घेऊन जावे लागे. त्यांच्या या बंधनामुळे ती आपल्या मुलीच्या लग्नाची बोलणी करण्यासाठी घरी जाऊ शकली नाही.

त्यावर श्री. मुजावर यांनी पोलिसांकडे दिलेल्या जबानीनुसार त्यांनी लेखी करार वगैरे असा काही केला नाही. मात्र त्यांनी सातशे-आठशे रुपये त्या महिलेला कर्जाऊ दिले होते आणि ती रक्कम पगारातून ते फेडून घेत होते.

या प्रकरणी रत्नागिरी पोलिसांनी श्री. मुजावर यांच्यावर त्या महिलेला अन्यायाने घरी जाण्यास प्रतिबंध केला म्हणून गुन्हा दाखल केला आहे तर शेतमजूर किमान वेतन निरीक्षक एम. एच. चव्हाण यांनी श्री. मुजावर यांच्यावर वेठबिगारप्रतिबंधक कायद्याचा भंग केला म्हणून गुन्हा दाखल केला असून पुढील कायदेशीर कारवाई चालू आहे.

मेघा देसाई





श्री. अ. देसाई

हा विषय, बातमीचे हे कात्रण पुण्याला 'माणूस'कडे आले कसे ?

सुमारे ४–५ महिन्यांपूर्वी रत्नागिरी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष, समाजवादी-जनता पक्षाचे कार्यकर्ते श्री. भिकाजी (तात्या) चव्हाण यांचे एक पत्र 'माणूस' संपादकांकडे आले. या पत्रात श्री. चव्हाण यांनी लिहिले होते–

"किनाऱ्यावरील कामगारांच्या अनन्वित हालांसंबंधी 'माणूस' गहिवरलेला दिसत नाही. कोकणकिनाऱ्यावरील मचवा, होडी, गलबतावरील कामगार हा कोणत्या दर्जाचा माणूस आहे हे पाहाल ? कामाचे तास नाहीतच. अविश्रांत कष्ट. जेवण, मलत्याग, झोप तेथेच. पगार केव्हाही; पण निश्चित स्वरूपाचा नाही. फक्त नऊ महिनेच काम. किमान वेतन नाही. वेतन मिळाले नाही तर तक्रार नाही. कोणतीही सुलभ–भले बजबजलेली असो–अशी शासकीय यंत्रणा नाही की, ज्यायोगे या खलाशाला त्वरित काही तरी आराम मिळेल. आर्थिक पिळवणूक तर सोडाच; पण शारीरिक पिळवणूक एवढी की, 'सागरा प्राण कळवळला' असेच म्हणावे लागेल !

या कामगाराना 'धर्मांतर' काही अपरिचित नाही. देसाईचा देसावी किंवा डिसोझा होतोच; पण हिंदूंचे कुंकू, मंगळसूत्र, हुंडा लग्नात हवे. असो. खरा धर्म पोट जाळणे, याकरता शरीर विकणे. अद्याप 'ज्येष्ठ खलाशाने प्रसंग आल्यास कनिष्ठ खलाशास मारून खावे' हा संकेत आहे ! लोकशाही, मतदान...याबाबत काही सांगणे नको.

हे सारे 'कलिवर्ज्य'च प्रकरण दिसते. कार्ल मार्क्स हातोडा–कोयतामध्ये गुरफटला. त्याला गलबतावरची शिडे दिसली नाहीत. आंबेडकर, फुले...याना...? ते घाटातच अडकले !

रत्नागिरी जिल्हा परिषदेचा अध्यक्ष असताना हा प्रश्न हाती घ्यायचा असे मी ठरवले होते. कामालाही लागलो; पण जि. प. बरखास्त झाली !

आता–

आपला कोणी प्रतिनिधी आला तर त्यांना छायाचित्रे, ध्वनिफितीसह या प्रश्नावर सोदाहरण लिहिता येईल.

या प्रश्नावर एक सर्वस्पर्शी परिषद भरवावी असाही विचार आहे."

मी या पत्राला उत्तर लिहिले प्रतिनिधी येतो आहे असे कळवले; पण योजलेला प्रतिनिधी काही कारणास्तव जाऊ शकला नाही.

मार्चअखेरीस तात्या चव्हाणांच्याच वर्तुळातील एक तरुण कार्यकर्ती मेघा देसाई हिचे पुन्हा पत्र आले. मेघा ही येथील सामाजिक कार्यात नेहमी उत्साहाने भाग घेणाऱ्या श्री. अ. देसाई यांची मुलगी. मेघाने आपल्या १९ मार्चच्या पत्रात लिहिले–

आपल्या 'माणूस'करता मुद्दाम 'रत्नभूमी'चा अंक धाडला आहे. पहिल्याच पानावरील वृत्तान्त पहावा. (तो जसाचा तसा या लेखात वर मथळ्यासह दिलेला आहे.)

कोकणकिनाऱ्यावर हे भयानक, शहारे आणण्याजोगे प्रसंग नित्याचेच आहेत... चिंतनीय बाब म्हणजे धर्मांतर !

किनारपट्टीवर – विशेषत: रत्नागिरीत – मुसलमान, ख्रिश्चन वस्ती फारच. मूळचे हे भंडारी धर्मांतरित असलेले. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे जनताराजवट येऊनसुद्धा हे हळूहळू धर्मांतर होत आहे. शंकराचार्य, विश्व हिंदू परिषद, मराठा महासभा...कोणा-कोणाचेच इकडे लक्ष जात नाही !"

या पत्राला माझेकडून काही उत्तरच गेले नाही; पण पत्र व 'रत्नभूमी'चा अंक मात्र मी जपून ठेवला होता !

१८ एप्रिलला मेघाचे आणखी एक पत्र आले. त्यात तिने चिमटा घेतला होता– "माणूस १० एप्रिल ८२ ची संपपुरवणी पाहिली; पण 'माणूस'ने अजून समुद्रकिनाऱ्यावरील माणसाला अस्पर्शित का ठेवलंय हे कळत नाही !"

◻

रत्नागिरीला पोचल्यावर प्रथम मेघा देसाईच्या घरी गेलो. तिच्यापेक्षा तिचे वडील श्री. अ. देसाईच माझ्याशी अधिक बोलले. पूर्वी ते यवतमाळला होते व तेथे जवाहरलाल दर्डांशी त्यांची चकमक झालेली होती. त्यामुळे ओळखीचा प्रश्नच आला नाही. मेघाने स्थानिक वृत्तपत्रात केलेल्या लिखाणाची सर्व कात्रण मला त्यानी दाखवली. नंतर आम्ही १।२ लोकाना भेटून भाटये गावातील नारळ संशोधन केंद्रात गेलो. केंद्रप्रमुख श्री. पाटील यांच्याच प्रयत्नामुळे साडेतीन वर्षांच्या वेठबिगारीचे लक्ष्मी नारायण शिंदेचे प्रकरण प्रथम उघडकीस आलेले होते; पण पाटील नुकतेच धुळ्याहून आलेले होते. त्याना विश्रांतीची गरज होती. म्हणून दुपारी भेटायचे ठरवून आम्ही तेथून बाहेर पडलो. पाय निघत नव्हते. कारण नारळ संशोधन केंद्र म्हणजे सिमेंट कॉंक्रीटच्या केवळ ठोकळेबाज इमारती नसून तेथे साक्षात एक हिरवे स्वप्नच उमललेले दिसत होते. दापोली कृषिविद्यापीठाचे हे एक उपकेंद्र. नंतर कळले की, पाटलांनीच केंद्राचा हा कायापालट केलेला आहे. पूर्वी हे केंद्र नावापुरतेच होते. सरकारी खात्यासारखे त्याचे काम चालू असायचे; पण पाटील आले आणि केंद्राला जिवतपणा आला ! नारळाच्या जोडीने लवंग, वेलदोडे, जायफळ इत्यादी पदार्थांची लागवड पाटलांनी येथे सुरू केली व मोजून अर्धा एकरात, नेटके नियोजन केले तर चार-पाच जणांच्या कुटुंबाला पुरेसे पैसे मिळू शकतात हे दाखवून दिले. यासाठी सुरुवातीची भांडवलगुंतवणूक फार नाही. शिवाय थोडे मार्गदर्शन व शिक्षण पुरेसे आहे, त्यासाठी पदव्यांची गरज नाही, असेही पाटलानी आवर्जून सांगितले. खरच पाटील म्हणतात त्याप्रमाणे अर्धा-पाऊण एकरात कोकणकिनाऱ्यावरील शेतकरी–शेतमजुर–याना पुरेशी प्राप्ती होऊ शकत असेल तर आज मुंबईवरचा लोकसंख्येचा ताण केवढा तरी कमी होऊ शकतो ! प्रचंड लोंढे या भागातूनच शहराकडे लोटत आहेत ते यामुळे थोपवता येतील, गावोगाव स्थिरावता येतील. कोकणाचा विकास कारखानदारीपेक्षा अशा प्रकारच्या तळापासून केलेल्या कृषि–फळबागा नियोजनामुळे अधिक चांगला होऊ शकतो व असे नियोजन झाले तरच कोकणचा खऱ्या अर्थाने कॅलिफोर्निया करता येईल. पाटलानी आपली योजना केवळ कागदावर मांडून दाखवलेली नाही. नारळ केंद्राच्या ६५ एकर जमिनीवर उगवून सिद्ध केलली आहे. तिचा अधिक अभ्यास, प्रसार व्हायला हवा.

दुपारी पाटील निवांतपणे भेटले. त्यांनी वेठबिगारीतून सुटलेली लक्ष्मी आणि तिचा १६–१७ वर्षांचा मुलगा सुमती यानाही बरोबर आणले होते.

सुमती नारळ संशोधन केंद्रात कामाला आहे.

सध्या तरी या कुटुंबाचे बरे चालले असावे.

◻

### सांदिपनी गुरुकुलात

दुसऱ्या दिवशी म्हणजे २४ एप्रिलला आम्ही सगळेच सांदिपनी गुरुकुलात गेलो. आम्ही म्हणजे श्री. पाटील, श्री. भिकाजी तात्या चव्हाण, डॉ. सर्वोत्तम ठाकूर, डॉ. जाधव, भाटकर वकील, एक-दोन कार्यकर्ते व मी. रत्नागिरीपासून जवळच, देवरूख-जवळ ही संस्था उभी राहत आहे. या संस्थेचा शेतीविभाग श्री. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली साकारत आहे. जिल्हा परिषद, पक्षीय राजकारण वगैरेतून निवृत्त होऊन यापुढे श्री. भिकाजी तात्या चव्हाण सादिपनी गुरुकुलातच राहायला जाणार आहेत. डॉ. सर्वोत्तम ठाकूर हे सामाजिक कार्यात रस असणारे एक व्यवस्थापन–तज्ज्ञ. जगभर त्याचा प्रवास झालेला. विनोबांचे, जयप्रकाशजीचे सचीव म्हणूनही त्यांनी काही काळ काम केले. ही सर्व मंडळी एकत्र आली व त्यांनी हा सांदिपनीचा प्रयोग–प्रकल्प उभा करण्याचे आता चागलेच मनावर घेतलेले आहे. सुरुवातीला त्यांना एका जर्मन संस्थेकडून काही मदत मिळणार होती. त्या भरवशावर त्यांनी ५०।५२ एकर जमीन खरेदी केली. पुढे ही मदत आलीच नाही व या मंडळीची मग पैसे जमा करण्यासाठी धावाधाव सुरू झाली. जमीनमालकाने विश्वास बाळगून खरेदीचे कागद तर करून दिलेले आहेत; पण त्याला द्यायला संस्थेजवळ सध्या पैसे नाहीत, अशी सुरुवातीलाच तंगी आहे. श्री पु. ल. देशपांडे यानी दहा हजार रुपये दिले आहेत. ठाकुरांनीही स्वत.चे काही पैसे घातले आहेत. संस्थेचे काम तर सुरू झालेले आहे. कशासाठी हा प्रकल्प सुरू करण्यात आला? यामागील उद्दिष्टे, ध्येयवाद कोणता? 'सांदिपनी'चे पत्रक म्हणते—

"रत्नागिरी जिल्ह्यात पडजमिनी भरपूर. जमिनीत वाटे फार! इंच न् इंच जमीन कोर्टात आलेली आहे. जमिनीची तशी मशागत अशी कोणीच करत नाही. म्हणूनच सादिपनी गुरुकुल येथे आलेले आहे. या जमिनीवर जे उत्पन्न निघेल त्यातून लोकांच्या देणग्या फेडायच्या. त्या देणग्यांवर नवीन आश्रम, आचार्यकुले निघतील. रत्नागिरी जिल्ह्याचा कॅलिफोर्निया करण्यासाठी परिषदा भरवल्या जात आहेत; पण कॅलिफोर्नियापेक्षाही सुपीक जमीन असून काय उपयोग? कृषिकुशल कामगार कुठेच उपलब्ध नाही! शेतीचे कितीही यांत्रिकीकरण झाले तरी कुशल कामगार हा लागतोच. कुशल कामगार मिळणे अत्यंत अवघड. कृषिकुशल कामगार हा नागरी अभियांत्रिकापेक्षा जास्त उपयोगी असतो. या गुरुकुलातून ज्या वेळी मुलगा बाहेर पडेल त्या वेळी त्याचे शेतीतील ज्ञान व काम करण्याची पद्धत त्याला धन मिळवून देऊ शकेल. आंबा, कॉफी, रबर, वेलदोडे, मिरी इत्यादी कोकणात तयार होतील व परदेशी हुंडणावळ भरपूर प्रमाणात मिळू शकेल; पण कुशल कृषिकारागीर हवेत. सादिपनी गुरुकुलातील विद्यार्थी हे कुशल कारागीर होतील. ही जी बावन्न एकर जमीन घेतली आहे ही अशीच पडून आहे. जसे व्हावे तसे पीक निघत नाही. ही परित्यक्त जमीन, परित्यक्त मुलातर्फे तिची मशागत करायची. मुलांची मने व पिके सस्कारित होतील. रत्नागिरी जिल्ह्यातील इतर शेतकऱ्यांना हा आदर्श पाहावयास मिळेल. या मुलांना ते बोलावतील असा विश्वास!

या गुरुकुलात सर्व तऱ्हेची लागवड होईल. दूध उत्पादन होईल. येथे जे उत्पादन होईल त्यावरच ही मुले राहतील. उत्पादन किती करायचे, बाहेर किती पाठवायचे हे सारे गुरुकुलच ठरवणार!

काही मुलाना चर्मकला, वेतकाम, सुतारकाम, यंत्रकला शिकवण्यात येईल.

प्रत्यक्ष काम हाच येथील अभ्यासक्रम! एक उत्कृष्ट शेतकरी–कामकरी म्हणून प्रत्येक जण बाहेर पडेल!"...

¤

सध्या या गुरुकुलात १०।१२ मुले आहेत. रामकृष्ण मिशनचे एक स्वामी तेथे येऊन राहिलेले आहेत व श्री. पाटील यांनी नारळाची लागवड केलेलीच आहे. मुले आणि स्वामीजी सध्या एका खोपटात राहत आहेत.

घराचे बांधकाम सुरू आहे. सगळी कामे मुलांच्या हातून. बाहेरून कुणी मजूर, ठेकेदार आणण्याचा सध्या तरी विचार नाही.

¤

लहानपणापासून वेठबिगारीत अडकलेल्या बबनला सोडवून या सांदिपनीत आणावा, तेथील इतर मुलांबरोबर त्याला शिकवावे, थोडा रोजगार त्याला द्यावा, त्याची गेलेली शुद्धबुद्ध परत त्याला मिळवून द्यावी अशी कल्पना होती.

बबन, मी, पाटील जबानीचा वगैरे सगळा सोपस्कार उरकून मॅजिस्ट्रेट माहेबाच्या घरून ब.हेर पडलो. असे ठरले की, बबनने मालकाला सगळे सांगून दुसऱ्या दिवशी पाटलाकडे सकाळी १० वाजता यावे. पाटील लगेच त्याला सादिपनीत पाठवून द्यायची व्यवस्था करणार होते.

पण दोन दिवसानी पाटलाचे पत्र आले—

"बबन दुसऱ्या दिवशी सकाळी १० वाजता माझ्याकडे यायचा होता; परंतु तो आला नाही. सायंकाळी कळले की, त्याच दिवशी रात्री बबनला अज्ञातस्थळी रवाना केले!

मी बबनला लपवून ठेवले किंवा स्वतम केले असा पवित्रा घेऊन मालकच आता माझ्यावरच केस करण्याचा पवित्रा घेत आहेत, ...असे कळते."

¤

कायदा आता कोणाच्या बाजूने उभा राहतो ते पाहायचे! ☐


सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही.

—डॉ. य. दि. फडके

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर
प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

# केरळ

## डाव्या आघाडीचा जोर अधिक

वा. दा. रानडे

केरळमध्ये कॉंग्रेस ( आय ) च्या नेत्यांनी डाव्याच्या आघाडीतून कॉंग्रेस ( एस ) आणि केरळ कॉंग्रेस मणिगटाला फोडून त्याचे सरकार पाडले व निर्णायक बहुमत नसताही आपल्या आघाडीचे सरकार बनविले. सभापतीच्या जादा मतानेच ते काही काळ तग धरून राहिले; पण एक सभासद फुटल्यावर पराभवाची नामुष्की टाळण्यासाठी मंत्रिमंडळाने राजिनामा दिला. राष्ट्रपतीची राजवट जारी करण्यात आली आणि आता १९ मेस पश्चिम बंगाल, हरियाना व हिमाचलप्रदेशच्या बरोबरीने तेथे मुदतपूर्व निवडणुका होत आहेत. केरळमधली ही आठवी निवडणूक आहे. कॉंग्रेस ( आय ) ने जी फोडाफोड घडवून आणली ती जनतेला पसंत आहे का? ती डाव्या आघाडीलाच पुन: बहुमताने सत्तेवर आणणार की कॉंग्रेस ( आय ) नेतृत्वाखालील आघाडीकडे सत्ता सोपविणार याचा कौल तेथील मतदारानी द्यावयाचा आहे.

विसर्जित विधानसभेत तर दोन्ही आघाडया तुल्यबळ असल्याचे दिसून आलेच होते; पण प्रत्यक्षात त्या तशा आहेत का ? कोणत्या बाजचे पारडे अधिक जड आहे ? की निवडणुकीनंतरही अस्थिरता कायम राहील ? राजकीय शक्तीची जी जुळवाजुळव तेथे झाली आहे त्यावरून डाव्या आघाडीचेच पारडे अधिक जड असल्याचे दिसते. कॉंग्रेस (आय)च्या नेतृत्वाखाली संयुक्त लोकशाही आघाडी उभी राहिली असली तरी जागावाटपावरून तिच्या घटक पक्षात असंतोष आहे व तिकिटे नाकारलेले लोक बंडखोरी करून आघाडीच्या अधिकृत उमेदवारांविरुद्ध काही ठिकाणी उभे आहेत !

कॉंग्रेस (आय)च्या आघाडीत अकरा पक्ष असून त्यांच्यातील जागाचे वाटप कॉंग्रेस (आय)। ३३, कॉंग्रेस (एस) २८, मुस्लिम लीग १९, केरळ कॉंग्रेस (मणि गट) १७, बडखोर जनता गट ८, नॅशन डेमोक्रॅटिक पार्टी ८, सोशॉलिस्ट रिपब्लिकन पार्टी ६, क्रांतिकारी समाजवादी पक्ष (श्रीकांतन नायर गट) ४, एन आर. सी. पी. १ व प्र. स प १ असे आहे; पण हे वाटप अमान्य होऊन कॉंग्रेस ( आय ) मधल्याच बडखोरानी काही मतदारसंघात वेगळे अर्ज भरले केरळ कॉंग्रेस (मणि गटास) अलेप्पी जिल्ह्यात एकही जागा दिली नाही, म्हणून तेथल्या शाखेने बंड केले व हा बडखोर गट जिल्ह्यात १४ जागा लढविणार आहे. जागावाटपाबाबत क्रांतिकारी समाजवादी पक्षाच्या श्रीकांतन नायर गटाचेही समाधान झालेले नाही. हा गट आघाडीत राहणार आहे; पण निवडणुका लढविणार नाही. आघाडीने त्याला चार जागा दिल्या होत्या. त्याच्या उदासीनतेचा परिणाम या चार मतदारसंघात जाणवेल. चुरशीच्या या निवडणुकीत एकेक जागा महत्त्वाची ठरणार आहे. सोशॅलिस्ट रिपब्लिकन पार्टीचे नेते एम. के. राघवन डाव्यांच्या आघाडीत सामील झालेल्या कॉंग्रेस ( एस ) गटातर्फे उभे आहेत. या घडामोडी लक्षात घेता कॉंग्रेस (आय)ची आघाडी डाव्या आघाडीस कितपत परिणामकारक तोंड देऊ शकेल याबद्दल शंका व्यक्त केली जाते.

पश्चिम बंगाल आणि केरळ या दोन ठिकाणच्या डाव्या आघाडयातील एक फरक म्हणजे केरळमध्ये मार्क्सवाद्यांना डाव्या पक्षांशिवाय इतर पक्षावर अधिक अवलबून रहावे लागत आहे. पश्चिम बगालमध्ये एकटया मार्क्सवाद्यानी निर्णायक बहुमत मिळवले होते. केरळमध्ये त्यांचे तेवढे बळ नाही.

केरळमध्ये १९८० साली झालेल्या विधानसभा निवडणुकात मार्क्सवादी आणि कम्युनिस्ट यांच्यातील फूट दहा वर्षानंतर पुन्हा साधली गेली व डाव्या आघाडीने सत्ता मिळविली. एकूण १४० जागांमध्ये डाव्या आघाडीला ९३, इंदिरा कॉंग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त लोकशाही आघाडीस ४६ जागा मिळाल्या व एक अपक्ष निवडून आला. डाव्या आघाडीतील घटक पक्षात मार्क्सवादी ३५, अर्स कॉंग्रेस २१, कम्युनिस्ट १७, केरळ कॉंग्रेस (पिलेगट) ८, क्रांतिकारी समाजवादी पक्ष ६, मुस्लिम लीग ५, केरळ कॉंग्रेस (पिलेगट) १ याप्रमाणे जागा मिळाल्या.

डाव्या आघाडीच्या आणि त्यातील घटक पक्षांच्या बळात कसा फरक पडत गेला हे पाहण्यासाठी निवडणुकाचा तुलनात्मक विचार करायला हवा. १९५७ मध्ये कम्युनिस्टानी केरळमध्ये प्रथम सत्ता मिळविली. त्या वेळी कम्युनिस्टानी कोणाशीही आघाडी केली नाही. कम्युनिस्ट पक्षात त्या वेळी फूट नव्हती. कम्युनिस्ट ६० व कम्युनिस्टपुरस्कृत अपक्ष ५ निवडून आले होते. १९६० च्या निवडणुकीत कॉंग्रेस, प्रजासमाजवादी व मुस्लीम लीग यानी आघाडी करून बहुमत मिळविले. कम्युनिस्टांच्या जागांची संख्या ६० वरून २६ पयत घटली. १९६५ च्या निवडणुकीच्या वेळी कम्युनिस्ट पक्षात फूट पडली होती. निवडणुकासाठी मार्क्सवाद्यानी केरळ कॉंग्रेस व मुस्लीम लीगशी आघाडी केली होती. या तिन्ही पक्षांनी ७४ जागा म्हणजे बहुमत मिळविले होते; पण बहुसंख्य विजयी मार्क्सवादी तुरुंगात स्थानबद्ध होते. त्यांची मुक्तता करण्याचे केन्द्र सरकारने नाकारले. त्यामुळे त्याचे मंत्रिमंडळ बनू शकले नाही. मार्क्सवाद्यानी ४० जागा जिंकल्या होत्या. कम्युनिस्ट फक्त निम्मे निवडून आले. दोन्ही कम्युनिस्ट पक्षात मार्क्सवाद्यांचे बळ जास्त असल्याचे दिसून आले.

१९६७ च्या निवडणुकीत दोन्ही कम्युनिस्ट पक्ष पुन्हा एकत्र आले व डाव्या आघाडीने सत्ता मिळविली. एकूण १३३ जागांपैकी ११४ जागा या आघाडीने जिंकल्या. आठ निवडणुकातील डाव्या आघाडीचे हे सर्वांत मोठे यश ! १९८० च्या निवडणुकीत सत्ता मिळविली तरी आघाडीस एवढे मोठे यश मिळविता आले नाही. तिला ९३ जागा मिळाल्या. मार्क्सवाद्याना ५२ व कम्युनिस्टांना १९ जागा मिळाल्या. त्यानंतर डाव्या आघाडीत फूट पडल्याने १९७० व १९७७ च्या निवडणुकीत पुन्हा चित्र पालटले. कॉंग्रेस कम्युनिस्ट व त्यांच्या बाजूचे डावे पक्ष यांनी युती करून बिगरमार्क्सवादी आघाडी उभारली व तिने दोन्ही निवडणुकात बहुमत मिळविले. मार्क्सवाद्यांच्या नेतृत्वाखालील सयुक्त आघाडीस १९७० मध्ये ४७ व कम्युनिस्ट नेतृत्वाखालील आघाडीस ३७ जागा मिळाल्या. मार्क्सवाद्यानी ३४ आणि कम्युनिस्टानी १६ जागा मिळवल्या. १९७७ मध्ये मार्क्सवादी आघाडीची आणखी पीछेहाट होऊन तिला २९ च जागा मिळाल्या. त्यात मार्क्सवाद्याच्या १७ होत्या. कम्युनिस्टांच्या जागा २३ पर्यंत वाढल्या. मार्क्सवादी आघाडीचे हे सर्वांत मोठे अपयश होते !

१९८० च्या निवडणुकीत डाव्यातील फूट पुन्हा साधली गेल्याने त्यांच्या हाती पुन्हा सत्ता आली. त्यातील घटक पक्षांना मिळालेल्या जागाचा उल्लेख वर केलाच आहे. मार्क्सवाद्याना ३५ म्हणजे १९७० च्या निवडणुकीपेक्षा फक्त एक जागा अधिक मिळाली. १९६७ मध्ये त्यानी ५२ जागा मिळविल्या होत्या. तेवढे यश त्यांना मिळू शकले नाही. या निवडणुकीत मार्क्सवाद्यांचे बळ अधिक वाढते की कमी होते हे आता पहावयाचे. केरळ (एस) चा मोठा गट, तसेच केरळ कॉंग्रेस मणिगट इंदिरा कॉंग्रेसच्या आघाडीला या वेळी मिळाला आहे. त्यामुळे डाव्या आघाडीची ताकद १९८० पेक्षा थोडी कमी आहे. तरीही अल्प बहुमत ती मिळवू शकेल अशी आशा व्यक्त करण्यात येत आहे. कॉंग्रेस (एस) आणि केरळ कॉंग्रेस (मणिगट) या पक्षांतर करणाऱ्या संधिसाधू गटांबाबत मतदार कोणता कौल देतात यावर या निवडणुकीचे भवितव्य ठरणार आहे ☐

कामगारवृत्त

# डाककर्मचारी संघर्षाकडे

'देशके लिए करेंगे काम' हा मंत्र कानी पडताच माझी पाउले आपोआप थाबली. नायगाव येथील मुबई मराठी ग्रंथसंग्रहालयातून बाहेर पडून मी दादरस्टेशनवर जात होतो. जात असणाऱ्या रस्त्यावर मोठमोठे भगवे झेडे फडकत असल्याने मी आवाजाच्या दिशेने धावत त्या पोस्टऑफिसपाशी पोहचलो. तेथे येताच माझ्या कानी मंत्र पडला 'देशके लिए करेंगे काम!'

हल्लीच्या दिवसात कामगारचळवळीत अशा प्रकारचा मंत्र जर कोणी म्हटला तर हे म्हणणाऱ्याला कोणीही वेड्यात काढील. या कामगाराना आज झालंय तरी काय हा प्रश्न जसा सर्वसामान्यांच्या मनात येईल तसा तो या वेळी माझ्याही मनी निर्माण झाला, पण इतक्यातच आवाज आला — 'काम का लेंगे पूरा दाम!'

ज्यानी कामगारचळवळीला कर्तव्याचं आणि राष्ट्रनिष्ठेचं स्वरूप आणलं त्या भारतीय मजदूर सघाच्या कामगाराचीच तो घोषणा होती. भारतीय मजदूर संघाशी संलग्न असणाऱ्या भारतीय डाक व तार कर्मचारी संघटनेच्या कामगारांनी दि. २२ व २३ एप्रिल रोजी सपूर्ण देशभर 'धरणे' धरण्याचा जो कार्यक्रम केला त्यानिमित्त हे कामगार वरील मत्राची गर्जना करीत होते.

मुबईसारख्या ठिकाणी संघटित शक्तीच्या आधारावर अनेक कामगारपुढाऱ्यानी आपल्या कामगाराना आज अनेक सुविधा मिळवून दिल्या आहेत; परतु ज्या डाक आणि तारकर्मचाऱ्याच्या कामावर संपूर्ण देशाचा व्यवहार चालतो त्याना आतापर्यंत यापासून वचित रहावं लागलं आहे.

या डाक आणि तारखात्यात 'नॅशनल फेडरेशन ऑफ पोस्ट अ‍ॅण्ड टेलिग्राफ एम्प्लॉईज' नावाची कम्युनिस्टाची युनियन १९५४ पासून येथे आपले काम करीत आली आहे. परतु या सघटनेच्या पाठीमागे कामगाराची इतकी मोठी शक्ती असूनदेखील ही संघटना राजकीय विचारामुळे व गटबाजीमुळे कर्मचाऱ्याचे प्रश्न हवे तसे सोडवू शकली नाही. कर्मचारी कंटाळलेले असतानाच १९७७ च्या जनतालाटेत भारतीय मजदूरसघाने येथे पाय रोवला आणि पाहाता पाहाता अवघ्या दोन-तीन वर्षांच्या कालावधीत या संघाने आपली सभासदसंख्या अडीच लाखांच्या घरात नेऊन पोहोचवली!

डाक आणि तारखात्यात एकूण आठ लाख कर्मचारी काम करीत असताना एका सघटनेने अवघ्या तीन वर्षात आपली सभासदसख्या अडीच लाखाच्या घरात नेणे ही तशी सामान्य गोष्ट नाही; पण या सघटनेला विचारांचे जे अधिष्ठान आहे त्याच्या आधारावरच ही सघटना वाढली. राष्ट्रनिष्ठा, कर्तव्य, चारित्र्य आणि निष्काम सेवा या चार पक्क्या पायावर ही सघटना उभी आहे.

अशा या संघटनेने आपल्या तृतीय श्रेणी कर्मचाऱ्याच्या न्याय्य मागण्याकडे सर्वांचे लक्ष वेधण्यासाठी दोन दिवस सपूर्ण देशभर धरणे धरण्याचा कार्यक्रम केला. या कार्यक्रमाच्या निमित्ताने अतोनात कष्ट उपसणाऱ्या या कर्मचाऱ्याना शेवटी काय मिळते हे दिसून आले.

या खात्यात तीस वर्षे नोकरी करूनही कोणतीच बढती मिळत नाही; उलट त्याच ग्रेडवर शेवटी निवृत्त व्हावे लागते ही या कर्मचाऱ्याची सर्वांत मोठी शोकांतिका वाटते. या खात्यात पॅकर म्हणून जर कोणी कामाला लागला तर आयुष्यभर त्याला त्याच खात्यात काम करावे लागते. पोस्टमनला शेवटपर्यंत पोस्टमनचेच व कारकुनाला शेवटपर्यंत कारकुनीचेच काम करावे लागते. त्याला पुढची कोणतीच बढती मिळत नाही. उदाहरणार्थ, नव्याने कामास लागलेल्या पॅकरला १९६ रु. च्या मूळ वेतनापासून २३० रुपयापर्यंत १४ वर्षे पॅकर म्हणूनच काम करावे लागते. येथे त्याची १४ वर्षांची पॅकरची ग्रेड संपते; पण तरीही त्याला त्याच ग्रेडवर निवृत्त व्हावे लागते. अशा प्रकारे पोस्टमन १६ वर्षांत, तर कारकून २३ वर्षांत आपली पोस्टमनची व कारकुनीची ग्रेड संपवतो; पण शेवटी त्याला तेथेच निवृत्त व्हावे लागते.

म्हणूनच भारतीय डाक-तार कर्मचारी महासंघाने विशिष्ट कालावधी लोटल्यानंतर कर्मचाऱ्याला बढती मिळावी अशी मागणी केली आहे. त्यासाठी त्यानी १०, २० आणि ३० वर्षांचा कालावधी आखला आहे. त्यानुसार एखाद्या कर्मचाऱ्याने एका ग्रेडमध्ये पहिली दहा वर्षे पूर्ण करताच त्याला २० वर्षांच्या दुसऱ्या ग्रेडमध्ये घालावे व २० वर्षांचा कालावधी संपताच त्याला ३० वर्षांच्या तिसऱ्या ग्रेडमध्ये घालावे अशी मागणी केली आहे. म्हणजे त्या कर्मचाऱ्याला वीस वर्षे सतत काही ना काही बढती मिळत राहील असे संघटनेचे म्हणणे आहे.

डाकखात्यात काम करणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्याला आठ तास सतत मेहनत घ्यावी लागते. पोस्टमनच्या, पॅकरच्या कामाची नुसती कल्पना केली तरी आपणाला खूप काही समजते. ज्याचा लोकांशी संबंध येतो अशा कारकुनाला कामातून डोके वर काढण्यासही वेळ मिळत नाही, हे मुंबईकर येथील जी. पी. ओ. मध्ये नेहमी पहातातच. अशा या डाकखात्यातील कर्मचाऱ्याला कामाच्या बदल्यात योग्य तो लाभ मिळत नाही. म्हणूनच डाक-तार-खात्यासाठी स्वतंत्र वेज बोर्ड स्थापन करावे आणि त्यावर हायकोर्टाच्या माजी जज्जाची नेमणूक करावी अशी प्रमुख मागणी या महासंघाची आहे. कामाच्या बदल्यात योग्य तो दाम मिळत नाही म्हणून असे बोर्ड नेमण्याची मागणी केली आहे.

तसेच रोटेशनल ट्रान्सफरच्या बाबतीत जो हुकूम काढला आहे त्याने कर्मचारी हैराण होऊन कर्मचाऱ्यात असतोष पसरला आहे. हा हुकूम मागे घ्यावा ही त्याची प्रमुख मागणी आहे. या कर्मचाऱ्याला चागला युनिफॉर्म मिळत नाही, त्याना रहाण्यास घर नाही म्हणून या बाबतीतही लक्ष द्यावे ही त्याची मागणी आहे.

अशा या आवश्यक मागण्याकडेही आतापर्यंत दुर्लक्ष झाल्याने कर्मचारी आता सघर्षास तयार झाला आहे. सरकारने आणि पूर्वीच्या संघटनेने या कर्मचाऱ्याच्या मागण्यांसाठी काहीच न केल्याने सरळ मार्गाने काहीच मिळणार नाही हे आता या कर्मचाऱ्याना कळून चुकले आहे. नाक दाबल्याशिवाय तोंड उघडत नाही याची जाणीव कर्मचाऱ्यांना झाल्याने ते आता सरकारला खिंडीत पकडणार आहेत. त्यासाठी त्याची व्यूहरचना चालू आहे. धरणे ही केवळ जाग आणण्यासाठी धडक आहे. झोप उडवण्याचा मार्ग दिल्लीत असल्याने तेथूनच आदोलनास सुरुवात होण्याचा काळ आता फारसा दूर नाही!

— मोहन शं. कुलकर्णी,
घाटकोपर

अवतीभवती । शरद कृष्णन्

# निवडणुका : जनता उदासीन !

हरियाना, प. बंगाल, केरळ, हिमाचलप्रदेश येथील निवडणुका आठवडाभरावर येऊन ठेपल्या तरी या निवडणुकीची अद्यापी म्हणावी तशी हवा निर्माण झालेली नाही. राजकीय पक्षाच्या थोड्या फार हालचाली सुरू असल्या तरी जनता मात्र या निवडणुकीबाबत उदासीन दिसते. राजकीय पक्षांपैकी इंदिरा काँग्रेस, डावे कम्युनिस्ट, भाजप व लोकदल हे पक्ष या निवडणुकीबाबत विशेष जागरूक दिसतात. जनता व शरद काँग्रेस याची अवस्था अर्धांग झाल्यासारखीच आहे. एक तर त्यांना शक्तिशाली मित्रपक्ष नाही आणि या पक्षांची स्वतःची म्हणावी अशी ताकद नाही. त्यामुळे नेमके काय करावे हे या पक्षाना उमगेनासे झाले आहे. चंदीगढ येथे संयुक्त मेळावा घेऊन आघाडीचा जो प्रयत्न झाला तो लोकदलामधील मतभेद मिटल्याने फसला. त्यामुळे या निवडणुकीमध्ये जनता पक्षाला हालचाली करण्यास वाव उरला नाही. प. बंगालमध्ये इंदिरा काँग्रेसने जनता पक्षाबरोबर प्रारंभी वाटाघाटी केल्या खऱ्या; परंतु जागांच्या वाटपावरून प्रचंड मतभेद असल्याने समझौता होऊ शकला नाही. विरोधी राजकीय पक्षाची अवस्था अवघडल्यासारखी आहे. जे समझौते झाले आहेत तेही किती काळ टिकतील याची शाश्वती नाही. जनता उदासीन असल्याने, काही अंदाज बांधणेही अवघड झाले असल्याने, जनतेचा हुकमी पाठिंबा मिळेल असा एकही राजकीय पक्ष नसला तरी सर्वसाधारणपणे प. बंगाल व केरळमध्ये, डाव्या कम्युनिस्टांची सरशी होईल; तर हरियाना व हिमाचलप्रदेश येथे भारतीय जनता पक्ष व लोकदल आणि इंदिरा काँग्रेस याच्यामध्ये बऱ्यापैकी लठ्ठालठ्ठी होईल. कोणत्याही एका पक्षाला निर्विवाद बहुमत मिळणे अवघड आहे. अर्थात अशा परिस्थितीमध्ये राज्यपालांना, सर्वाधिक सदस्यसख्या असलेल्या राजकीय पक्षाला सरकार बनविण्याची संधी द्यावी लागेल आणि तशा परिस्थितीमध्ये इंदिरा काँग्रेसला प्रथम संधी मिळण्याची शक्यता आहे. सत्ता ज्याला मिळेल, त्याचा पाठपुरावा फुटकळ आमदारांकडून होईल. थोडीफार फाटाफूट होईल आणि नवीन शासनाचा कारभार सुरू होईल. लोकदलामधील फाटाफुटीमुळे इंदिरा काँग्रेस थोडीफार सुखावली होती; परंतु चौधरी चरणसिंग याच्यामागे सारा समाज उभा आहे, हे जाट पंचायत समितीने निवडणुकीमध्ये लोकदलाच्या अधिकृत चिन्हाला मते देण्याबाबत जे आदेश दिले, त्यावरून स्पष्ट झाले. लगोलग देवीकाळ यांनी आपला पवित्रा बदलून चरणसिंग याच्याबरोबर समझौता करून टाकला. हरियाना येथील उमेदवार निवडताना देवीलाल याच्या मताची योग्य ती कदर करावी लागल्याने तेथील लोकदलाच्या उमेदवाराबाबत, केवळ चरणसिंग यांचेच वर्चस्व नाही. हिमाचलप्रदेशामध्ये आपण आपल्या एकट्याच्या ताकदीवर आणि फारच झाले तर लोकदलाचे थोडेफार सहकार्य घेऊन, सत्तेवर येऊ शकू असा भाजपचा दावा आहे. इंदिरा काँग्रेस पक्षाची एकंदर अवस्था पाहता हे असंभवनीय नाही. पक्षांतर्गत तणावांचा कमालीचा उपद्रव इंदिरा काँग्रेसला होणार आहे एक तर तिकिटासाठी या पक्षाकडे प्रचंड मागणी होती आणि उमेदवाराची निवड करण्याचे काम कमालीच्या जिकिरीचे होते. कोणीही कितीही कौशल्याने हे काम केले असते तरी सर्वांना संतुष्ट करणे शक्यच नसल्याने, असंतुष्ट मंडळीचा एक मोठा गट बाकी राहणे स्वाभाविकच होते या गटाबाबत इंदिरा काँग्रेस विशेष सचित आहे. विरोधी पक्षांइतकाच या अंतर्गत विरोधकांचा आणि बंडखोरांचा इंदिरा काँग्रेसला त्रास होईल. अशा स्वरूपाची बंडखोरी अन्य पक्षांमध्ये नाही असे मुळीच नाही. हरियानामध्ये तर एका देवीराम नावाच्या सद्गृहस्थांनी एकाच वेळी, लोकदल आणि इंदिरा काँग्रेस याच्याकडे तिकिट मागितले. राजकीय नीतिमत्तेचे आणखी अवमूलन ते काय व्हायचे असते ? या निवडणुकीबाबत जनतेमध्ये जी उदासीनता आहे त्याचे चित्रण ' हिन्दू ' या दैनिकामध्ये काही सर्वसाधारण मतदाराच्या ज्या प्रतिक्रिया व्यक्त झाल्या आहेत त्यामध्ये पाहावयास मिळते. चंदीगढसारख्या शहरात व्यापार-उदीम करणाऱ्या सादकराम गिल यांना निवणुकीबाबत विचारले असता ते म्हणाले, 'आमच्या राज्याचा मुख्यमंत्री—तमाम फौजफाटा घेऊन एका रात्रीत पक्षबदल करतो आणि केवळ सत्तेसाठी हे सारे केल्याचे निर्लज्जपणे मान्य करतो, अशा ठिकाणी निवडणुका झाल्या तरी मोठे बदल होतील अशी अपेक्षा करणेच चूक आहे.' हिमाचल प्रदेशामधील सरकारी नोकरांना मतदानाबाबत विचारता त्यापैकी बहुतेक जणांनी आपण इंदिरा काँग्रेसला मतदान करू असे सांगितले आणि कारण विचारले तेव्हा आमचे सरकार आले तर केंद्रीय कर्मचाऱ्याना देण्यात आलेले चारही हप्ते आम्ही देऊ असे सांगण्यात आले. आता इंदिरा काँग्रेसने हे धोरण अवलंबिल्यावर इतर राजकीय पक्षाना त्याच वाटेने जाणे आले. हरियाना येथील प्राध्यपकाना निवडणुकीबाबत प्रतिक्रिया विचारल्या असता बहुतेकांनी आपण मतदान करू की नाही याचीच शंका व्यक्त केली, तर याच राज्यामधील मालमजुराच्या सघटनेने आपल्या सर्व सदस्यानी अवश्य मतदान करावे असे आवाहन केले आहे. अर्थात् मतदानाबाबत कमालीची उदासीनता असल्यानेच असे आवाहन करण्याची पाळी या संघटनेवर आली. मतदान किती होईल याबाबतच बहुतेक राजकीय पक्ष साशंक आहेत. तथापि, मोठ्या मुश्किलीने ५० ते ५५ टक्के मतदान होऊ शकेल असा अंदाज आहे. निवडणुकीनंतर या राज्यामधील चित्र कसे असेल हे आताच सांगता येणार नसले तरी इंदिरा काँग्रेसला या निवडणुकीमध्ये फार यश मिळू शकणार नाही. यापेक्षा जास्त काही अंदाज वर्तवण्यास कोणीही तयार नाही.

## □ माहिती व नभोवाणी मंत्रालय

इंदिराजीच्या मंत्रिमंडळामधील सुस्थिर मंत्र्यांमध्ये माहिती व नभोवाणी मंत्रालय साभाळणाऱ्या वसत साठे यांचा समावेश केला जातो. साठेसाहेब या ना त्या निमित्ताने सतत प्रकाशझोतात असतात. रंगीत दूरदर्शनाबाबत इंदिराजी फारशा अनुकूल नसूनही,

दूरदर्शनबाबतची आपली भूमिका त्यांनी मोठ्या प्रमाणात यशस्वी करून दाखवली. त्यांच्या मंत्रालयाच्या कारभाराबाबत इंदिराजी सर्वसाधारणपणे समाधानी असल्या तरी अलीकडील त्यांच्या निर्णयाबाबत त्या असंतुष्ट आहेत. अमोल पालेकर यांचे 'आक्रित' हे चित्र अमेरिकेमध्ये होणाऱ्या मराठी चित्रपट महोत्सवासाठी निवडण्यात आले होते. तथापि या चित्रपटाच्या अमेरिकेमधील प्रदर्शनाबाबत साठेसाहेब समाधानी नसल्याने या चित्राची इंग्रजी सबटायटल्स असलेली प्रत देण्याबाबत बरीच खळखळ करण्यात आली. अमोलने स्वतः या वैयक्तिक अरेरावीविरुद्ध जोरदार आवाज उठवल्याने हे प्रकरण चांगलेच तापले आणि अखेर साठेसाहेबाना माघार घ्यावी लागली. याच मंत्रालयाच्या अखत्यारीत असलेली एन. एफ. डी. सी. ही संस्था सध्या प्रचंड शक्तिशाली झाली आहे. तथापि या संस्थेच्या कारभाराबाबतही पुष्कळ नाराजी आहे. साठेसाहेब इंदिराजींच्या विशेष मर्जीतले मानले जातात. मंत्रिमंडळामध्ये आजवर अनेक बदल करण्यात आले; परंतु वसंत साठे यांच्याकडे असलेले खाते बदलले गेले नाही. इतकेच नव्हे तर त्यांचे सहकारी मंत्र्यांबरोबर मतभेद झाले तेव्हा संबंधित सहकाऱ्याची खाती बदलली गेली. या संदर्भात प्रथम राम दुलारी सिन्हा आणि नंतर कुमुद जोशी यांचा नामोल्लेख करता येईल. अगदी अलीकडीलच दूरदर्शनचे अतिरिक्त सरसंचालक व इंदिराजींच्या विशेष मर्जीमध्ये असलेले कमलेश्वर याना सेवामुक्त करण्यात आले. श्री. कमलेश्वर यांच्याबद्दल अनेकांची अनेक मते असली तरी त्यांनी 'परिक्रमा' मधून दिलेले काही कार्यक्रम खरोखरच संस्मरणीय होते. काही नर्तिकांच्या त्यांनी मुलाखती घेतल्या त्या वेळी त्यानी असा प्रश्न विचारला की, वैवाहिक आयुष्य जगणे तुम्हाला आवडेल का? ज्याना हा प्रश्न विचारण्यात आला होता त्या तिघीपैकी दोघींनी आपल्याला असे जीवन जगणे पसंत असले तरी आपल्याशी लग्न करणार कोण असा प्रतिप्रश्न विचारला आणि या तरुणीशी आपण लग्न करण्यास तयार असल्याचे ५ ते ६ तरुणानी पत्र लिहून कळवले. विशेष म्हणजे त्या तरुणीपैकी एकीचा विवाह श्री. कमलेश्वर यांच्या उपस्थितीमध्ये संपन्न झाला. श्री. कमलेश्वर यांनी एकदा परिक्रमा या कार्यक्रमात बांधकामावर मजुरी करणाऱ्या स्त्रियांच्या मुलाखती घेतल्या होत्या. त्या वेळी एका स्त्रीला त्यानी तुझ्यावर कुणा-कुणाची जबाबदारी आहे असे विचारले. त्या स्त्रीने आपल्यावर आपल्या सासूची जबाबदारी असली तरी आपण ती पार पाडू शकत नसल्याचे सांगितले. 'सासूसाठी तू काय करतेस ?' असा प्रश्न विचारल्यावर तिने सांगितले. की—मी तिला वर्षातून एकदा दोन साड्या व चोळ्या देते. तिच्या जेवणाचे काय या प्रश्नाला उत्तर देताना तिने सांगितले, माणूस एक वेळ थोडा फार उपाशी राहू शकेल परंतु वस्त्रहीन कसे राहता येईल ? श्री. कमलेश्वर हे अत्युच्च अधिकारपदावर असूनही स्वतः कार्यक्रम सादर करत. उच्चपदस्थ असूनही कार्यक्रम सादर करणारे ते एकमेव अधिकारी होते. लेखक आणि विचारवंत म्हणून त्यांचे स्थान आहेच. त्यांची अनेक मते पटण्यासारखी नाहीत. तसेच ज्या पद्धतीने ते आपले राजकीय विचारपरिवर्तन करण्यासाठी दूरदर्शनचा वापर करत होते ती पद्धतही रुचण्यासारखी नाही. तथापी काही निश्चितदृष्टी असल्याने त्यानी सादर केलेले किती तरी कार्यक्रम संस्मरणीय ठरले आहेत. कमलेश्वर दूरदर्शनवरून गेल्याचे समाधान असले तरी ज्या पद्धतीने त्यांना जावे लागले ती पद्धत अपमानास्पद मानावी लागेल. तसेच त्यांच्या जाण्यामुळे दूरदर्शनवरील परिक्रमासारख्या चांगल्या कार्यक्रमाला छेद गेल्यावाचून रहाणार नाही. कमलेश्वर याना सेवामुक्त करण्याचा हा धाडसी निर्णय अर्थातच इंदिराजींच्या कानावर घालून मगच घेण्यात आला असला तरी या निर्णयाचे पडसाद काही काळ धुमसत राहतील. माहिती व नभोवाणी मंत्रालय हे तसे महत्त्वाचे खाते नसले तरी या खात्याची एक शान असते. या खात्याला आलेली मरगळ साठेसाहेबानी दूर केली असून एक चैतन्य प्राप्त करून दिले आहे. अर्थात बाजवीपेक्षा जास्त हुशारी दाखवली तर माहितीमंत्र्याचा मजूरमंत्री होण्यास वेळ लागणार नाही !

## ☐ गावसकर म्हणतो....

इंग्लंडला जाणाऱ्या भारतीय क्रिकेटसंघावर बोर्डाच्या काही सदस्यानी टीका करावी ही गोष्ट कर्णधार सुनिल गावस्कर याला रुचलेली नाही तो म्हणतो की, अशा टीकेमुळे नवीन खेळाडू नाउमेद होतात. परिपूर्ण विचार करून निवडण्यात आलेला हा संघ कमकुवत असल्याचे मत त्याला मान्य नाही. तसेच हेतुतः आपण काही दुय्यम दर्जाच्या खेळाडूंची निवड केली हा आक्षेपही त्याला मंजूर नाही. तो म्हणतो, मी संघाचा कर्णधार असल्याने यशापयशाचा काळजीपूर्वक विचार करणारच. मुद्दाम दुय्यम खेळाडूंची निवड करून मी माझ्या पायावर धोंडा कशाला पाडून घेईन? निवडीबाबत सर्वांचे कधीच एकमत नसते; पण एकदा संघाची निवड झाल्यावर खेळाडू नाउमेद होतील अशा हालचाली कोणी करू नयेत. असे सांगून सुनिल म्हणतो, 'क्रिकेट नियामक मंडळाच्या सदस्यांनी अशी टीका करणे अत्यंत चुकीचे आहे. पूर्वी क्रिकेट प्रत्यक्ष खेळलेले सदस्य निवडसमितीवर असत. आता तशी परिस्थिती नाही. उम्रीगर, फडकर, गुलाम अहंमद, सरवटे, विजय मेहरा यासारख्या क्रिकेटच्या मैदानावर खेळलेल्या मंडळींनी केलेली निवड मी निश्चित केली असे म्हणणे वेडगळपणाचे आहे. कर्णधार या नात्याने माझा विचार जरूर घेतला गेला; परंतु निवडसमितीचा एक महत्त्वपूर्ण सदस्य असेच माझे स्थान होते. करण्यात आलेली निवड सर्व गोष्टींचा परिपूर्ण विचार करून करण्यात आली आहे.' सुनिलच्या या खुलाशानंतरही टीकेचे मोहोळ तितकेच गरम आहे. परदेशी जाणाऱ्या क्रिकेटसंघावर इतकी कडवी टीका प्रथमच करण्यात आली आणि कर्णधाराने आपल्याबरोबर येणाऱ्या साथीदाराचे इतके जोरदार समर्थनही प्रथमच केले.

अगदी अलीकडे आपले खेळाडू गल्फमध्ये क्रिकेट खेळण्यास गेले होते. त्या खेळाडूंमध्ये दिलीप वेंगसकरही होता. दिलीपची आणि कस्टम अधिकाऱ्याची बोलाचाली झाली आणि दिलीपला परत पाठवण्यात आले. या साऱ्या प्रकारात भारतीय खेळाडूंना जो दोष देण्यात आला व सर्व संघाने परत येणे जरूर होते असे सुचवण्यात आले त्यावरही सुनिलने टीका केली आहे. हा प्रसंग प्रत्यक्ष घडला त्या वेळी उपस्थित असलेल्या खेळाडूंमध्ये या प्रकाराबाबत एकमत नव्हते. खेरीज दिलीप दोषी असल्याचे काही जणाचे मत होते आणि म्हणूनच संघाने परत येण्याची जरुरी नव्हती. सुनिलच्या मताला पुष्टी देणारा अहवाल तेथील वकिलातीने पाठवला आहे. दिलीपने मराठीमध्ये काही अपशब्द वापरून कस्टम अधिकाऱ्याचा अवमान केला. आपले बोलणे त्यांना समजेल असे त्याला वाटले नाही; परंतु ज्या अधिकाऱ्याशी तो बोलत होता, तो अधिकारी मुंबईमध्ये १२–१५ वर्षे राहिलेला असल्याने त्याला आपल्याला शिवीगाळ केली जात आहे एवढे उमगले दिलीपची पाठवणी करण्यात आली या प्रकरणाचीही जास्त चर्चा करून कडवटपणा वाढवू नये अशी इच्छा सुनिलने व्यक्त केली आहे. ☐

उत्तरमीमांसा : ४९ :

स. शि. भावे

# नेतृत्वाचा किफायती व्यवसाय

काल बुद्ध-पौर्णिमा. चौदा एप्रिलला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती. १४ एप्रिल ते ७ मे या तीन आठवड्यांत बाबासाहेबाचे अनेक प्रकारे स्मरण होत आहे. त्यांच्या गुणगौरवाच्या सभा, त्यांच्या कार्यक्रमांची चर्चा करणारे परिसंवाद, दलित विद्यार्थ्यांना वह्या वगैरे वस्तूचे वाटप अशा निरनिराळ्या रूपात हे स्मरण चालू होते.

बाबासाहेबाचे असे स्मरण व्हावे हे अत्यंत उचित आहे. हिंदूएकतेची एक आणि राष्ट्रीय एकात्मतेची एक अशा दोन लाटा सध्या उसळलेल्या असताना बाबासाहेबाच्या व्यक्तित्वाचे आणि कार्याचे स्मरण दोन्ही लाटाना अंतर्मुख करण्यात यशस्वी झाले तर ते मोठेच काम होईल.

खेदाची गोष्ट अशी आहे की, दोन्ही लाटा अंतर्मुख होतील असा संभव आज दिसत नाही. हिंदूएकतेची आक्रमकता दलितांना भयावह वाटते. ही आक्रमकता कमी होण्याची चिन्हे सध्या तरी दिसत नाहीत. राष्ट्रीय एकात्मतावाल्यांची अनुनय-वृत्ती, दलितांमधील क्रांतिकारक उपक्रमशीलता मारून टाकते; पण उच्चवर्णीयांच्या अपराधी जाणिवेतून निर्माण होणारी ही अनुनय-वृत्तीही कमी होण्याची चिन्हे नाहीत.

अशा परिस्थितीत बाबासाहेबाची तीव्रतेने आठवण होते. स्वातंत्र्योत्तर काळात त्याच्यासारखा नेता दलितानाच नव्हे, तर सर्व समाजाला हवा होता–हवा आहे!

¤

स्वातंत्र्योत्तर काळात बाबासाहेबांसारखा नेता हवा होता, असे म्हणण्यात, गेली पंचवीस वर्षे त्या दृष्टीने भाकड गेली हे जसे स्पष्ट होते, तसे बाबासाहेबाचे नेतृत्व, स्वातंत्र्यपूर्व काळात तयार झालेले नेतृत्व होते, हेही सूचित होते.

स्वातंत्र्यपूर्व काळातील नेतृत्वाचे काही वेगळे आणि महत्त्वाचे पैलू आहेत. गेल्या पंचवीस वर्षांत नेतृत्वाचा जो वाढता दुष्काळ दिसून येतो त्या दुष्काळाची आणि दुष्काळजन्य विकृतीची विरोधी पार्श्वभूमी म्हणून स्वातंत्र्यपूर्व काळातील नेतृत्वाचे हे पैलू लक्षात घेणे आवश्यक आहे.

त्या नेतृत्वाचा पहिला आणि सर्वांत महत्त्वाचा घटक म्हणजे हे नेतृत्व परिणामवादी नव्हते, तर हेतुनिष्ठ होते. स्वातंत्र्य हे त्यांचे ध्येय होते. आपल्या हयातीत हे स्वातंत्र्य मिळेल असे मात्र त्याला वाटत नव्हते आणि तरीही जे आपल्या हयातीत मिळणार नाही, जे आपल्याला अनुभवायला मिळणार नाही, जे आपल्यानंतरच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या पिढीस उपलब्ध होणार आहे अशा त्या स्वातंत्र्याच्या ध्येयासाठी ते नेतृत्व, आपले आयुष्य खर्ची टाकीत होते.

परिणामवादी वागणे हे स्वभावतःच परतंत्र होते. परिणामाला अनुकूल व प्रतिकूल अशा घटकांची नोंद करून, दखल घेऊन, या वागण्याला आपले पवित्रे सतत बदलत राहावे लागते. हेतुनिष्ठ वागण्याचे सुरुवातीला एकदाच ठरते व ते नंतर कायम राहते, यामुळे तत्त्वनिष्ठेची सुसंगती हेतुनिष्ठ नेतृत्वाजवळ राहते. दृढता आणि अनुयायांसाठी विश्वसनीयता हे अशा सुसंगतीचे दृश्य आविष्कार कोणत्याही चळवळीचा पाया भक्कम करीत असतात.

तत्त्वनिष्ठेच्या सुसंगतीने या नेतृत्वाला आणखी एक महत्त्वाचा गुण लाभला होता. तो गुण म्हणजे कृतीचे खरे स्वातंत्र्य. अशी तत्त्वनिष्ठा नसेल तर ते नेतृत्व 'सोयवादी' बनते, दुसऱ्यावर अवलंबून राहते दुसऱ्याच्या मोहबतीवर आणि लहरीवर नेतृत्व हेलकावे खाते. नेतृत्वाचे नेतृत्व-पणच संपते! तत्त्वनिष्ठ नेतृत्वाला असे हेलकावे बसू शकत नाहीत. कारण ते परावलंबी नसते. असे नेतृत्व अनुयायांच्या संख्येवर अथवा प्रतिसादावर अवलंबून नसते. ते स्वतःच्या तत्त्वनिष्ठेवर सुस्थिर असते. असे नेतृत्व कधी संपत नाही. भावी काळासाठी आदर्श म्हणून ते कायम उपयोगी पडते.

स्वातंत्र्यपूर्व काळातील नेतृत्व असे हेतुनिष्ठ, तत्त्वनिष्ठ, स्वावलंबी आणि स्वतंत्र होते, म्हणूनच उपजीविका आणि नेतृत्वाचे क्षेत्र याची जोड त्या काळात जमली नव्हती. उपजीविका वेगळी. ती स्वकष्टाने किंवा इतरांनी केलेल्या स्वयंस्फूर्त साहाय्याने चालत असे. कार्याचे क्षेत्र वेगळे, एखाद्या विश्वस्त क्षेत्राप्रमाणे चालत असे.

(दुर्दैवाने 'विश्वस्त' आणि 'प्रतिष्ठान' हे शब्द आणि या संस्था आज इतक्या बदमान झाल्या आहेत की, हे शब्द जुन्या नेतृत्वासंबंधी नुसतेच वापरले तर चालू वाचकाचा गैरसमज होण्याची शक्यता आहे.)

उपजीविकेचे क्षेत्र आणि कार्यक्षेत्र याची सांगड नसल्याने नेतृत्व हा व्यवसाय झाला नव्हता. हौशी रंगभूमीच्या चळवळीसारखी जुन्या नेतृत्वाची स्थिती होती. त्यात नेतृत्वाची स्पर्धा होती. नेतृत्वाच्या बाबतीत सत्ताकांक्षा होती, सत्तास्पर्धा होती, स्पर्धेचे डावपेच होते, मुत्सद्देगिरी होती तशी काही प्रमाणात लबाडीही होती. असे दोष होते; पण आजच्यासारखी व्यावसायिकता नव्हती!

¤

आजची व्यावसायिकता कशी आहे याचे एक उदाहरण देखील पुरेसे होईल. ग्रामपंचायत सदस्य असो, महापालिका सदस्य असो, जिल्हा परिषद सदस्य असो, वा विधानसभा सदस्य असो–यांना सध्या दरमहा मानधनरूपी पगार मिळतो. हा पगार, दैनंदिन भत्ते, प्रवास, वैद्यकीय मदत, दूरभाष अशा सवलती मिळतात. या 'सॅलरीज्' आणि 'पर्कस्' सतत वाढत असतात. मुख्य म्हणजे हे सारे फायदे घेणे आणि वाढविणे याच्याच अखत्यारीत असते. म्हणजे फायदे घेणारे तेच आणि देणारेही तेच!

यामुळे मार्क्सच्या सिद्धान्ताचे गमतीदार उदाहरण येथे मिळते. समान आर्थिक हितसंबंध असलेला लोकप्रतिनिधीचा हा नवा वर्ग आज तयार झाला आहे आणि हे हित

संबंध सांभाळण्यात सर्व पक्षीयांचे एकमत असते. पगार, भत्ते, फायदे, सवलती, पेन्शन यांसारख्या बाबीत विरोधी पक्षीयानी कडवा विरोध केला आहे किंवा हे सारे घेण्याचे नाकारले आहे असे दिसत नाही. असा हा नवा वर्ग स्वत.चे वर्गीय हित सांभाळण्यातच दंग असणार ! तो साऱ्या समाजाच्या हितसबधाचा व्यापक विचार करू शकणार नाही. किंबहुना, आपल्या छोटचा वर्गाच्या हितसंबंधांचे रक्षण होईल अशा पद्धतीने समाजाच्या हितसंबंधाची माडणी व्हावी, असाच प्रयत्न हा नवा वर्ग करणार !

लोकप्रतिनिधीचा हा जो नवा वर्ग तयार झाला आहे त्याची साधारण आवक शासकीय सेवेतील पहिल्या वर्गाच्या राजपत्रित अधिकाऱ्याएवढी अथवा लष्करी सेवेतील कॅप्टनएवढी अथवा नव्याने काम सुरू केलेल्या वरिष्ठ खाजगी अधिकाऱ्याएवढी (new senior executive) असते असे म्हणता येईल. शिवाय आपली आवक किती असावी हे ठरविण्याचा अधिकार या अधिकाऱ्याजवळ नसतो, लोकप्रतिनिधीजवळ तो असतो, हा फरक आपण पाहिला आहेच.

अशी आवक आणि असा अधिकार ज्यांच्याजवळ आहे, त्यांना काही किमान पात्रता आणि किमान अनुभव असावा ही अपेक्षा वा कल्पना रास्त म्हणता येईल; पण अशी पात्रता किंवा असा अनुभव घटनेत आवश्यक केलेला नाही. आवश्यकता एकच ठेवली आहे. ती म्हणजे निवडून येणे ! साहजिकच निवडून येणे या एकाच गोष्टीकडे या लोकप्रतिनिधीचे लक्ष लागलेले असते.

निवडून येण्याची पात्रता ही अंगभूत गुणवत्तेवर अवलंबून नसते. अशी गुणवत्ता (inherent qualification) आणि निवडून येण्याची क्षमता (electability) या दोन वेगळचा गोष्टी असतात. पैकी लोकप्रतिनिधीला दुसरीची गरज असते. पहिली असली तर ठीक; पण नसली तरीही फारसे बिघडत नाही. म्हणून लोकप्रतिनिधी दुसरीची मनोभावे उपासना करतात.

लोकांचा किंवा बहुमताचा पाठिंबा मिळवावयाचा तर ते मत राजी राखले पाहिजे. राजी राखण्याचे दोन उपाय. एक तर लोकमताची भूक भागवणे, दुसरे म्हणजे त्याला अस्वस्थ न करणे. हे दोन उपाय म्हणजे नेतृत्व करणे नव्हे, असा आक्षेप घेता येईल. नेतृत्व म्हणजे मार्गदर्शन करणे, वळण लावणे, क्रांतिकारकता निर्माण करणे, गतिमानता प्रत्यक्षात आणणे हे नेतृत्वाचे अर्थ लक्षात घेतले तर बहुमत राजी राखण्याचे वर सांगितलेले उपाय हे नेतृत्वाचे आविष्कार नव्हत हे मान्य करावे लागेल.

पण आधुनिक नेतृत्व बदलले आहे आणि प्रतिनिधित्व हे रूप त्याला लाभले आहे आणि भूक भागवणे व अस्वस्थ न करणे हे प्रतिनिधित्व कायम राखण्याचे दोन उपाय आहेत. त्यातही भूक भागवणे कठीण. अन्नाची किंवा सुविधांची भूक भागवायची तर उत्पादन वाढवायला हवे. ते आपल्या हातात नाही. विचारांची सांस्कृतिक भूक भागवायची तर सांस्कृतिक गुणवत्ता हवी. ती आपल्याजवळ नाही. म्हणून मतदाराच्या विविध गरजा प्रत्यक्षात पुऱ्या करणे हे कठीण. त्याऐवजी त्याला आश्वासने देणे, त्याच्या डोळ्यांसमोर कल्पनाचित्रे आणि मोहक स्वप्ने उभे करणे सोपे. 'वैभवशाली कोकण' हे असे एक कल्पनाचित्र आणि 'भवानी तलवार' हा असा स्वप्न उभे करण्याचा एक प्रयत्न.

अर्थात्, कल्पनाचित्रे व स्वप्ने बांधणे आणि ती मतदारांना संभाव्य वाटवणे यालाही थोडी–फार कल्पनाशक्ती आणि थोडे वक्तृत्व लागते. हेही नसेल तर ? तर मग शेवटचा सोपा उपाय. तो म्हणजे सारे जसे थे राखणे. मतदाराना त्याच्या त्यांच्या श्रद्धाभावनात गुरफटवून झोपवून ठेवणे, झोपवून–गुंगवून ठेवणे.. या गुंगीतून आणि झोपेतून ते जागे होणार नाहीत अशी काळजी घेणे

लोकप्रतिनिधी व्हायचे असेल तर हा त्यातल्या त्यात सोपा मार्ग मात्र चोखाळावा लागतोच. याचा नकारात्मक भाग म्हणजे कोणत्याही नव्या, बदलाच्या गोष्टीला कडाडून विरोध करणे आणि होकारात्मक भाग म्हणजे मतदारांच्या चालू श्रद्धांचा सतत उद्घोष करणे आणि त्यात हलकेच नवी श्रद्धास्थाने मिसळून देणे.

म्हणजे असे की, शंकराचार्य, छत्रपती शिवाजीमहाराज, म. ज्योतिबा फुले, शाहूमहाराज, लोकमान्य टिळक, महर्षी वि. रा. शिंदे, स्वातंत्र्यवीर सावरकर, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या साऱ्या नेत्यांचा एकत्रित आणि समभावाने सतत गौरव-घोष करणे. त्यात समयानुकूलतेप्रमाणे इंदिराजी, संजयजी (आता अर्थात् राजीवजी) यांचाही समावेश करणे. 'एका विशाल, सनातन अन् तरीही क्रांतिकारक अशा आपल्या महान परंपरेचा' सतत उद्घोष करणे.

या बदलाच्या प्रत्येक नव्या चळवळीला देशविरोधी, परंपराविरोधी आणि समभावविरोधी म्हणून विरोध करणे. उदाहरणार्थ, अल्पसंख्याकाची मने दुखावतील म्हणून समान नागरी कायदा 'तूर्त नको' म्हणून सांगणे व लोकशाहीची खरी बूज अशा (प्रतिगामी) भावना व सवयी राखण्यात ठेवली जाते, असे घोषित करणे.

स्वप्नेदेखील ज्या त्या गटाला साजेशी देणे हे महत्त्वाचे व आवश्यक असते. कोणत्या तरी विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर याचे नाव देण्याचे एक स्वप्न उभे करायचे. त्याला विरोध केला की ते स्वप्न हुतात्मेपणाच्या पातळीला आपोआप जाऊन पोहोचते. मग ते स्वप्न खरे करण्यासाठी चळवळी, मोर्चे, तुरुंगवास, बलिदान इत्यादीची गर्दी उभारली की, दलित-मतदारांची दहा-पंधरा वर्षे त्या गदारोळात सहजपणे, उत्कटतेने आणि आनंदाने चक्क व्यतीत होतात. जशी बेळगाव सीमाभागातील मराठी मतदारांची गेली सव्वीस वर्षे 'एकीकरणसमिती'च्या उमेदवाराना पुन्हा पुन्हा नव्या आवेशाने मते देण्यात व्यतीत झाली !

पंधरा-वीस वर्षे झाली की, बहुमताच्या, रॉकेटच्या शक्तीवर सत्तेच्या अतराळात गेलेला हा प्रतिनिधीरूपी उपग्रह जनमानसाची छायाचित्रे टिपण्यास अकार्यक्षम होतो. तरीही नंतर तो भू–स्थिर कक्षेत फिरतच राहतो, पंधरा वर्षे प्रतिनिधी राहिल्यामुळे त्याला पूर्ण पेन्शन बसलेले असते. स्वतःच्या कक्षेत स्थिर झाल्यामुळे लोकमताची किंवा बहुमताची त्याला आता गरज उरलेली नसते. एखाद्या आयोगाचे अध्यक्षपद, कुलगुरुपद, छोटचा देशातील राजदूतपद, एखाद्या निमसरकारी मंडळाचे वा समितीचे अध्यक्षपद अशी पदे या स्थिर कक्षेत त्याला मिळतात,

अशी दहावीस वर्षे गेली की, हा प्रतिनिधी सत्तरीत आलेला असतो. क्रमाक्रमाने मग तो

आधी पक्षातीत आणि नंतर राजकारणातीत होतो. निरनिराळया व्यक्तींशी त्याने चागले संबंध ठेवलेले असतात. त्याच्या व्यावसायिक नीतीचा तो एक महत्त्वाचा भागच असतो, नव्हे तेच त्याचे पथ्य व पाथेय असते. अशा व्यक्ति–स्नेह–संबंधांमुळे तो या क्षेत्रातील ऋषी, महर्षी समजला जाऊ लागतो. एखादी शिक्षणसंस्था, एखादे वाचनालय अथवा एखादी साहित्यसंस्था, याच्या अध्यक्षपदी तो बसू शकतो आणि 'युक्तीच्या चार गोष्टी' सांगत राहू शकतो.

¤

येणेप्रमाणे, स्वातंत्र्यपूर्व नेतृत्व ही सुळावरली पोळी होती. निदान घरचे खाऊन लष्करच्या भाकरी भाजणे असे तिचे रूप होते. तो छन्द असे किंवा ते व्रत असे. म्हणून त्यातले हौशीपण व स्वतंत्र वृत्ती कायम असे. त्यामुळे या नेतृत्वाचा आधार वाटत असे आणि दराराही वाटत असे. आपल्यापेक्षा नेतृत्व क्रांतिकारक आहे, आपल्यात बदल व्हावा ही या नेतृत्वाची धडपड आहे, असा विश्वास या नेतृत्वाविषयी अनुयायी समाजात असे.

स्वातंत्र्योत्तरकाळात मात्र नेतृत्व हा पूर्ण वेळेचा व्यवसाय झाला आहे. त्याला पात्रतेची अट नाही; पण भरघोस मान–वेतनाचे आश्वासन आहे. त्याचे नवे शास्त्र व तंत्र विकसित झाले आहे. जाती-पोटजातीनुसार या नेतृत्व–व्यवसायाला चांगला वाव मिळतो आहे. म्हणून या जाती–पोटजाती-उप–पोटजाती कायम टिकाव्या, त्यांचे अज्ञान, त्यांची वेगळेपणाची जाणीव, त्यांची असुरक्षितता कायम राहणे ही आजच्या नेतृत्वव्यवसायाची महत्त्वाची गरज आणि आवश्यक अट आहे.

या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या कडव्या, तत्त्वनिष्ठ नेतृत्वाची आज तीव्रतेने आठवण होते आहे.

आज, बाबासाहेबाची आम्हाला तुमच्यापेक्षा जास्त आस्था आहे असे दाखविण्याची जणू चढाओढ चालली आहे. त्यांची जयंती, त्यांचे महानिर्वाण, त्यांनी केलेला बौद्धधर्माचा स्वीकार या प्रसंगी समारंभांची गर्दी उसळते. त्यांच्या प्रतिमेस हार घालताना, त्याचे पुतळे उभारताना आपली छायाचित्रे टिपली जावी याबाबत अहमहमिका चालू आहे. बाबासाहेबांची पूजा चालू आहे. त्यांच्या महानतेचा मतलबी उपयोग चालू आहे. त्यांच्या लखलखीत नेतृत्वाचे अनुकरण मात्र दिसत नाही. त्यांच्या स्वयंप्रज्ञ तेजाचे आचरण मात्र दिसत नाही !

बाबासाहेबांना दलित जातीचे व्यक्तिमत्त्व बदलायचे होते. शिक्षिताचे प्रमाण वाढावे, शिक्षणाचे प्रेम वाढावे, ज्ञानाचे मूल्य अंगी बाणावे, मनुष्य म्हणून व्यक्तिमत्वाचे तेज सर्वांगात विलसावे, या तेजाचा सर्व समाजाला विस्मय आणि धाक वाटावा, वंदनीय झाल्याने या समाजाला हटकण्याचा इतरांस धीरच होऊ नये आणि जर कोणी तसे हटकण्याचा अधोचरपणा केला तर त्याचेच हसे व्हावे— असे होताना स्वकीयाशी संघर्ष करावा लागला तरी तो करावा—हे बाबासाहेबांना अभिप्रेत होते. त्यांनी शिक्षणाचे प्रकल्प उभे केले, अर्थशास्त्रात व कायदेशास्त्रात पारगतता प्राप्त केली, चवदार तळे व काळाराममंदिर यांसारखे सत्याग्रह केले. या त्यांच्या कार्यामागे दलिताचे दलितत्व दलितानीच तेजस्वीपणाने दूर करावे ही भूमिका होती.

तथापि, आजच्या नेतृत्व-व्यवसायाला बाबासाहेबांची ही निष्ठा परवडणारी नाही. दलितांच्या वेगवेगळया जाती-पोटजाती मोडणे आणि सारे दलित एक होणे हेही नव्या व्यावसायिक नेतृत्वाला परवडणारे नाही. आजच्या या व्यवसायात जाती-पोटजातींना पासपोर्ट व व्हिसा याचे महत्त्व आले आहे. हे पासपोर्ट परत करणे अथवा झुगारून देणे हे परवडणारे नाही.

उमेदवारीची तिकिटे जातवार वाटली जातात. पदे जातवारीने फिरवितात. मंत्रिमंडळाची रचना जातवार होते. अर्थात्, आपली जात आणि पोटजात कायम राहिली पाहिजे आणि आपण आपल्या पोटजातीचे एकमेव नेते असायला हवे. अर्थात्, आपल्याखेरीज आपली जात मागासलेली राहायला हवी. तेव्हा, जातीने तेजस्वी होणे, तेजस्वी होऊन जातीच्या मर्यादांतून जातीने बाहेर येणे या गोष्टी त्याज्य आहेत. कारण त्या व्यवसायाच्या यशाला मारक आहेत. म्हणजे त्यांच्या घोषणा- वगैरे करायच्याच. कारण कल्पनाचित्रे व स्वप्ने म्हणून त्याची आवश्यकता आहे. पण स्वप्ने ही शेवटपर्यंत स्वप्नेच राहतील याची काळजी घेणे हे व्यवहारदक्ष, व्यावसायिक या नात्याने नव्या नेतृत्वाचे कर्तव्य ठरते.

ही नवी मंडळी आता अशी पूर्ण वेळ, पूर्ण अर्थाने व्यावसायिक झाली आहे. त्यांच्या या नव्या व्यवसायासाठी आवश्यक ते प्रशिक्षण हवे अशी नवी गरज निर्माण झाली आहे. 'गरजपूर्तीच्या' धोरणाप्रमाणे असे अभ्यासक्रम सुरू करण्याचा मनसुबादेखील काही शिक्षणसंस्थानी प्रकट केला आहे. अशा रीतीने या नव्या व्यवसायाची शास्त्र, तंत्र, प्रशिक्षण आणि उपयोजन अशी आधुनिक चौकट तयार झाली आहे. या चौकटीच्या निकषावर तपासले तर आजचे आपले नेतृत्व या व्यावसायिक निकषावर पहिल्या दर्जाचे ठरेल याविषयी शंका वाटत नाही.

¤

व्यवसायाचे आधुनिक तंत्र या व्यवसायाने कसे आत्मसात् केले आहे त्याचे एक लक्षण शेवटी देतो. खरे म्हणजे या लक्षणाची स्वतंत्र मीमांसा केव्हा तरी करायला हवी आहे. येथे फक्त थोडासा उल्लेख करतो.

हे नवे तंत्र म्हणजे मुत्सद्देगिरीचे तंत्र. एकाच क्षेत्रातील कंपन्या हे तंत्र परस्परविरोधी वापरीत असतात. म्हणजे एक तर, दुसऱ्या कंपनीतील कुशल अधिकारी आपण गटवायचा किंवा प्रतिस्पर्धी कंपनीत राहूनच त्याने, आपल्या कंपनीचे काम म्हणून, स्वत:ची ती कंपनी हलके हलके मारायची. कंपनीचे दिवाळे काढून स्वत: व्यक्तिश: गबर होणारे मॅनेजिंग पार्टनर्स असतात ना, तसेच हे !

तर आज राजकारणी प्रतिनिधित्वाच्या व्यवसायातही अशी चाणाक्ष फोडाफोडी चालू आहे. या चाणाक्षपणामुळे जनता पक्षाच्या चिरफळया झाल्या. याच चाणाक्षपणामुळे दलित चळवळीचे गेली पंचवीस वर्षे, तुकडे तुकडे होऊन राहिलेले आहेत !

आपले अनुयायीदेखील व्यावसायिक झाले हे पाहून बाबासाहेबाना आज काय वाटत असेल ?

□

## श्यामचा संसार (कथा ३४ वी)

फिरोझ रानडे

# श्यामला पहिले प्रेम-पत्र आले, त्याची कथा

एखाद्या माणसाचे व आपले काही खास असे कारण नसताना जमत नाही बघा. काही तरी त्याच्याबद्दल आपल्या मनात अढी बसते व ती निघता निघत नाही. तो चांगला असतो - आपण चागले असतो. त्या माणसासारख्या दुसऱ्या माणसाशी आपले जमते; पण त्या माणसाशी काही केल्या जमत नाही. त्यामागच्या कारणांची मीमांसा करण्याजोगे हे स्थळ असले तरी काळ नाही. मीमासा वगैरे गोष्टी टिळक–आगरकरांच्या जमान्यात करत असत. त्या अर्थी हा काळ मीमासा वगैरे करण्याचा नव्हे, असे म्हटले एवढेच.

जसे माणसाच्या बाबतीत होते, तसेच गावाबाबत पण होते. एखाद्या गावाबाबत आपल्याला तिटकारा असतो. एखाद्या गावाबद्दल आपल्याला भीती असते. आता ती गावे बाकीच्या गावांसारखीच असतात. तेथे बस–अड्डे असतात, रेल्वेची स्थानके असतात. नवीन माणूस पाहून त्याना लुबाडणारे हमाल असतात, स्कुटरवाले असतात, टॅक्सीवाले असतात. बाकीच्या गावासारखेच या गावात कोणी कांग्रेस अर्थात आय्चे–पुढारी असतात. त्याना खाली खेचण्याकरता खटपट करणारे कांग्रेस–आयचेच दुसरे पुढारी असतात! काही ब्राह्मण पुढारी भाजपचे काम करत असतात व समाजवादी निष्पाप जीवन जगत असतात!

ह्या गावातूनसुद्धा नगरपालिका नगरपालनाचे काम करत नाहीत व ह्या गावातून पाण्याचा तुटवडा असतो. ह्या गावातूनसुद्धा चढ्या किमतीने साखर विकली जात असते. असे असूनही सगळी गावे सारखी वाटत नाहीत. काही आवडतात तर काही नावडतात.

पुण्याबाबत श्यामच्या मनात अशीच लहानपणापासून नावड निर्माण झाली होती. पुणे व पुण्याचे लोक हा नॉन्–पुण्याच्या लोकांचा नेहमीचा तोंडी लावण्याचा विषय. अशी पुण्याच्या लोकावर झोड उठत असली की, श्याम त्यात मोठ्या हिरीरीने भाग घेत असे. त्यातल्या त्यात सदाशिवपेठ हा विषय असला की त्याच्या हिरीरीला जास्तच जोर येत असे.

श्याम प्रथम पुण्याला आला त्या वेळी सात-आठ वर्षांचा होता. त्या वेळी तो खानदेशातल्या 'मुकुन्द काजी' प्रसिद्ध एरंडोल ह्या गावी रहात होता. एरंडोल ह्या विचित्र नावाच्या गावाच्या फक्त नावाकरता श्यामने आपल्या वडिलाचे हातचा खरपूस मार खाल्ला होता. पुष्कळसे जुने खाण्याचे पदार्थ आजकालच्या मुलाना माहीत नसतात. जसे मांडे हा एक खाण्याचा पदार्थ आहे, तसा खरपूस मार हा सुद्धा खाण्याचा पदार्थ आहे हेही माहीत नसते! खाण्याच्या पुष्कळ पदार्थांच्या बाबतीत अशी पिढी–भगदाडं (Generation–gap) पडत चालली आहेत.

श्यामचे वडील त्या वेळच्या मुंबई सरकारच्या कोणत्या तरी खात्यात अधिकारी होते. मोरारजीभाईंनी मुंबईच्या द्विभाषिकाचा प्रयोग करण्याआधी ब्रिटिश सरकारने त्रिभाषिकाचा प्रयोग केला होता. त्या प्रयोगानुसार गुजराथचा काही भाग, मराठी काही भाग व कानडी काही भाग मिळून त्या वेळचा मुंबई प्रात होत असे!

सुरतहून श्यामच्या वडिलाची एरंडोलला बदली झाली होती त्या वेळची गोष्ट. सुरत ते एरंडोल असे त्याचे सगळे कुटुंब आगगाडीने प्रवास करत होते. आगगाडीने जाणार व तेही एरंडोल नावाच्या गावी जाणार, ह्या कल्पनेने श्यामला व त्याच्या भावा–बहिणीच्या बाल-बुद्धीला मोठी मजा वाटत होती. त्याना कळायला लागल्यापासून हा त्यांचा आगगाडीचा पहिलाच प्रवास होता!

बोलता-बोलता त्या भावंडात विषय निघाला की, आपण जातो आहोत त्या गावाचे नक्की नाव काय आहे? कोणी म्हणाले, नुसते 'एरंडो' असे आहे. कोणी म्हणाले 'एरंडोल', कुणी म्हणाले 'एरंडोक', कुणी म्हणाले, 'एरंडोण'. थोडक्यात म्हणजे तो वाद रंगला. सगळ्याचे एकमत 'एरंडो' पर्यंत होते; पण त्याच्यापुढे 'ण', 'ली', 'ल' की 'क'? असा कम्युनिस्ट पार्टीच्या सभेत ठरावातल्या एकेका शब्दाकरता वाद माजतो तसा वाद माजला. शेवटी वडिलांना विचारून हा वाद मिटवावा असे ठरले. श्याम हा वडिलांचा लाडका व त्यातल्या त्यात आगाऊ, त्यामुळे ते काम श्यामवर सोपवण्यात आले.

"दादा, आपण ज्या गावाला जातो आहोत त्या गावाचे नाव काय हो?" श्याम दादांजवळ जाऊन विचारता झाला. दादा सिगारेट पीत होते. त्यानी तोंडातल्या तोंडात 'एरंडो ...'
असे काही तरी म्हटले; पण त्याने श्यामचा व त्याच्या बंधु-भगिनीचा प्रश्न मिटत नव्हता. 'एरंडो' पर्यंत तर सगळ्याचे एकमत होते; पण त्याच्या पुढे काय? ल, म, ण की आणखी काही? श्यामने आपल्या बहीण-भावांकडे 'आता काय करू?' या प्रश्नार्थक दृष्टीने पाहिले. त्यानी त्याला परत विचार म्हणून खुणावले. श्यामची वृत्तीही लहानपणापासून पडलेला प्रश्न सुटलाच पाहिजे अशी होती. म्हणून त्याने परत विचारले, 'दादा, सांगा ना आपण कुठे जातो आहोत ते?' 'अरे, सागितले ना एकदा एरंडो... म्हणून.' दादा तोंडातली सिगरेट काही काढेनात व श्यामचा प्रश्न काही मिटेना. परत 'काय करावे?' असा श्यामने बहीण-भावाना खुणेने प्रश्न केला. त्यानी त्याला परत विचारण्याकरता खूण केली. श्यामला परत उत्साह आला व त्याने विचारले, 'सबंध नाव सांगा ना दादा.'

आता मात्र दादा कावले. त्यानी हातातली सिगारेट खिडकीतून बाहेर टाकली व मोकळ्या झालेल्या त्या हाताने श्यामला बडवत म्हणाले, 'शमर वेळा सांगितले 'एरंडोल एरंडोल म्हणून; तरी वर ह्याचे आहेच नाव काय आहे म्हणून.' दादा एरंडोलातल्या 'ल' वर जोर देत होते, त्याच वेळी श्यामला मार देण्यावरही जोर देत होते. सिंहगड ताब्यात

आल्यावर शिवाजीमहाराजाना जशी 'सिंह गेला तरी गड आला' अशी आनंदमय भावना झाली होती, तशीच श्यामच्या मनात पण झाली. मार बसला; पण दादांकडून सबंध नाव काय आहे हे तर काढून घेतले असा त्याच्या चेहऱ्यावर आनंद दिसू लागला. हे बघून 'काय बेरड कारटं आहे पहा! एवढा मार खाल्ला पण हसतोय वर!' असे भाव दादांच्या चेहऱ्यावर निर्माण झाले.

श्याम प्रथम पुण्याला आला तो त्याच्या मावसभावाच्या लग्नाकरता म्हणून. त्या वेळी अशी मावसभावांच्या लग्नाकरता, पुतण्या-भाच्यांच्या मुंजीकरता कुठूनच्या कुठे जाण्याची पद्धत होती व तेही चांगले १५–२० दिवस राहाण्याकरता! त्या पद्धतीला अनुसरून दादा सोडून बाकी सगळे लोक पुण्याला कल्याणमार्गे आले होते. पुण्याचे हे एक वैशिष्टय आहे. बाकी गावाला जाण्याचा एकच मार्ग असतो; पण पुण्याला दोन मार्गांनी जाता येतं. एक 'कल्याणमार्गे व एक 'घोडमार्गे.' श्यामने मात्र पुण्याला 'घोड मार्गे' जाणारे कुणी व कधी पाहिले नव्हते. मग तो मार्ग कशाकरता काढला असेल बुवा, असा त्याला बाळपणापासून प्रश्न पडला होता व जीवनाच्या कित्येक 'मार्गां'बाबत पडलेले प्रश्न सुटले असले तरी 'घोंड–मार्ग' कोणाकरता हा प्रश्न मात्र असुटित राहिला होता.

श्यामची मावस-नातेवाईक मंडळी खास पुण्याची, सदाशिवपेठेतली! साहेबासारखी गोरीपान, घारी व भुरे केस असलेली व स्पष्ट उच्चार करून बोलणारी! श्याम व मंडळी नावाने एकारात कोकणस्थ असली तरी वर्णाने अकारान्त देशस्थासारखी होती. आता तर काय त्यावर एरंडोली वा खान-देशी धुळीचे आवरण चढले होते. त्याचे मावसे म्हणजे मावशीचे यजमान तर काय लख्ख गोरेपान, उंच व निळेशार डोळे अस-लेले असे होते. साहेबाचे कपडे घातले की अगदी लॉर्ड फॉकलंड वाटत असत! लॉर्ड 'फॉकलंड' हा खानदेशी शब्दप्रयोग! पण आता त्यानी नोकरी सोडल्यापासून टिळकां-सारखी पगडी, धोतर व वर पारशी लांब कोट असा पेहराव सुरू केला होता. त्यातही ते फार रुबाबदार दिसत व त्याचा फारच दरारा वाटे!

त्याची शिस्तही मोठी कडक होती. ५॥–६ ला सगळी मंडळी उठत व चहा वा दूध पिऊन झाला की मोठी माणसे आपआपल्या कामाला लागत, अशी लग्ने–मुंजी बहुधा उन्हाळयाच्या सुट्टीत असल्यामुळे मुलांना शाळा नसत. श्यामच्या मोठया मावसबहि-णींना गाणे शिकवण्याकरता म्हणून कोणी गायनमास्तर ठेवले होते. ते आले की, मावसे सगळया मुलांना गायनाला बसवत. प्रथम एक पाय उघडा करून बसावयाचे व समोर येणाऱ्या मांडीवर एक एक बोट मारत थाप मारावयाची व 'छळितोसी...का...असा... राजसा...! असे सर्व सख्ख्या व मावसबहीण-भावंडांनी मंगेशकर बहीण–भाऊ 'प्राण... तळमळला' म्हणतात त्या पद्धतीने म्हणून, गायनमास्तराचा प्राण तळमळून टाकाव-याचा! अशी पद्धत होती.

वर्णभेद वगैरे इंग्लंडमध्ये पहिल्यापासून आहे व आता इनेक पॉवेलने वगैरे त्याला जोर आणला आहे म्हणतात; पण श्यामने विलायतला न जाता हा वर्णभेद वयाच्या सात–आठ वर्षापासून स्वत: अनुभवला आहे. त्याच्या मावस भावा-बहिणीच्या वर्णाबद्दल व त्याच्या स्वत:च्या भावा-बहिणीच्या वर्णाबद्दल मागे ऊहापोह केला आहेच. आमच्या व त्याच्या भावंडाच्या 'वर्णा'मुळे त्याचे मावस बहीण-भाऊ त्यांना कोणाकडे वगैरे न्यावयास संकोचत असत. श्यामची मावशी अतिशय प्रेमळ व भाच्यांवर फार ममता करणारी होती. 'माय मरो; पण मावशी न मरो' अशा अर्थाची जी काय म्हण आहे ती श्यामच्या मावशीवरूनच आली असावी. तिला बिचारीला वाटायचे की, आपल्या मुलांनी आपल्या भाच्यांना घेऊन बाहेर जावे. त्या वेळी पेशवेपार्क वगैरे नव्हता; पण पर्वतीच्या पायथ्याशी एक मोर की एक वाघ असा काही तरी होता. तेथे घेऊन जावे, कोणा नातेवाइकांकडे लग्न-कार्य असेल तर त्याला घेऊन जावे. मावस-भावंडे पर्वतीला वगैरे नेत; पण कोणाकडे लग्न-कार्याला वगैरे न्यावयाचे म्हणजे त्याना नकोसे होई!

नामवंत लेखक अरविंद गोखले ह्यांचे लग्न दोन कारणांकरता श्यामच्या मनात पक्के बसले होते. त्या वेळी अरविंद गोख-ल्यांचा पहिलाच कथा-संग्रह प्रसिद्ध झाला असावा. गोखल्यांचे व श्यामच्या मावस्यांचे काही नाते होते. त्यामुळे त्या सगळया कुटुंबाला सहकुटुंब–सहपरिवार लग्नाला व जेवायला बोलावले होते. अर्थात सगळयाना जेवायला जाणे काही शक्य नव्हते म्हणून श्यामचे दोघे मावसभाऊ व श्यामने जावे असे मावशीने सुचवले.

श्याम आपल्याबरोबर गोखल्यांकडे येणार म्हटल्यावर त्या दोघा मावसभावांनी त्याला इतके हिडिस-फिडिस केले की काही विचारू नका! अशा परिस्थितीत आपण जेवायला जाऊ नये असे श्यामला फार कडाडून वाटले; पण 'जेवायला जात नाही' असे तो मावशीला व मावस्यांना कसे सांगू शकला असता? गोखल्याच्या घरी जाताच त्या मावस-बंधूंनी श्यामला गुंगारा दिला. श्याम विचारा एकटाच जेवला व जेवण झाल्यावर पान-सुपारीची तबके ठेवली होती त्या हॉलमध्ये जाऊन बेवारशी मुलासारखा, मावसभाऊ आता येतील, मग येतील म्हणून वाट पहात कोपऱ्यात बसून राहिला.

त्या हॉलमध्ये अरविंद गोखले व त्यांची तरुण मित्र-मंडळी गप्पा-टप्पा मारत बसली होती. गोखल्यांच्या मित्रांपैकी कोणी प्रा. ना. सी. फडक्यांची नक्कल करत होता व त्यामुळे मोठा हशा पिकत होता. श्यामच्या मनात ते हिडिस-फिडिस करणे व फडक्यांची नक्कल कायमची ठाण देऊन बसली. आनं-दाची गोष्ट एवढीच की, गोखले श्यामसारखे श्याम-वर्णी होते.

त्या हिडिस-फिडिस करण्यामुळे श्यामच्या मनात पुण्याच्या लोकाबद्दल एक तऱ्हेची अढी बसली. ख़रं म्हणजे आंबा, फणस वगैरे फळे अढीला टाकली की पिकून गोड होतात; पण श्यामचे फळरूपी मन पुण्याच्या अढीमुळे कडू झाले ते कडूच राहिले!

झाले. दिवस भराभर जात राहिले. एक पुस्तक–बहुधा कथासंग्रह असावा–प्रसिद्ध झालेले. अरविंद गोखले मराठी वाङ्मयात मोठी मोलाची भर घालून गेले. गाडगीळ–गोखले युग म्हणता येईल असे कर्तृत्व त्यानी दाखवले. श्यामच्या मोठया मावस व सख्ख्या बहिणीची लग्ने झाली व 'दिल्या घरी' त्या सुखाने नांदायला लागल्या. मोठे मावस व सख्खे भाऊ पुढले शिक्षण घेऊ लागले व शिक्षण झाल्यावर कोठे तरी चिटकू लागले होते.

श्यामचेही शिक्षण झाले. त्याला नोकरी लागली. तो दिल्लीला गेला. त्याच्याकरता आई व मोठ्या बहिणी उत्साहाने स्थळे बघू लागल्या. 'मुला'च्या अपेक्षा काय आहेत ह्याची आडून-आडून चौकशी होऊ लागली. युद्धात व प्रेमात सारे चालते. त्याच चालीवर युद्धात व लग्नात सारे काही चालते अशी पद्धत होती. मुलाचा पगार वाढवून सांगावयाचा. मुलीचे वय कमी सांगावयाचे. ती चष्मा लावत असली तर तो 'दाखवण्याच्या' वेळी काढून ठेवून वर-पक्षाच्या लोकांच्या चष्मा घातलेल्या डोळ्यात धूळ फेकावयाची हे प्रकार फार सामान्य होते. त्याहीपेक्षा वरचढ प्रकार होते.

श्यामला आपले वैदिक पद्धतीने लग्न होण्यापेक्षा प्रेमविवाह व्हावा असे मनापासून वाटे; पण साधारणपणे सुंदर मुली प्रेम बसू देत नाहीत हे त्याने पाहून ठेवले होते व प्रेम-विवाहातला विवाह हा भाग सोपा असला तरी प्रेम हा भाग फार 'तकलीफ' देणारा होता असे त्याचे मत झाले होते. आधी मुलगी हेरावयाची, मग तिच्या कॉलेजच्या जाण्या-येण्याच्या मार्गावर टेहळणी करावयाची, मग तिच्या मागोमाग जावयाचे, हे सगळे प्रकार फार कटकटीचे वाटत होते. त्यातून तो मुंबईला रहात असल्याकारणाने त्यान आज एखादी मुलगी हेरली तरी ती दुसऱ्या दिवशी दिसेलच अशी शाश्वती नव्हती! आधीच आळशी असलेल्या श्यामने मग तो नाद सोडला.

तशी कॉलेजमधल्या शेवटच्या वर्षाला असताना त्याची पहिल्या वर्गातल्या एका ख्रिश्चन मुलीशी ओळख झाली होती. ते भेटल की हसून 'हॅलो' वगैरे करत. त्या वेळी आतासारखे 'हाय' 'हुय' करावयाची पद्धत नव्हती. विवाह, मग प्रेम असो की वैदिक असो तो झाल्यावरच 'हाय' 'हाय' करण्याची त्या वेळी पद्धत होती.

तेवढ्यात श्यामला कोणाकडून तरी कळले की, त्या धर्मात 'शेजाऱ्यावर प्रेम करा' असा मुळी संदेशच दिला आहे म्हणून! आता मुंबईला फ्लॅट-सिस्टीममध्ये रहावयाचे म्हणजे कमीत कमी ७-८ फ्लॅट तर असणारच की! म्हणजे तेवढे शेजारी झाले. आता हिंदुस्थानसारख्या सर्व धर्मांना स्वातंत्र्य असलेल्या देशात त्या ख्रिश्चन मुलीला "तू आपल्या धर्माप्रमाणे वागू नको" असे श्याम कोणत्या तोंडाने सांगणार होता? त्यामुळे श्यामने तो येशू-ख्रिस्ताने दाखवलेला मार्ग सोडला व स्वतःला दाखवून घ्यावयास सुरुवात केली.

श्यामला अपेक्षा व अटी वगैरे विचारता तो म्हणाला होता. 'बाकी काही असो नसो, मुलगी 'स्प' लोकांसारखी गोरीपान पाहिजे!' काळेपणाचे कडू अनुभव त्याने इंग्लंडला न जाता हिंदुस्थानातच घेतले होते. त्याची दुसरी अपेक्षा नव्हे — अगदी अट — म्हणजे मुलगी पुण्याची नको! बाकी आई म्हणेल त्याला त्याची संमती होती.

झाले. आईने त्याच्याकरता स्थळ पक्के केले. आईच्या पत्रात मुलगी 'ध्यान' आहे असे होते. दोन बुके शिकलेल्या त्या बाईला 'छान' काही लिहिता आले नव्हते; पण ते पत्र वाचून श्यामला मुलगी 'छान' आहे की 'ध्यान' आहे असा प्रश्न पडला; पण आनंदाची गोष्ट म्हणजे मुलगी गोरीपान होती व त्यातून आनंदाची गोष्ट म्हणजे ती पुण्याची नव्हती! योग्य मुहूर्तावर श्यामचे लग्न झाले. वराती-मंडळी घरोघर परतली. श्याम व राधा कलकत्त्याला गेले.

पण म्हणतात ना "होणारे न चुके ..." वगैरे! श्यामच्या नशिबातच जर पुण्याचीच मुलगी बायको होणार असे होते तर ते चुकणार थोडेच होते? लग्नानंतर असाच बोलता बोलता विषय निघाला व राधा म्हणाली, "माझा जन्म पुण्याचा, मावशीच्या घरी झाला!" हे ऐकताच बिछान्यावर पडलेला श्याम ताडकन उठला व म्हणाला, "पण लग्नाच्या आधी तुम्ही आम्हांला सांगितले नाहीत ते?" राधाला त्याचे ताडकन उठणे व ताडकन विचारणे कळले नाही. ती भोळसटपणे म्हणाली, "जन्म कुठे झाला आहे ह्याला काय महत्त्व आहे? आता महात्मा गांधी पोरबंदरला जन्मण्याऐवजी पुण्याला जन्मले असते तर त्यांच्या महात्मे-पणात काय फरक पडला असता?"

"फार फार फरक पडला असता. गांधींशी काही माझे लग्न झाले नाही आहे. त्यांना कुठेही जन्मू दे! आता हे सांग, निदान तुझा जन्म सदाशिवपेठेतला नाही ना?"

राधाने परत भोळसटपणे म्हटले, 'नाही बाई! पण सदाशिवपेठेच्या सरहद्दीवर नाना पेठेत त्या वेळी मावशी रहावयाची.' त्या वेळी नानांवर मराठीत व्हाईट-व्हाईट नाटके निघाली नव्हती म्हणून श्यामचे नानाबद्दलचे मत चांगले होते. त्याने निश्वास टाकत म्हटले, 'वाचलो. म्हटल, तुझा जन्म पुण्याचा म्हणालीस, आता सदाशिवपेठेत झाला होता म्हणतेस की काय?' राधाला श्यामचे बोलणे कळले नाही व तिने कळून घेण्याचा प्रयत्नपण केला नाही.

जसे दिवस गेले तशी वर्षे गेली. लॉर्ड फॉकलंडसारखे दिसणारे मावसे गेले—माया करणारी मावशी गेली. ज्यांची लग्ने झाली होती त्यांना मुले झाली व त्या मुलांचीही लग्ने होऊ लागली! इंग्रजी दुसरी-तिसरीत असणारे भाचे-पुतणे कोणी डॉक्टर झाले, इंजिनियर झाले. कोणी कॅनडा-अमेरिकेत स्थाईक होण्याकरता निघून गेले!

श्याम व राधा वाढल्या संसारानिशी बदलीच्या गावातून जात होते. नव्या जागी व नव्या लोकांशी मिळते घेत होते. बघता बघता मुलं मोठी झाली. मुलगी बी. ए. झाली. ती दूरच्या मावसभावाच्या प्रेमात पडली होती व त्याच्याशी लग्न करण्याच्या विचारात आहे, असे राधाच्या भावाचे पत्र आले होते.

'मुलगा पुण्याचा असेल तर चक्क 'नाही' म्हणून कळव!' चाळीस-बेचाळीस वर्षे झाली तरी श्यामचा पुण्याबाबतचा कडवटपणा गेला नव्हता; पण राधा लग्नाच्या वेळेसारखी साधी राहिली नव्हती.

'काय घोडे मारले आहे हो पुण्याच्या लोकांनी तुमचे? मी पुण्याची होते म्हणून—कलकत्ता—मणिपूर—शिलाँगसारख्या ठिकाणी तुमचा संसार निभावून नेला! का खडे फोडता नेहमी पुण्याच्या लोकांच्या नावानं?'

श्यामला पुण्याच्या लोकांनी काय घोडे मारले आहे ह्याचेही उत्तर देता आले नाही वा त्यांच्या नावाने खडे का फोडतो त्याचेही उत्तर देता आले नाही. मग त्याने होणारा जावई पुण्याचा असला तरी सदाशिवपेठेतला नाही, डेक्कन-जिमखान्यावरचा आहे व त्या दोघांमधून एक नव्हे तर दोन नद्या—मुळा-मुठा जात आहेत असे मनाचे समाधान करून घेतले. एका नदीला जोडनावाने हाक मारण्याची पद्धत फक्त पुण्याचीच, असाही विचार श्यामच्या मनात तेवढ्यातल्या तेवढ्यात येऊन गेला!

सरकारी नोकरीत प्रगती करता करता श्यामचे नाव मस्कतला जाण्याकरता सुचवले गेले. त्या आनंदात त्याने राधाला प्रवास-वर्णनाचे पुस्तक लिहिण्याचे वचन दिले व वचन निभावण्याकरता म्हणून, लिहिण्याची सवय व्हावी म्हणून व सरकारी कागद होता व सरकारी वेळ होता म्हणून त्याने काही लेख लिहिले व त्याचे नशीब बघा–पुण्याच्याच नव्हे, तर अगदी सदाशिवपेठेतल्याच एका संपादकानी त्याला उत्तेजन देऊन ते छापण्याची तयारी दाखवली.

श्यामच्या पाच-सहा कथा छापून आल्या तरी पण त्याला कोणाची प्रशंसा-पत्रे येईनात. त्यानी वाचलेल्या काही लेखकांच्या आत्मचरित्रात्मक लेखात त्यानी काही लिहिले की प्रसंशापत्रांचा अगदी पाऊस पडत असे, असे उल्लेख होते. असा पाऊस पडत असल्यामुळेच त्यांच्यातले वाङ्मय-गुण वाहून जात असतील असा मत्सरी विचार श्यामच्या मनात आला; पण मत्सर-रसाने त्याचे काम होणार नव्हते.

एक दिवस त्याला एका अनोळखी नावाच्या माणसाचे पत्र आले. पत्र चांगले दोन रुपये पंचाहत्तर पैसे खर्च करून पाठवले होते. कोण असेल बुवा हा गृहस्थ? बहुधा मस्कतमध्ये स्वतःला वा स्वतःच्या मुलाला नोकरी मिळविण्यासंबंधी असणार असे त्याच्या मराठी मनास वाटले. पत्र उघडून पहातो तो सुवाच्य अक्षरात उजव्या बाजूला घराचा क्रमांक असून 'सदाशिवपेठ' असा पत्ता होता. आता श्यामचे हृदय धडधडू लागले.

पण आनंदाची व आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्या सदाशिवपेठेतल्या सद्‌गृहस्थांनी श्यामच्या लिखाणाचे कौतुक केले होते व असेच काही लेख लिहून पुस्तक छापावयास हरकत नाही असेही सूचित केले होते. ते वाचून श्यामला धन्य-धन्य झाले. 'ह्याचसाठी केला होता अट्टाहास...' वगैरे तो गुणगुणू लागला!

परत एकदा पत्र शांतपणे वाचून श्याम म्हणाला, 'वाटलं होतं तेव्हढी पुण्याची माणसं वाईट नाहीत बरं का! गुणीजनाचे गुण ओळखण्याचा गुण त्यांच्याजवळ आहे म्हणायचा!'

□

# अमृता प्रीतम
# त्या 'मानव' या प्राण्याचा शोध घेत राहिल्या

श्रीरंग दा. संगोराम

या वर्षीचा ज्ञानपीठ-पुरस्कार सौ. अमृता प्रीतम याना मिळाला आहे. पंजाबी साहित्याला हा पुरस्कार प्रथमच मिळत आहे आणि तो मान अमृताबाईंनी मिळवला आहे. जरी हा पुरस्कार 'कागज और कॅनवस' या त्यांच्या काव्यसंग्रहाला मिळाला असला तरी त्याचे पंजाबी साहित्यातील इतर कर्तृत्वही त्यामागे उभे आहे. त्यांनी लिहिलेल्या पंधरा–एक कादंबऱ्या, त्याचे लघुकथासंग्रह हे या बहुमानाचे एक मानकरी आहेत. एक स्त्री लेखिका म्हणून अमृता प्रीतम यांनी पंजाबी साहित्यात मोठे यश मिळवले आहेच, परंतु हिंदी व मराठी साहित्याच्या दृष्टीने सुद्धा त्यांच्या साहित्याचा दर्जा कमी ठरणार नाही. किंबहुना कविता व कथा-साहित्य यातील त्याचे सव्यसाचित्व हा या तुलनेत त्यांचा एक उजवाच गुण ठरेल.

अमृताजीना कवितेचे बाळकडू त्याच्या वडिलांच्याकडूनच मिळालेलं आहे. करतारसिंह 'हितकारी' त्याचे वडील पत्नीच्या अकाली मृत्यूनंतर तरुणपणीच साधू बनले होते. संस्कृत आणि हिंदीचा अभ्यासही त्यानी केला. ते हिंदीतूनही कविता करीत. सुरुवातीस त्यांनी आपलं टोपणनाव 'पीयूख' असं ठेवलं होतं; परंतु मुलीच्या जन्मानंतर त्यांनी तिचे नाव 'अमृतकौर' ठेवले व स्वतः 'हितकारी' झाले. वयाच्या २० व्या वर्षी (१९३९ मध्ये) अमृतकौर यांचा लाहोरच्या प्रीतमसिंह कवातडा यांच्याशी विवाह झाला आणि त्यानंतर अमृतकौर यांनी 'अमृता प्रीतम' हे नाव धारण केले.

अमृताजीनी काव्यलेखनाला १९३५ साली आरंभ केला. त्यांच्या कवितांचा पहिला संग्रह 'अमृत लहरां' १९३६ मध्ये प्रसिद्ध झाला. या कवितांवर पजाबी कवितेतील पारंपारिकतेचा पगडा दिसून येतो. धार्मिक विचार, ईश्वर–भक्ती यातून ही कविता बाहेर आलेली नाही; परंतु हळूहळू अमृताजीच्या विचारप्रणालीत बदल होत गेला आणि त्याचं प्रतिबिंब त्यांच्या कवितेतून उमटू लागलं. तथापी त्यांच्या या 'मध्यकालीन' कवितांमध्ये प्रेम, यौवन आणि भावुकता याचेच दर्शन आपल्याला घडते. 'ढगाच्या पलीकडे' 'संध्येची लाली' या संग्रहांतून अशाच प्रकारच्या कविता आहेत. या गीतांच्या बाबतीत त्या म्हणतात–

'अश्रूंचे शिंपले डोळ्याच्या सागरातून वहात येतात ना! माझ्या गीतांचे मोतीही अश्रूंच्या गळयात गळा घालून येत आहेत,

या काळात त्याची प्रेमभावना कवितेतून अगदी अनावरपणे व्यक्त झाली आहे. त्या म्हणतात,

हवा पानाच्या कानात सागते,
'बरं का, मी त्याच्याचकडून इकडे आली आहे,
(प्रीतम!) पानं तुला पाहू शकत नाहीत.
पण... तुझं नाव ऐकून मात्र कशी नाचायला लागतात.'
तर, अशी ही अमृताजीची पूर्वाश्रमीची कविता.

त्या वेळी त्या अविभक्त पंजाबमध्ये लाहोरपासून चाळीस मैलांवर

गुजरावाला या शहरात आणि नंतर लाहोरमध्ये राहात होत्या.

अमृताजीच्या कवितेनं नवं वळण घेतलं ते भारत विभाजनानंतर. १९४७ मध्ये अमृताजींना लाहोर सोडावं लागलं. आपली जन्मभूमी, कर्मभूमी सोडावी लागली, अपार आर्थिक नुकसान सहून करावं लागलं. लाहोरमध्ये अनारकली बाजारात त्यांच्या पतीचा मोठा व्यवसाय होता; परंतु सर्व काही सोडावं लागलं. देहराडूनहून दिल्लीला गाडीतून एकटयानेच त्या येत होत्या. रात्रीचा प्रवास, मानसिक ताण, प्रवासातील गैरसोय, देहराडूनमध्ये मुलाबाळांना ठेवून आल्यामुळे त्यांची काळजी आणि गाडीत सर्वत्र बेकार, असहाय जनतेचा पूर. अमृताजींनी खिडकीचा आधार घेऊन अश्रूंना वाट मोकळी करून दिली आणि त्याच मन:स्थितीत महाकवी वाल्मिकीप्रमाणेच त्यांचा शोक श्लोकात परिणत झाला. गाडीतच त्यांनी कविता लिहायला सुरुवात केली आणि घरासमोर जेव्हा टांगा येऊन थांबला तेव्हा कवितेच्या शेवटच्या दोन ओळी त्यांनी लिहून संपवल्या होत्या !

ती प्रसिद्ध कविता आज 'आखां वारसशाहनू' (वारसशाहला उद्देशून') ही होय. सैयद वारिसअली शाह हा पंजाबी जनतेच्या हृदयाचा सम्राट बनलेला कवी. 'हीर रांझा' हे त्यांचे प्रसिद्ध काव्य सर्वांना परिचित आहे. त्या कवीला उद्देशून कवयित्रीनं आपला सर्व आक्रोश मांडलेला आहे. या कवितेनं पाकिस्तानी पंजाब व भारतीय पंजाब या दोन्ही प्रदेशातील पंजाब्यांच्या काळजालाच हात घातला.

### ती कविता आहे—

'आज मी वारिशहाला सांगते आहे.

तू आपल्या थडग्यातून बोल; प्रेमग्रंथाचं एक नवं पान लिहिण्याची वेळ आली आहे. एका पंजाबी मुलीच्या रडण्यावर (हीरा रांझाची नायिका) तू किती विलाप केला होतास ! आज पंजाबच्या लाखो मुली तुला ओरडून सांगत आहेत .. दु:खिताची वेदना वाटून घेणारा तू कवी ! ऊठ, आपल्या पंजाबकडे पाहा—आज मैदानात प्रेताचा खच पडला आहे आणि चिनाब नदी रक्तानं भरून गेली आहे. कुणी तरी आमच्या पाचही नद्यात विष कालवले आहे आणि त्याच पाण्याने आमची शेते भिजली आहेत.

या हिरव्यागार जमिनीच्या रोपारोपातून विष बाहेर पडत आहे. वीत-वीतभर उंच रक्ताची लाली पसरली आहे आणि फूट-फूटभर उंच अत्याचाराच्या जुलुमाचा थर आहे. त्यातच जंगलामधून विषारी हवा वाहू लागली आहे आणि त्या हवेनं बाबूंच्या प्रत्येक बासरीला नागसर्प बनवून टाकल आहे.'

सखोल अनुभूती काव्यातून उत्कटपणे कशी प्रकट होते याचं ही कविता एक उत्तम उदाहरण आहे. या कवितेनंतर अमृताजींच्या कवितेचा नवा अध्याय सुरू झाला. आधीच्या प्रेम आणि यौवनाच्या अनुभवातून कवयित्रीने सामाजिक वास्तवतेच्या क्षेत्रात पदार्पण केलं. त्यांची कविता भावविवशतेतून संयमितपणाकडे झुकली. वर्तमान यंत्रयुगातील मानवाची व्यथा त्यांच्या कवितेतून साकार होत गेली आहे. 'कागज और कैनवस' हा अमृताजींच्या अशाच उत्तरकालीन कवितांचा एक प्रातिनिधिक संग्रह आहे. या संग्रहातील ही पहिलीच कविता— 'गप्प बसण्याचा कट' :—

रात्र पेंगते आहे...

कुणी तरी मानवाच्या छातीत भगदाड पाडलं आहे.

कुठल्याही चोरीपेक्षा ही स्वप्नाची चोरी अधिक भयानक आहे.

हरेक चोराच्या खाणाखुणा—देशातील हरेक हमरस्त्यावर उमटलेल्या आहेत; पण एकही डोळा तिकडे पाहात नाही की, पाहून चमकत नाही. फक्त साखळीला बांधलेल्या कुत्र्याप्रमाणे एखादे वेळी कुणा एकाची एखादी कविता मात्र भुंकून उठते.'

या छोटयाशा कवितेत आजच्या महानगरीत गतानुगतिक जीवन जगण्यास विवश झालेल्या मानवाच्या स्थितीचं विदारक चित्रण अमृताजी करतात आणि सांगतात की, कुणीही खरं बोलायला तयार नाही. सर्वांच्या डोळयावर कातडी ओढून घेतली आहे. खरं सांगण्याचं व्रत एक कविताच तेवढी निभावते आहे आणि ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. मानवी जीवनाचं खरंखुरं सत्य निखालस साहित्यच सांगू शकेल. आजच्या राजकारणयुगात आणि यंत्रयुगात तेवढा एकच नंदादीप आशेचं स्थान आहे.

याच राजकारणयुगावर व यंत्रयुगावर कवयित्रीनं 'राजसत्ता' नावाच्या कवितेत एक मार्मिक रूपक बांधलं आहे. ती म्हणते— 'युद्ध एक कारखाना आहे. त्याच्या धुराडयातून किंकाळयांचा धूर निघत असतो. लोक म्हणजे मांसाची गाठोडी हा कच्चा माल आहे. हा माल राजकारणी व व्यापारी वेळोवेळी विकत घेतात आणि कारखान्याच्या भट्टीवर शेकतात. मग तो ईश्वर कोण ? तो या मांसाच्या गाठोडयाचा एक अडत्या आहे !'

राजकारणी लोकांची भाषणं कशी स्वार्थसाधू व निरुपयोगी असतात याचं चित्र 'भाषण' कवितेत अमृताजींनी रेखाटलं आहे. ती कविता मुळातूनच पाहिली पाहिजे.

शब्द जेव्हा विचारांशी काडीमोड घेतात (तेव्हा) बाजारात एका व्यासपीठावर माईक मांडून ते बैठक मारतात. (मग) जनतेच्या मागण्या जणु अविवाहित तरुणी ! त्यांच्यावर ते सारखीच नजर फिरवीत—आशिकाच्या आविर्भावात मंद हसत राहतात; पण मुलींनो, तुम्हाला घाबरण्याचं किंवा सकोचण्याचं बिलकुल कारण नाही. तसच, काही भलं होईल अशी आशा बाळगण्याचही कारण नाही. कारण, हे शब्द काय आणि त्यांना उच्चारणारे ते ओठ काय सर्वच...' होमो '...आहेत !

'बोल्डनेस'ची 'पोज' न घेता देखील एखाद्या स्त्रीलेखिकेला 'बोल्ड' कसं होता येत याचं हे उदाहरण आहे. अमृताजींचा स्वभाव खुल्लमखुल्ला आहे. त्यांच्या 'रशीदी टिकट' या आत्मचरित्रात्मक कादंबरीत आपल्याला एका मुक्त मनाच्या आणि भक्कम दिलाच्या धाडसी स्त्रीचं दर्शन घडतं. अन्यायाविरुद्ध त्यांच्या मनात खोल चीड भरून राहिली आहे. अर्थातच त्यांचा दोष पुरुष जातीविरुद्ध आहे. कारण आपल्या या 'बोल्डनेस'मुळं त्याना या जातीकडून अनेक शस्त्रांचा मारा सहन करावा लागला आहे. त्या म्हणतात, 'माझ्या वडिलांचे 'पुरुष-हट्ट' पुरविण्यात माझ्या आईनं कधीही कसूर केली नाही. मला आपल लहानपणी वाटायचं की, ज्याप्रमाणं पार्वतीनं आपल्या शरीरातील मळ एकत्रित करून गणपतीची मूर्ती बनवली होती, त्याप्रमाणं माझ्या आईनं सगळा राग आणि संताप एकवटून माझी मूर्ती घडवली असली पाहिजे.' इतर मुली ज्या वयात स्वेटर विणतात त्या वयात ही मुलगी खिडकीशी बसून कविता करीत असे ! पुरुष-

जातीचा या कविता स्त्रीच्या आहेत यावर प्रथम विश्वासच बसेना! रूढ पंजाबी परंपरेला धक्का देणाऱ्या या कविता त्याना सहन होईनात. म्हणून त्यानी त्याची निंदानालस्ती करायला सुरुवात केली आणि अगदी शेवटचं शस्त्र उगारलं ते म्हणजे चारित्र्य-हननाचं!

अमृताबाईंना पंजाबी साहित्यात नवे प्रवाह आणताना अशी जबर किंमत द्यावी लागलेली आहे. 'औरत एक दृष्टिकोन' या त्यांच्या विचारसंग्रहात त्यानी स्त्रीजातीची कैफियत मांडलेली आहे; पण खरं सांगायचं तर या विचारसंग्रहापेक्षा त्याच्या कविता, कथा व कादंबऱ्यांतून ही कैफियत विद्रोहाचं जे भेदक रूप घेऊन प्रकट होते त्याला तोड नाही! आपला स्वतंत्रतावाद त्यांच्या एका कवितेत असा प्रकटला आहे—

'आज मी आपल्या घराचा नंबर पुसून टाकला आहे आणि गल्लीच्या कपाळावरचं गल्लीचं नाव पण आणि प्रत्येक रस्त्याचा दिशानिर्देश करणाऱ्या खुणापण; पण जर का तुम्हाला मला भेटायचंच असेल तर प्रत्येक देशाचा, प्रत्येक शहराचा आणि गल्लीचा दरवाजा वाजवा! जिथे कुठे मुक्त आत्मा आढळेल—समजा की ते माझेच घर आहे.'

अमृताजी वेगड्या बांधिलकीच्या कवयित्री नाहीत. त्याना कसलाही संदेश द्यायचा नाही; परंतु हजारात उठून दिसणारं देखणं प्रसन्न व्यक्तिमत्त्व लाभलेल्या या लेखिकेचं मन (तिला प्रिय असणाऱ्या) सिगरेटप्रमाणं जळत असतं. या सिगरेटचंच प्रतीक घेऊन त्या म्हणतात—

'एक वेदना होती ती मी सिगरेटच्या धुराप्रमाणे बिनविरोध पिऊन टाकली.

फक्त या काही कविता आहेत.

याना मी सिगरेटच्या राखेप्रमाणं झाडून टाकलं आहे.'

## विपुल सन्मान

अमृताजींनी विपुल साहित्यलेखन केलं आहे. १६ काव्यसंग्रह, २० कादंबऱ्या, ८ कथासंग्रह आणि शिवाय वैचारिक व प्रवासवर्णनात्मक लेखन इतकं साहित्यभांडार त्यांच्या नावावर आहे. तसे त्यांना बहुमानही मिळाले आहेत. साहित्य अकादमी पारितोषिक (१९५८), 'पद्मश्री' हा बहुमान (१९६९), दिल्ली विद्यापीठाकडून 'डी-लिट्' पदवी (१९७३) आणि या वर्षीचा ज्ञानपीठ पुरस्कार. (सुरू झाल्यापासून १७ वर्षांत पंजाबी साहित्याकरिता प्रथमच मिळणारा हा पुरस्कार) आणि हा सर्व सन्मान केवळ त्यांच्या कवितेचाच नाही, तर त्यांच्या गद्याचापण आहे. मराठी जगतास त्यांचा परिचय हिंदीतून झालेला आहे आणि हिंदीत गद्य-लेखिका म्हणूनच त्यांची अधिक ख्याती आहे. कवितेतून व्यक्त होणारी त्यांची वेदना आणि विग्रह हे जेव्हा कथा व कादंबरीतून प्रकट होतात तेव्हा त्याला एक वेगळाच रंग प्राप्त होतो. मात्र पावलोपावली जाणीव होते ती ही की, या लेखिकेला मानवजीवनातील सत्याची जबरदस्त ओढ आहे. इतिहास, राजकारण, शोषण, अन्याय, युद्ध या सर्वांना स्पर्श करून त्यांची लेखणी मानवत्वाच्या कुशीत येऊनच विसावते. त्यांच्या 'पिंजर' या सुप्रसिद्ध व यशस्वी कादंबरीमध्ये आपल्याला त्यांच्या या वैशिष्ट्याचं दर्शन घडतं.

'पिंजर' (पिंजरा) ही भारतविभाजनाच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली आणि मानवजीवनातील सत्याचा वेध घेणारी कादंबरी आहे. एका मनस्वी तरुणीची—'पूरो'ची—ही कथा. विभाजनापूर्वीच्या पंजाबमध्ये एक मुसलमान तरुण 'रशीद' पूरोला पळवून नेतो. कारण मागे पूरोच्या आजोबांनी त्याच्या आत्याला तीन रात्री आपल्या घरात डांबलेलं होतं. रशीद पूरोशी जबरदस्तीनं निका लावतो. तिचं रामनाथ या तरुणावर मन असतं; पण ते स्वप्न भंग पावतं. तिला रशीदकडे 'पिंजऱ्या'त रहावं लागतं. एक दिवस ती पळून आईकडे जाते; पण आई कठोरपणे तिला हाकलून काढते. रशीदला पूरोचं शरीर मिळतं; पण किती प्रयत्न केला तरी मन मिळत नाही... या गावात एक वेडी आहे. कपड्याचं भान नसलेली, गावभर सैरावैरा धावणारी. एक दिवस तिचं पोट पुढं आलेलं दिसतं. पूरोच्या काळजाचा थरकाप होतो. वेडी मात्र बागडतच आहे. काही दिवसांनी एका झाडाखाली नाळ तशीच राहिलेल्या आपल्या बाळासह वेडी मरून पडलेली! रशीद पुढं होतो. झटदिशी नाळ कापतो. पूरोच्या घरी मुलाचं संगोपन सुरू होतं, पण गावात ठिणगी पडते. हिंदूचं बाळ मुसलमानाच्या घरी? लगेच सभा, त्यात ठराव, कुणीही उच्चभ्रू त्याला आपल्या घरी ठेवायला तयार नसतो. त्याला मोलकरणीकडं ठेवू. पुढं देवळाची झाडलोट करेल, आपली गुजराण करेल. (हिंदू मनाचं किती बोचक चित्र आहे!)

काळ सरकत असताना १९४७ साल उजाडलं. अतिभीषण खून, मारामाऱ्या, बलात्कार, पळवापळवी यांचं पेव फुटतं. पूरोच्या जुन्या प्रियकराची बहीण लाजो हिला पळवण्यात आलेलं आहे. पूरोला तिला सोडवलंच पाहिजे! लाजोची सुटका म्हणजे जणू (अयशस्वी राहिलेली) पूरोचीच सुटका! इथं पूरोला रशीदपुढं पदर पसरावा लागतो. रशीद हे काम फत्ते करतो. कारण नकळत त्याला आपल्या कर्माचं प्रायश्चित्त घ्यायचं असतं. तो आपल्या जातीच्या मोहल्ल्यातून लाजोला सोडवून आणतो आणि एक तारीख उजाडते. आज हिंदुस्थान व पाकिस्तानातील पळवल्या गेलेल्या मुलींची स्वगृही रवानगी होईल. पूरोला हिंदू म्हणून रामनाथकडे परत जाण्याची संधी आयती चालत आली आहे; पण ती पिंजरबद्ध आहे. ती जात नाही. साश्रु नयनानं तिचा निरोप घेणाऱ्या प्रियकराला—रामनाथला ती म्हणते—'कुठलीही मुलगी, हिंदू असो की मुसलमान, आपल्या घरी पोचली म्हणजे तू समज की, पूरोचा आत्मा पण आपल्याच घरी पोचला आहे.'

असं हे मानवजीवनाचं जिवंत चित्रण, धर्मभेदाचा पडदा फाडून झालेलं. हे एक प्रकारे स्त्रीजीवनावरचही भाष्य आहे. अमृताजींच्या साहित्याचा केंद्रबिंदू 'स्त्री' हाच आहे. 'दिल्ली दी गलियाँ' (दिल्लीतील गल्ल्या) या कादंबरीत त्यांनी स्वत:ला भोगाव्या लागलेल्या पुरुषजनित उपद्रवांचा संदर्भ घेतला आहे. यातील 'कामिनी' ही एका इंग्रजी दैनिकात काम करणारी पत्रकार आहे. किशोरवयात तिला एका तरुणानं भुरळ घातली आणि पुढं सोडून दिलं. पुढं एकाकी जीवन जगत असताना केवळ एकलेपणामुळं तिला जी चिखलफेक सहन करावी लागते त्याचं चित्रण म्हणजे ही कादंबरी. शेवटी एका मन जडलेल्या चित्रकाराच्या बाहूचा आधार घेतल्यावर कामिनीला काही तसल्ली मिळते; पण ती केवळ समजूतच आहे असं लेखिकेला सुचवावयाचं आहे. लेखिकेचं सामर्थ्य इथं जाणवतं.

अमृताजींच्या लघुकथा यादेखील नारीजीवनावरील भाष्यंच

आहेत. ' मेरी प्रिय कहानियाँ ' च्या प्रस्तावनेत आपल्या लघुकथा-बद्दल गप्पा करताना त्या म्हणतात–'यातील काही कथा प्रेमाच्या तर काही स्त्रीजीवनातील समस्यांच्या आहेत. वेदना एकच आहे, फक्त या स्त्रिया वेगवेगळ्या थरातल्या आहेत.

या पुस्तकाची अर्पणपत्रिका आपलं लक्ष वेधून घेते'त्या प्रिय कथेला हे पुस्तक अर्पण, जी या पुस्तकात येऊ शकली नाही. '

अशा या अमृता प्रीतम. साहित्याच्या क्षेत्रात स्त्रीलेखिकाचा आदर्श निर्माण करणाऱ्या, हलक्या रंजकतेला थारा न देणाऱ्या, कौटुंबिक जिव्हाळ्याच्या भावविवशतेत न अडकणाऱ्या, बटबटीत संदेश-वादापासून दूर राहणाऱ्या, साहित्यात लैंगिक पावित्र्याचा बडेजाव न माडणाऱ्या. त्यांनी मानवजीवनाकडे साकल्याच्या नजरेनं पाहिलं आणि जीवनाचं यथातथ्य चित्रण करीत त्यात ' मानव ' या प्राण्याचा त्या शोध घेत राहिल्या.'मी कोण आहे ?'हा प्रश्न केवळ वेदान्त्यानाच पडलेला नसतो, तो प्रत्येक मनुष्याला पडलेला असतो. पंडित लोक त्याचं उत्तर वेदातात, तत्त्वज्ञानात शोधतात. सामान्य मनुष्य ते स्वतःच्या साहित्यात शोधत असतो. ज्या साहित्यात हे उत्तर नकळत शोधण्याचा प्रामाणिक प्रयत्न असतो, ते साहित्य पुरस्काराला पात्र ठरतं. अमृताजींचं साहित्य या दर्जाचं आहे त्याचं सर्वच साहित्य निर्दोष आणि उच्चप्रतीचं आहे असं त्या स्वतःही म्हणणार नाहीत; पण असला 'पुणेरी विचार' बाजूला ठेवून अमृताजींच्या आणखी काही कथा-कविता वाचणं जास्त फायद्याचं.

□

---

पुस्तके

# ' ठुमरी ' रंगलेली

श्री. उमाकांत ठोमरे हे मूळचे ललितलेखक. पंचेचाळीस ते पन्नास साल दरम्यान त्यानी अनेक चांगल्या लघुकथा लिहिल्या. 'जगन्नाथाचे पत्र', 'पाऊस आला !', 'मेंढी, मेंढी' यासारख्या त्यांच्या कथा चिकित्सक वाचकांना आजही स्मरत असतील. कधी तरी ठोमऱ्यांनी संपादनाकडे मोहरा वळवला-'वीणा' मासिकाचे ते संपादक झाले. साहित्यावर जबरदस्त प्रेम–अनेक साहित्यिकाशी जवळचे संबंध. नेहमी गप्पाटप्पा साहित्यासंबंधीच्या. 'वीणा 'साठी जे साहित्य येत असे ते न वाचता परस्पर कम्पॉझिटरकडे द्यायचा स्वभाव नसल्यानं, अनाहूत व आवर्जून लिहवून घेतलेलं साहित्य नीट पारखून घ्यायची सवय जडल्यानं ठोमऱ्याना स्वतःच लेखन करायला सवड मिळेनाशी झाली ! त्यांच्यातला कथालेखक हरवला! ( कै. अनंत अंतरकर यांचं असंच झालं होतं.) आपल्या साक्षेपी संपादनानं ठोमऱ्यांनी 'वीणा' मासिकाला वाङ्मयीन दर्जा प्राप्त करून दिला. मराठीतल्या पहिल्या पाच मासिकात त्या वेळी 'वीणा'ची कुणीही डोळे मिटून गणना केली असती...

पण नंतर मराठी मासिकांचं नेहमी जे होतं ते ' वीणा'चं झालं. आर्थिक अडचणी-मुळं 'वीणा' बंद पडलं ! परंतु लवकरच 'नवनीत ' हे ' डायजेस्ट ' पद्धतीचं मासिक चालवायची जबाबदारी त्यांनी पत्करली. थोडया अवधीतच त्यांनी ते नावारूपाला आणलं.

संपादनाच्या कामात व्यग्र असताना वेळोवेळी ठोमऱ्यांनी जे लेखन केलं, ललितलेख लिहिले, ' आकाशवाणी 'वर जी भाषणं केली त्यांचा संग्रह म्हणजे ' कवडसे प्रकाशन'चं पहिलं पुस्तक 'ठुमरी!' ठोमऱ्यांच्या शैलीदार लेखनामुळं वाचनीय झालेलं. यातले पहिले सात लेख आत्मकथनपर आहेत व पुढले सात लेख व्यक्तिचित्रणात्मक आहेत. ' अजून यौवनात मी ' या कै नानासाहेब फाटक यांच्यावरील रंगतदार लेखानंतर त्यांची ' मुंबई आकाशवाणी 'वर ठोमऱ्यांनी घेतलेली मुलाखत पुस्तकात समाविष्ट करण्याचं प्रयोजन समजत नाही. ' ठोमऱ्यांची मुलाखत ' ' ठुमरी 'त शोभून दिसली असती; पण इथं ते प्रश्न विचारणारे आहेत व प्रदीर्घ उत्तरं देणारे आहेत नानासाहेब फाटक !

हे एवढं गालबोट सोडलं तर ' ठुमरी ' हा ललित-लेखनाचा लक्षात राहील असा एक संग्रह आहे हे निश्चित्. आपलं गाव अहमदनगर याबद्दल ठोमऱ्याना रास्त अभिमान आहे आणि तो केवळ दिखाऊ नाही ! नगरच्या ' उदास सौंदर्या'चा त्यानी उत्कट शब्दांत मागोवा घेतला आहे. बालपणीची शाळा, त्या वेळची लग्नसराई यात ठोमरे मनापासून रंगतात. पन्नास वर्षांपूर्वी चार दिवस चालणाऱ्या विवाहसमारंभाचं ठोमऱ्यानी मोठ्या प्रत्ययकारी शब्दात वर्णन केलं आहे. बायका इरकली, टोपपदरी, महेश्वरी, फरसपेटी अशा लफ्फेदार काठ-पदराच्या नऊवारीत लगालगा आतबाहेर करीत. प्रत्येकीच्या अंगावर गेला बाजार शेर-अच्छेर पिवळेधम्मक सोन्याचे डागडागिने आणि नाकात हा टप्पोरा मोत्याच्या नथीचा खेकडा ! पुरुष मंडळी सिल्क अल्पाकचे कोट, करवतीकाठी नाही तरी रुईफुली धोतरं, जरीकाठी रुमाल उपरण्यात वावरत ... वधूवरांवर उधळायच्या अक्षता असायच्या हळदमाखल्या जोधळ्यांच्या–! ' पण ठोमरे केवळ मनाला सुखद हुरहुर लावणाऱ्या गोष्टीतच रमत नाहीत ' कृष्णाकाठी कुंडल आता पूर्वीचं उरलं नाही ' असं म्हणत केवळ सुस्कारे सोडत नाहीत –! ' वर्षअखेर 'मध्ये स्वतःच्या आयुष्यात घडलेल्या दोन घटना कुंचल्याच्या दोन फटकाऱ्यानी सुरेख कलाकृती निर्माणाऱ्या चित्रकाराच्या कुशलतेनं त्यांनी उभ्या केल्या आहेत. वाचून अंगावर काटा उभा राहील अशा त्या घटनांची जात पूर्णतया वेगळी आहे. ठोमऱ्याना जुन्या काळचं लग्न आठवतं तशा या घटनाही आठवतात...

आपल्या निकटच्या परिचयातल्या व्यक्तींच्या स्वभावातल्या वेगळ्या पैलूवर त्यांनी प्रकाश टाकला आहे. या व्यक्ती तशा ख्यातनाम आहेत. त्यांच्यावर खूप लिहिलं गेलं आहे; पण ठोमऱ्यांना त्यांची जी वैशिष्ट्यं जाणवतात, त्यावर फारस कुणी बोट ठेवलेलं नाही. पु लं. च्या ' अंतर्यामी कुठं तरी एक भिडस्त असा लाजाळू मुलगा दडून बसलाय !' हे त्याचं निरीक्षण वेगळं वाटतं. खाण्यापिण्यात सतत काही प्रयोग करणारे, चोखंदळ, रसिक, मिशनरी वृत्तीचे 'थरो जटलमन' वसंत सरवटे यांचं हृद्य व्यक्तिचित्र मुळातून वाचायला पाहिजे.

आचार्य अत्र्यांवरल्या छोटेखानी लेखात अत्र्यांची सर्व स्वभाववैशिष्टय प्रतीत होतात. बल्झाक व हिचकॉक या पाश्चात्य साहित्यिक-

सिनेदिग्दर्शकांची ठोमऱ्यानी ओळख करून दिली आहे; पण त्या दोघांच्या स्वभावातल्या जगावेगळ्या वैशिष्टयांविषयी ठोमऱ्याना अधिक आकर्षण आहे हे सहज प्रत्ययास येतं.

'वर्षअखेर'मध्ये ठोमरे लिहितात: 'जीवन जगणं हे जीवनाविषयी लिहिण्याहून नेहमीच मोलाचं आणि महत्त्वाचं वाटत आलं आहे.' दैनंदिन लिहिण्याच्या संदर्भात ते खरंही असेल कदाचित – परंतु 'ठुमरी' वाचून मनापासून वाटतं की, ठोमऱ्यानी जीवनाविषयी आणखी लिहावं. त्यांच्या निकट परिचयातल्या व्यक्तींची आगळीवेगळी ओळख वाचकाना त्यांनी करून द्यावी – त्यांच्या लेखणीचं टोक फार काळ सुकं राहतं... तसं ते राहणं इष्ट नव्हे – !

– सुभाष भेण्डे

ठुमरी
उमाकान्त ठोमरे
कवडसे प्रकाशन, मुंबई – १
पृष्ठे : १३९, किंमत : ३० रुपये

---

## फिनिक्स निवड

# Encounters with the Eminent

By R. M. Lala.
IBH Publishing Co. Bombay.
Pages 160, Rs 20/–

---

मी काही दिवसांपूर्वी लिटन स्ट्रॅची याचे 'द एमिनन्ट व्हिक्टोरिअन्स' हे पुस्तक वाचले होते. तसे हे पुस्तक फार जुने आहे; पण कधीकधी अमक एखाद पुस्तक वाचायला मिळणं हा कुंडलीतील योगासारखा प्रकार होऊन बसतो. कारण एक तर बरेच वेळा आपल्याला पुस्तकाची पार्श्वभूमी माहीत नसते. दुसरे म्हणजे काही दुर्मिळ पुस्तके हाती लागणे जणू कपिलाषष्ठीचाच योग! लिटन स्ट्रॅची म्हणजे अगदीच खटयाळ चरित्रकार! जगातील दयाहीनामधला दयाहीन, क्रूराला क्रूर, मिश्किलातला मिश्किल चरित्रकार! चरित्र लिहीत असताना कुणाहीबद्दल आदर ठेवायचा नाही हे त्याचे ब्रीद! अपूज्यबुद्धी ठेवून पेन हाकलाची हा खाक्या त्यानी शेवटपर्यंत ठेवला. त्या कारणामुळे या माणसाबद्दल मला प्रचंड कुतूहल जागृत झाले होते. एमिनन्ट व्हिक्टोरिअन्समध्ये तर त्यानी फ्लॉरेन्स नाइटिंगेलसारख्याची टर उडवली आहे. या इथं इतर अनेक प्रचंड व्यक्तिमत्त्वं बळी पडली आहेत. हेन्री एडवर्ड, कार्डिनल मेनिंग, थॉमस ऑरनॉल्ड, जनरल 'चायनीज' गार्डोन याचा इथे धुव्वा उडाला आहे. वाचकाला त्यानी मूर्तिभंजनकला शिकवली! अर्थात याची किंमत त्यांना मोजावी लागली. त्याच्यावर टीकेचे प्रचंड लोट उठले, तरीही शेवटपर्यंत साहित्यक्षेत्रात त्याचा दबदबा टिकूनच राहिला!

हे लिटन स्ट्रॅची मला श्री. लालाच्या या पुस्तकातील एमिनन्टवरून आठवले. एमिनन्ट व्हिक्टोरिअन्स हे त्याचे एक जगप्रसिद्ध पुस्तक तर आहेच; परंतु क्वीन व्हिक्टोरिया हे त्याचे सर्वांत अधिक गाजलेले पुस्तक आहे.

अलीकडची काही चरित्रं मला सपक वाटली. त्याचे कारण लिटन स्ट्रॅची तर नसेल ना, अशी मला शंका चाटून गेली. श्री. लालाचं याआधीच टाटावरचं एक पुस्तक (Creation of Wealth) हे पुस्तक आमच्या ग्रंथालयात इतके सर्क्युलेट झाले की, आता लाला याचे हे दुसरे पुस्तक घेण्यात कोणताच प्रत्यवाय नसावा असे वाटले. लालानी दुनियेतला बेरकीतला बेरकी चरित्रकार वाचला का नाही हे मला माहीत नाही. लालांच्या या पुस्तकात अनेक गगनचुंबी (म्हणजे भारतातलं गगन!) व्यक्तिमत्त्वाचा परिचय आहे. मासला म्हणून मी आधी मोरारजीभाईंचे शब्दचित्र वाचून काढले. मनावर कसलाच काही इम्पॅक्ट झाला नाही. नंतर नानी पालखीवालांचे प्रकरण वाचले. ते काकणभर बरे वाटले. लालाच्या विनोदाची मजल म्हणजे 'आपरो नानी' इथपर्यंत पोचली (इथे 'आपरो' म्हणजे 'आपला'). प्रत्येक पिढीतल्या पारशाकडे म्हणे असे तीन 'आपरो' असतात. म्हणजे प्रत्येक पिढीतले पारशी त्याच्या जमातीतील दोनतीन लोकांना अगदी लाडिकपणे असे संबोधतात. स्वगोत्रगमन केलेल्या पारशाना बजेटविषयी फारसं सोयरसुतक नसतं असं लाला म्हणतात. केवळ प्रेमापोटी ते 'आपरो नानी'ला ऐकायला येतात. गोत्रगमनामुळे, अगम्यागमनामुळे, सगोत्रविवाहामुळे त्याची प्रतिभा दोन्ही टोकांपर्यंत फाकते. व्यक्तिमत्त्वाला प्लस-मायनसचे उधाण येते. त्यात चार-सहा 'आपरो नानी' होऊन जातात व बाकीचे 'आपरो, आपरो' पुटपुटत उभी हयात घालवतात!

या पुस्तकात विनोबा भावे, बी. पी. चालिहा, मोरारजी, झाकीर हुसेन (तबलापटू, रुपेरी पडद्यावर गेलेला नव्हे. शब्दचित्रात घुसायला तो अजून फार तरुण आहे.), कामराज, जे. बी. व सुचेता कृपलानी, सॅम माणेकशॉ, विजय मर्चंट, एम. मुनशी, जयप्रकाश नारायण, सी. राजगोपालाचारी, लालबहादूर शास्त्री, एम. एस. सुबलक्ष्मी, जे. आर. डी. टाटा व सी. एन. वकील यांचा अल्प परिचय आहे; पण कुठेही लिटन स्ट्रॅची टच नाही. गं. दे. खानोलकर टच मात्र भरपूर आहे! या पुस्तकात लिटन स्ट्रॅची टच नसला तरी जो हिरो वर्शिपचा टच आहे, तो अनेक ठिकाणी वाचनीय आहे. माहितीपूर्णही आहे.

नानी पालखीवाला जनता पार्टीच्या कारकीर्दीत यू. एस. ए. मध्ये वकील म्हणून गेले होते. तेथे त्यांनी भारतीय लोकाचे कार्य पाहिले व ते भारावून गेले. सिएटलमधील बोइंग कारखाना, डलासमधील टेक्सास इन्स्ट्रुमेंटस्, मॅसॅच्युसेटस्मधील इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी या सर्व कारखान्यात भारतीयांनी उत्कृष्ट कामगिरी केली अशी पावती अनेक अमेरिकन लोकानी नानीला दिली! तेव्हा या 'आपरो नानी'च्या जवळजवळ डोळयात अश्रू आले. आपले भारतीय लोक इतर देश श्रीमंत करीत आहेत. (ब्रेन ड्रेन) या गरीब भारतीय देशात माझ्या सर्व गरीब बांधवाना चीज खायला मिळावी अशी विद्याधर पुडलिकासारखी पालखीवालांचीही अभिलाषा आहे. आपली अर्थशास्त्राची मूलभूत तत्त्वे व राजकारणाचा ढाचाच चुकीचा आहे असे ते म्हणतात.

काही लोक त्यांच्या क्षेत्रात काम करतात, पण ती इतक्या पोटतिडकेने की हे लोक रोकठोक व्यवहारापलीकडे जातात. व्यव-

सायातच त्यांना आदर्श आणायचा असतो आणि आदर्श आला की, त्याना परिपूर्णता हवी असते. ती तर कुणाला मिळणंच शक्य नाही.त्यासाठी झटतच रहाणे हा एकच मार्ग! 'आपरो नानी' यातलेच एक!

पण अमेरिकेतील बाईच्या बुटाबद्दल मात्र लाला यांनी काहीच लिहिले नाही ! असेल; स्त्रीदाक्षिण्यासाठी बूट उचलला असेल; पण नानीसाहेबानी भारतात अशा प्रकारचे स्त्री-दाक्षिण्य दाखवल्याचे ऐकिवात नाही. नानी पालखावाला यांचा IT विषयी सल्ला इतका प्रॅक्टिकल असतो की, तो आपल्या मायबाप सरकारने अमलात आणण्याची सुतराम शक्यता नाही !

मुलाखत घेत असताना नानी उतावीळ होतात; पण दहा हजारांच्या सभेत हे आपले अगदीच रीलॅक्स्ड असतात. Drawing strength from people, sure !

पण नानी, 'पेलो जुतो कोणो उपडिलो, आपरी फर्स्ट लेडीनो हुतो के शु ?' हे मात्र साता समुद्रापलीकडले स्त्रीदाक्षिण्य !

या पुस्तकात मला जे. आर. डी. टाटांचं व्यक्तिचित्र वाचनीय वाटलं. जे. आर. डी. हे अर्धे फ्रेंच व अर्धे पारशी आहेत हे अनेकांना माहीत आहेच. शिक्षण घेत असताना ते एक वर्ष भारतात व एक वर्ष फ्रान्समध्ये असे हिंडत असत. जे. आर. डी.चे वडील फ्रान्स-मध्ये हिऱ्यामोत्याचा व्यापार करायला गेले होते. फ्रेंच भाषा आपल्याला अस्खलित यावी या हेतूने ते एका बाईची शिकवणी घेत असत. या फ्रेंच बाईच्या मुलीवरच त्याचे प्रेम जडले व त्यातूनच जे. आर. डी. टाटांचा जन्म ! हायब्रीड व्हरायटीनं म्हणे पीक छान येत असतं. कसदार आणि दमदार !

उड्डाण म्हणजे चार्लस लिंडबर्ग (नॉन-स्टॉप ट्रान्स अॅटलान्टिक-१९२७) राइट ब्रदर्स, सेंट एक्झ्युपेरी, अर्नेस्ट गॅन, व J. R. D. ! लिंडबर्ग हा अॅटलान्टिकवरून १९२७ मध्ये सोलो नॉन-स्टॉप उडाला होता. १९३२ मध्ये त्याच्या मुलाला पळवून मारण्यात आले होते. राइटब्रदर्सविषयी तर सर्वांना माहिती आहेच. सेंट एक्झुपेरी हे तर एक मोठे वैमानिक साहित्यिक होते. विमानाच्या उड्डाणातील साहस आणि भय याकडे त्यानी एका कवीच्या दृष्टीने पाहिले आहे. त्यानी आफ्रिका, साउथ आफ्रिका व इतर काही देशातील एअर-मेल सर्व्हिस सुरू केली, एकदा विमानाचा अपघात झाल्यानंतरही त्यानी परत पायलटचाच पेशा पत्करला. आयुष्याची पर्वा न करता साहसासमोर जाणे यातच माणसाचा मोक्ष आहे असेच ते जवळजवळ म्हणत असत. अर्थात् जे. आर. डी. चा हा आवडता लेखक. एकटं एकटं एवढं उंच गेल्यावर कसं एकटं एकटं वाटतं, मानव-जातीविषयी असल्या वेळेला कसला कळवळा येतो हे अनेक वैमानिकांनी व अॅस्ट्रॉनॉटस्नी सांगितले आहे. पण एक्झुपॅरीनो जे सांगितले आहे त्याला मात्र तोड नाही. J. R. D. ची कराची-बॉम्बे एअर-मेल फ्लाइट (१९३०ची) सुद्धा फेमस आहेच. परंतु हाडाचे ते मॅनेजर, डायरेक्टर, चेअरमन वगैरे आणि हे सेंट एक्झ्युपेरी हे From riches to rags वाले. त्यामुळे एक्झ्युपेरी हेच पुस्तक लिहू शकले !

जे. आर. डी.च्या प्रकरणाची सुरुवातच मस्त आहे स्वीडनमध्ये दर सहा महिन्यांनी दुनियेतले अनेक उद्योगपती गोळा होतात. त्यात इटलीच्या फियाटचे गायॉव्हेनी अॅन्जेलो, (त्याचे नाकसुद्धा टाटांसारखे रोमन), फोर्ड मोटर्सचे प्रेसिडेंट, जपानचा मित्सुबिशीचा प्रतिनिधी, रॉकफेलर, हेन्री किसिंजर व जे. आर. डी. वगैरे मंडळी असतात. हे व्ही आय. पी. मोटारीतून जात असतात. मागे-पुढे मोटारसायकलीवर जाणारे संरक्षकदल (escorts) असते. वर हेलिकॉप्टर उडत असते. कारण या लोकाना किडनॅप केले जाण्याची शक्यता फार असते. यावर जे. आर. डी. काय म्हणतात ? 'मला कुणी किडनॅप करणार नाही. रुपी-पेमेंट मधे कुणीही खंडणी ( ransom ) स्वीकारणार नाही !'

एकदा या जे. आर. डी.ची मुलाखत एका मासिकात आली होती.

'आपल्याला हिंदुस्थानचं पतप्रधान केलं तर आपण काय काय कराल ? '

'आत्महत्या !' J. R. D. उत्तरले.

— जे. एन्. पोंडा

### — नवीन दाखल झालेली पुस्तके —

1. **Kama Sutra of Vatsyayana**–Edited by Mulkraj Anand
2. **Parsifal Mosaic**–(Bestseller)–Robert Ludlum
3. **Road to Gandolfo**–(Bestseller)–Robert Ludlum
4. **The Intimate Sex Lives of Famous People**–Irring Wollace, David Wollechinsky, Amy Wollace, Sylvia Wollace
5. **No Comebacks**–(Bestseller)–Fredrick Forsyth

१. **छाया आणि ज्योती**–(थोर व्यक्तीच्या पत्नीच्या व्यक्तिरेखा)– सौ. सुमति देवस्थळे

२. **हिंदू**–(हिंदू व्यक्तिविकास, संस्कृती व धर्माची मीमांसा)– मॉरिस कारस्टेअर्स / अनुवाद र. गं. विद्वांस

❋ *'It is an education to run a Library like the Phoenix ! It is an education, too, to be a member of the Phoenix ! !*

**दि फिनिक्स लायब्ररी**

**७२७, सदाशिव पोस्टासमोर, पुणे ३०.**

: पूर्वसूत्र :

एरणगावच्या मुकुंदराव चव्हाणच्या करणीनं होरपळलेलं देसाई कुटुंब मुंबईला दाखल झालं. गोळेच्या रूपानं श्यामकांत देसाईला मित्र मिळाला. हे समाधान फार दिवस टिकलं नाही, कारण कल्पनाच्या सौंदर्याला भुलून गोळेनं कल्पनाशी अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला. अस्वस्थ कल्पना सातोस्करकाकूंच्या नवनाथमठात जाऊ लागली. हळूहळू दर शुक्रवारी कल्पनाच्याही अंगात येऊ लागलं. ती लोकांना साक्षात देवी वाटू लागली. नारळ, प्रसाद, साड्या, दक्षिणा यामुळे कल्पनाची आर्थिक परिस्थिती सुधारत होती. काही कारणांनी गोळेसारखा नास्तिक माणूससुद्धा कल्पनाच्या भजनी लागला. दर शुक्रवारी तो कल्पनाचं दर्शन घ्यायला येत असे. नवरात्र सुरू झालं. भाविकांची गर्दी नवनाथमठात रोज वाढतच होती. नवरात्रातला शेवटचा दिवस उजाडला. रात्री ११ वाजेपर्यंत गर्दी ओसरत नव्हती. सातोस्करांची अखंड धावपळ चालली होती. सव्वाअकरा वाजता गोळे देवीचं दर्शन घ्यायला आला. थोड्याच वेळात सातोस्कर श्यामकांतच्या बिऱ्हाडाकडे सैरावैरा धावत सुटले. श्यामकांतच्या दारावर थाप मारून म्हणाले, " उठा. त्या अर्जुन गोळेचा खून झालाय ! "

# सबला

## : चार :

माधव शिरवळकर

नवरात्रातला अष्टमीचा दिवस म्हणजे काही सार्वजनिक सुट्टी नव्हे. इतरांप्रमाणेच श्यामकांतही सकाळी पोस्टात हजर झाला. तो घरातून बाहेर पडला तेव्हा कल्पना देवासमोर बसून घुमत होती. लीलाताई बढे इकडे तिकडे धावपळ करीत होत्या. आज रात्री उशिरापर्यंत कल्पना आपल्याला भेटणार नाही याची श्यामकांताला कल्पना होती. संध्याकाळचे पाच वाजले म्हणजे नवनाथाच्या मठातले लोक येऊन कल्पनाला घेऊन जाणार आणि मग रात्री बारा होऊन गेले म्हणजे अष्टमी उलटणार, तोपर्यंत कल्पनाच्या अंगात देवी वास्तव्य करून रहाणार हे सारं श्यामकांत पूर्ण जाणून होता. मनातून तो अस्वस्थ होता. अस्वस्थपणाचा त्रास होऊ नये म्हणून रजा घेऊन घरी बसणं त्यानं टाळलं होतं. पोस्टाच्या मस्टरवर वेळेवर सही ठोकली होती. आदल्याच दिवशी नीलूलाही नाथाकाकांकडे पोहोचवून तिच्याबाबतची काळजीही त्याने दूर केली होती.

दिवसभर पोस्टाचं काम करून सायंकाळी साडेसात वाजता तो घरी आला. कल्पना त्या वेळी नवनाथाच्या मठात गेलेली होती. दाराला कुलूप होतं. बढ्यांकडून चावी घेऊन श्यामकांतानं दरवाजा उघडला. आत खोलीत अव्यवस्थित पसारा पडलेला होता. त्याच्यावरून नजर फिरवून दमल्या-भागल्या स्थितीत श्यामकांत शांतपणे खाटेवर पडला आणि त्याला चटकन झोप लागली.

रात्री साडेसातला जेव्हा श्यामकांताला घरात झोप लागली तेव्हा नवनाथाच्या मठातून धुपाचा धूर निघत होता. त्या धुराची पर्वा न करता मंडळी आत गर्दी करून उभी होती. आतल्या बाजूला मधल्या चौकोनात अंगात आलेल्या बायका घागरी फुंकत होत्या. त्या चौकोनाच्या सभोवताली आडवे बांबू बांधून एक कुंपण तयार करण्यात आलं होतं. बघी मंडळी ह्या कुंपणाभोवती गर्दी करीत होती. नवनाथाच्या मठातले कार्यकर्ते-स्वयंसेवक व्यवस्था पहाण्यात गर्क होते.

रात्री साडेनऊपर्यंत गर्दीनं उच्चांक गाठला. मठात लोक गुदमरून जातील अशी परिस्थिती निर्माण झाली. एकीकडे एका दरवाज्यातून लांबच लांब रांग बाहेर पडून मठाबाहेरच्या दुकानापर्यंत पोहोचली होती. हे लोक महालक्ष्मीच्या मूर्तीचं दर्शन घेण्यासाठी ताटकळले होते. मागच्या बाजूच्या दरवाज्यातून दुसरी रांग लांबवर पसरली होती. ह्या रांगेतील प्रत्येकाच्या हातात काही ना काही होतंच. कुणाला सातोस्करकाकूंची खणा-नारळानं ओटी भरायची होती. कुणाला कल्पनाला साडी-चोळी आणि सौभाग्यालंकार अर्पण करायचे होते. कुणाला नुसतं पाया पडून आशीर्वाद घ्यायचा होता, तर कुणाला काही प्रश्न-समस्या विचारून, उपाय जाणून घ्यायचा होता. ह्यात कुणाला नवसाप्रमाणे मूल झालं होतं, तर कोणी केस जिंकून जमीनजुमला मिळविला होता. कुणाचं पोर अंगारा लावल्यावर मरणाच्या खाईतून बाहेर पडलं होतं. कुणाला चांगली नोकरी मिळाली होती. कुणी परीक्षेला 'क्लास' मारला होता. असे सगळे यशस्वी-अयशस्वी भक्तगण रांगेत उभे होते.

गोळे साडेनऊ वाजता एक्सलसियर सिनेमातून बाहेर पडला.


छानसा चित्रपट पाहून त्याचं चित्त हलकं हलकं झालं होतं. त्यानं घड्याळात पाहिलं आणि पुढं जाऊन कोपऱ्यावर सिगरेट घेतली. त्यालाही नवनाथाच्या मठात जायचं होतं. तसं त्याचं अगोदरच ठरलेलं होतं. समोरून येणारी मोकळी डबलडेकर बस त्याच्या मनात भरली. टॅक्सीचा बेत रद्द करून तो बसच्या वरच्या टपावर जाऊन पुढं बसला. त्याला आणखीनच मोकळं वाटलं. साडेदहाच्या सुमारास गोळे नवनाथाच्या मठाशी पोचला.

चांगली दोन तास झोप काढून श्यामकांत तरतरीत झाला होता आणि नंतर बाहेर हॉटेलात जाऊन जेवून आला होता. साधारणतः दहाच्या सुमारास तो पुन्हा घरी परतला आणि एक जुनं मासिक काढून चाळत बसला. त्यातल्या एका कथेत अडकल्यामुळं त्याचं वाचन साडेदहा झाले तरी अजून संपलेलं नव्हतं.

रात्री साडेदहा झाले तेव्हा गर्दीनं साडेनऊचा उच्चांकही तोडलेला होता. मठाच्या फताडचा पायऱ्यांपुढं चपलांचा एवढा मोठा ढीग पडलेला होता की, त्यातली एखादी चोरणं म्हणजे चोराला अपमान वाटला असता आणि सर्वच्या सर्व चोरणं त्याला अशक्य झालं असतं. गोळेनं ती गर्दी पाहिली आणि तो मागं फिरला. तो मनात म्हणाला, 'थोडं उशिरा येऊ.' गोळे तेथून फिरला तो पोटपूजेकरता. एका मस्त हॉटेलात जाऊन त्यानं चिकन तंदुरीवर आडवा हात मारला. मग कसाटा आइस्क्रीम जिभेवर चघळत त्यानं समाधानाची ढेकर दिली. बेसिनवर हात धुवत असतानाच हॉटेलातल्या घड्याळानं अकरा ठोके दिले. गोळेनं निष्कारण स्वतःच्या घड्याळातही पाहिलं.

पावणेअकराच्या सुमारास सातोस्करची थोडी धावपळ झाली. आयत्या वेळी एका सुवासिनीच्या अंगात आलं आणि नंतर लगेचच एक दहा वर्षांचा मुलगा गर्दीतून थयाथया नाचत पुढं आला. त्या मुलाच्या अंगात कालीमाता संचरली होती आणि सुवासिनी संतोषीमातेचं रूप म्हणून समोर उभी राहिली होती. व्हायचं तेच झालं. धूप कमी पडला. धुपासाठी सातोस्करांच्या नावानं ओरड झाली. धूप कमी पडला म्हणून सातोस्कर बिनचपलेचाच बाहेर धावला आणि दोन किलो धुपाचा ढिगारा घेऊन आला. धूप घेऊन येईतो एकूण दोन गोष्टींचा फरक मठात पडला होता. एक म्हणजे घड्याळात बरोबर अकरा वाजले होते आणि दुसरं म्हणजे एका पँटशर्टवाल्याच्या अंगात प्रभू परशुराम संचरले होते. तो मोठमोठ्यानं काही तरी गर्जना करीत होता. त्याचं बोलणं ऐकू यावं म्हणून कुंपणाबाहेरची गर्दी आपलं हृदय कानापर्यंत ताणून उभी होती. सातोस्करनं धुपाचा पुडा आणून बायकांत सोडला आणि गालावर हात ठेवून तोही परशुरामाचं रूप न्याहाळू लागला.

दीर्घ कथेनं चांगलीच पकड घेतली होती. एका जुन्या मासिकात एवढी चांगली कथा वाचायला मिळेल असं श्यामकांताला अजिबात वाटलेलं नव्हतं. सहज म्हणून त्यानं मासिक उचललं आणि वाचायला सुरुवात केली तर तो गुंतला. वाचनात एवढं कधी गुंतल्याचं श्यामकांतच्या आठवणीत नव्हतं. साधारणतः झोप येत नसली म्हणजे दहा–बारा पानांपर्यंत काहीबाही वाचत राहण्याची आणि नंतर घोरत पडण्याची त्याची एक क्षुल्लक सवय होती. पण आज अकरा वाजून गेले तरी मासिकानं त्याला सोडलं नव्हतं!



गोळे बिल भरून बाहेर पडला. घड्याळात अकरा-पाच झाले होते. झपाझप पावलं टाकीत तो नवनाथाच्या मठापाशी आला. गर्दी किंचित कमी–विरळली होती. मुख्य म्हणजे पोरासोरांची गर्दी बरीच कमी झाली होती. गोळे पायऱ्या चढून वर गेला. तसंच उभं राहून त्यानं आपले बूट एका आडोशाला काढून ठेवले आणि मोजे घालूनच तो मागच्या दरवाज्याशी आला. रांगेत चार बायका उभ्या होत्या. त्यांना बहुधा नुसतंच पाया पडायचं होतं. कारण त्यांनी हातात काहीच आणलेलं नव्हतं. गोळे त्या बायकांमागं रांगेत उभा राहिला.

एकीकडे भगवान परशुरामाचा उपदेश चालू तर दुसरीकडे कालीमाता परशुरामाला अडवू पहात होती. दोघंही तापट, भसाड्या आवाजाचे. दोघांचंही बोलणं एकमेकात गुंतायचं आणि रेडिओ खरखरल्यासारखे कान किटायचे; पण लोकांना त्यातही रस वाटत होता. गर्दी इतकी एकाग्र झाली होती की, कोणी विचारं कुजबुजतही

नव्हतं. गोळे महालक्ष्मीची मूर्ती लक्षपूर्वक पहात रांगेतून पुढं सरकत होता. देवीच्या चेहेऱ्यावर अकरा वाजून गेल्यानंतर एक दैवी तेज झळाळलं होतं. सभोवतालच्या धुपानं एकूण वातावरणात मंत्रमुग्धता पसरली होती.

कल्पना एकीकडे शांतपणे घागर फुंकत होती. भगवान परशुराम आणि कालीमाता यांच्यामधल्या वादात तिला बहुधा काहीच रस वाटत नव्हता. पुढल्या ऱ्बायका भराभर पुढं सरकल्या. इच्छित व्यक्तीच्या पाया पडून दुसऱ्या बाजूनं बाहेर पडल्या. गोळेही मग हळुवारपणे पुढं गेला. कल्पना एका कोपऱ्यात घागर फुंकीत उभी होती, तिकडे गेला. तिच्या समोर जाऊन त्यानं तिला काही तरी प्रश्न विचारला. कल्पनानं एका हातानं खूण केली, 'माझ्या पाया पडा!' गोळे चटकन खाली वाकला. कल्पनाच्या पायातल्या चादीच्या जोडव्यांकडे त्याचं लक्ष गेलं. तेवढ्यात त्याच्या डाव्या कुशीत भयंकर घाव बसला आणि तो खालीच कोसळला! त्याच्या पोटातून बांध फुटावा तसं भळभळ रक्त वाहू लागलं. मठात प्रचंड आरडाओरडा, धावपळ, गडबड आणि थरथर पसरली. समोरची प्रचीती पाहून लोक थक्क झाले होते, हादरले होते!

लोकानी जे पाहिलं होतं ते 'न भूतो न भविष्यति' असं होतं. ज्या वेळी गोळे कल्पनाच्या पाया पडण्यासाठी खाली वाकला तेव्हा दुसरीकडे कल्पनानं आपला उजवा हात वर उचलला. तिच्या वर गेलेल्या रिकाम्या हातात एक लखलख करणारा रामपुरी सुरा दिसत होता. ती प्रचिती पाहून लोक थक्क होणार एवढ्यात दुसरा एक जबरदस्त धक्का कल्पनानं दिला. त्या चाकूकडे वर पहात तिनं आपले डोळे गाईच्या डोळ्याएवढे मोठे केले आणि जीव एकवटून त्याचा पहिला जबरदस्त आडवा वार गोळेच्या डाव्या कुशीत केला! स्थूल अंगाच्या गोळेच्या पोटात तो रामपुरी सुरा भोपळ्यात शिरावा तसा शिरला आणि आतल्या भागात अडकला. तोच सुरा बाहेर ओढून कल्पनानं पुन्हा दुसरा वार गोळेच्या छातीत आणि नंतर गळ्यावर केला. हे वार करण्यामागं एवढी प्रचड ताकद होती की, तिसरा वार गळ्यावर झाल्यानंतर गोळेनं रक्ताच्या थारोळ्यात मान टाकली! उतारावरून पाण्याची धार वाहात जावी तसं रक्त वाट फुटेल तिकडे वाहू लागलं! गोळेच्या डोक्याजवळच लालीलाल झालेला तो प्रचीतीचा सुरा पडलेला होता आणि त्याच्यापासून पाच पावलावर जाऊन कल्पना घागर फुंकता फुंकता धापा टाकल्यासारखी बडबडत होती– 'पुन्हा तोच महिषासुर, तोच नराधम! पृथ्वीमाते, घाबरू नकोस. संकट टळलंय तुझ्यावरचं!' ह्या बडबडीनंतर कल्पना शात झाली. हळुवारपणे आपली घागर फुंकत राहिली. मठातले कार्यकर्ते, स्वयंसेवक, व्यवस्थापक भयंकर हादरले होते. जमलेली गर्दी वाट फुटेल तिथून पसार झालेली होती. त्या गर्दीबरोबरच सातोस्करही जीव घेऊन पळाला होता. अंगात आलेल्या इतर व्यक्ती मात्र तशाच–काहीच न झाल्यासारख्या शांतपणे घागर फुंकीत होत्या. धूप भरून देणाऱ्या एका सवाष्ण म्हातारीला मात्र तो प्रकार आणि उघडं रक्त पाहून फिट आली! तिच्यासाठी कांदा–चप्पल आणायला गेलेला स्वयंसेवक परत आलाच नाही! ती म्हातारी एकीकडे जिवंतपणी पडून होती. दुसरीकडे गोळेच प्रेत रक्तात मुरत होतं. सातोस्कर त्या वेळी अर्धमेला होऊन श्यामकांताला ती बातमी सागण्यासाठी रस्त्यावरून अस्ताव्यस्त अनवाणी धावत होता! श्यामकांतानं त्याच वेळी आपली दीर्घकथा वाचून संपवत आणली होती.

¤

नवनाथाच्या मठात मर्डर झालाय ही बातमी त्या रात्रपाळीच्या पोरगेल्या सबइन्स्पेक्टरला खरीच वाटली नाही! अशा खोट्या बातम्या काही 'उद्योगी' लोक निष्कारण फोन करून देत असतात, असा विचार त्या सबइन्स्पेक्टरच्या डोक्यात आला. तरी पण ड्युटी म्हणून त्यानं टेलिफोन आल्याची वेळ आणि एकदर प्रकार आपल्या रजिस्टरात लिहिला आणि झाला प्रकार आपल्या वरिष्ठाला कळवून हातातला दाणका हलवत आपल्या शिपायासह तो पोलीसजीपमध्ये येऊन बसला. जीप जीव घेऊन मठाकडे पळू लागली.

मठाबाहेर तर भलताच गोंधळ उडालेला होता. 'भगवान के मंदिर में भगवान के हाथो मर्डर हुआ!' हा नेमका प्रकार काय आहे हे बाहेरच्या पब्लिकला नीट कळलेलं नव्हतं. भोवतालची गर्दी कापत शिट्ट्या फुंकत पोलीसजीप मठाबाहेर येऊन उभी ठाकली. जीपचा श्वास थाबतोय न थाबतोय तोच त्यातून सबइन्स्पेक्टर आणि इतर निळ्या पोलिसानी टपटप उड्या मारल्या. ते मठाच्या फताड्या पायऱ्या चढू लागले. काही पोलीस बाहेरच थांबले.

मठाच्या आतलं धुपट वातावरण, अंगात आलेल्या सुवासिनी आणि इतराच्या घागरी, आडवे बाधलेले बाबू, तेजाळलेला महालक्ष्मीचा मुखवटा हे सर्व पाहून पोलीसपार्टी किंचित गोंधळली मग त्या पार्श्वभूमीवर वाहणारं गोळेचं लालभडक रक्त पाहिल्यानंतर ओळखीचा माणूस दिसल्यासारखे ते तिकडे धावले. गोळेचं प्रेत भयंकर दिसत होतं. मरताना त्या रक्ताच्या थारोळ्यातच तो काही क्षण विव्हळून विव्हळून तरफडला होता. त्यामुळं रक्तातल्या रक्तात निसरडही झालं होतं.

पाठोपाठ आणखी एक पोलीसव्हॅन आली त्यातून बरेच जण आले. पोलीस-फोटोग्राफर्स, ठसेतज्ज्ञ, डॉक्टर्स, वरिष्ठ अधिकारी, क्राइम ब्रँचचे लोक अशी पोलीसी गर्दी आता वाढत होती. आपले बूट खटाखट वाजवत ही मंडळी आत शिरत होती. बाहेर भित्र्या भाविकांच्या चपला बेवारशी मृतासारख्या उलटसुलट पडून होत्या. त्याचे मालक त्यांना मागं सोडून फरारी झाले होते. साक्षी पचनाम्याचं 'लफडं' त्यांनी टाळलं होतं.

एकीकडे पोलीस-डायरीत तपशील लिहिला जात होता. फोटोचा प्रकाश चमकत होता. पंचनामा हळूपणे चालला होता. मठाबाहेर भलताच कडक पोलीसबंदोबस्त असावा अस वातावरण निष्कारण तयार झालं होतं. एकंदर प्रकार नीट जाणून घेतल्यानंतर पोलीसहवालदाराला बेडीची जोडी घेऊन कल्पनाच्या दिशेने पाचारण करण्यात आलं. खुनी समोरच घागर फुंकत उभा आहे म्हटल्यानंतर त्या 'पोक्त' हवालदाराच्या हातच्या बेड्या शिवशिवल्या कल्पनाच्या हातातल्या लाल बांगड्या तशाच ठेवून त्यावर बेडी चढविण्याचा विचार त्या हवालदाराच्या डोक्यात घोळत होता. त्याच वेळी घरून मठाकडे निघालेले श्यामकांत आणि सातोस्कर मठाच्या फताड्या पायऱ्या चढत होते. सुन्न मनाने पाय रेटत होते.

'नाहीऽऽ!' बढेआजी किंचाळत त्या हवालदाराच्या अंगावर

धावल्या. त्या शांत भीतिदायक वातावरणात बढेआजींचं किंचाळणं आणि धावणं ऐकून बहुतेकांच्या अंगावरचे केस सरसरून उभे राहिले. काहीजणांच्या हृदयाचा ठोका चुकला. काही जण भयंकर दचकले. 'नाही, त्यांना बेडया नाही घालायच्या ! अंगात आलंय त्यांच्या. आमच्या महालक्ष्मीच्या हातात आम्ही बेडया नाही घालून देणार !' एवढं बोलून बढेआजींना फार दम लागला. आपल्या नऊवारी पातळानं चेहऱ्यावरचा घाम पुसून त्या मटकन खाली जमिनीवर बसल्या आणि धापा टाकू लागल्या. हवालदार गोंधळला. साहेबाकडे पाहू लागला. एकंदर प्रकार पाहून मठाचे उपाध्यक्ष पुढे आले. गळ्यातला तपकिरी स्कार्फ सावरत त्यांनी इन्स्पेक्टरांना जवळ बोलावलं. 'साहेब, बाईंना अशा स्थितीत पकडाल तर सर्वांच्या धार्मिक भावना दुखावतील. प्रकरण चिघळेल !' उपाध्यक्ष स्पष्ट शब्दात म्हणाले.

'पण आरोपीला ताब्यात घ्यावंच लागेल आम्हाला ताबडतोब !' इन्स्पेक्टरही करड्या आवाजात म्हणाले.

'तुम्ही अवश्य ताब्यात घ्या तुमचा आरोपी पण आत्ता नाही ! थोडं थांबा. रात्री बारानंतर अष्टमी उलटेल. बाईच्या अंगातील देवी अंतर्धान पावेल मग. एवढं सहकार्य करा ! अन्यथा माहीतच आहे तुम्हाला, निष्कारण दंगा होईल, हिंदू दैवताची विटंबना झाल्यामुळं.'

उपाध्यक्षाच एकंदर म्हणणं इन्स्पेक्टरांच्या लक्षात आलं असावं. शिवाय बारा वाजायला आता वीस-पंचवीस मिनिटंच बाकी होती. बाई तर अशा अवस्थेत होत्या की पळून जाणं त्याना शक्य नव्हतं. त्या डोळे मिटून घागर फुंकत होत्या. इन्स्पेक्टराना मुद्दा पटला. कल्पनाच्या अवतीभोवती दोन पुरुष हवालदार आणि एक स्त्री-पोलीस ठेवून इन्स्पेक्टरांनी रात्री बारापर्यंत बेडया मागं घ्यायचं मान्य केलं. बढेआजींनी निश्वास सोडला आणि नकळत देवीकडे पाहून नमस्कार केला.

श्यामकांत आणि सातोस्कर आत आले. आतल्या धुपट वातावरणात ठिकठिकाणी उभे असलेले पोलीस पाहून सातोस्कर सर्द झाला. त्याला फटकन हुंदका आला. अचानक श्यामकांताचं लक्ष गोळेच्या प्रेताकडे गेलं आणि त्यानं चटकन दोन्ही हातांनी सातोस्करचा आधार घेतला. काही क्षण आपली मान तशीच मागं वळवून त्यानं त्या दृश्याची नजर टाळली. 'आपण बाहेर पडू या ! सातोस्कर, मला काही पाहवत नाहीये इकडे !' श्यामकांत कसाबसा बोलला आणि बाहेरच्या बाजूला वळला. पलीकडे त्याच्याभोवती पोलिसांचा गराडा पडला आणि आढोशाला त्याच्यावर प्रश्नाच्या फैरी झडू लागल्या. पोलीस एक एक धागा जोडू लागले. एव्हाना घड्याळाचा काटा उचकू लागल्यासारखा बाराकडे सरकत होता. सातोस्करला वाटलं, ह्या घड्याळाचे ठोके आता पडूच नयेत ! अंगावर काटा आणणारे बारा ठोके ऐकण्याचं त्राण सातोस्करच्या अंगात उरलेलं नव्हतं !

तोफांच्या फैरी झडाव्यात तसे बाराचे ठोके पडले. तासकाट्यानं मिनिटकाट्याला घट्ट मिठी मारली. जुन्या पितळी लंबकाची हेलसांड तशीच चालू होती. सातोस्करनं कानात बोटं घातली. त्याचे हात थरथरत होते. मनगटाच्या वर खाली घाम साठला होता. श्यामकांताला बोलवत नव्हतं. अंथरुणावर जाऊन पडावं असं त्याला वाटू लागलं होतं. बढेआजींनी स्वत:ला खूपच सावरलं होतं. त्या इतरानाही सावरत होत्या. बाराच्या बाराव्या ठोक्याबरोबर अंगात आलेल्यांनी आपापल्या घागरी टाकल्या आणि आपलं मानवी शरीर मठाच्या फरशीवर धाडकन सोडून दिलं. जवळजवळ सतत सात तास उभं राहून घुमत राहिल्यामुळं ती मानवी शरीरं खूपच थकली होती. धापा टाकत होती.

हवालदार पुढं झाला. त्याच्या हातात बेडी लोंबत होती. केव्हा एकदा ती कल्पनाच्या हातात अडकतोय असं त्याला होऊन गेलं होतं. कल्पना फरशीवर निपचित पडली होती. इतरजणही तसेच पण स्वत:ला सावरून घेण्याचा प्रयत्न करीत होते. बढेआजी पाण्याचं ताब्याभांडं घेऊन कल्पनाजवळ आल्या. बेडीवाल्या हवालदाराकडे त्यांनी क्षणभर वाकडी नजर केली आणि कल्पनाला किंचित हलवून त्या म्हणाल्या, 'घ्या, पाणी प्या. बरं वाटेल !' कल्पना फुलपात्रभर पाणी प्याली. तो बेडीवाला हवालदार आता प्रथमच तिच्या नजरेस पडत होता. त्यांच्याकडे पाहात तिनं आठ्या घातल्या आणि 'हे का ऽ ?' असं खुणेनंच बढेआजींना विचारलं. त्यांनी निमूटपणे मान खाली घातली.

स्त्रीपोलीस पुढं झाली. हवालदाराकडून बेडया घेऊन तिनं त्या कल्पनाला ऑफर केल्या. 'हे काय ?' कल्पनानं गोंधळून जाऊन विचारलं. हवालदारानं फक्त आपली मान फिरवली आणि कल्पनाला अर्जुन गोळेचं लालभडक रक्त दाखवलं. एव्हाना पोस्टमार्टेमसाठी त्याचं प्रेत हॉस्पिटलात पोचलेलं होतं. ते रक्त पाहून कल्पनाच्या अंगावर काटा उभा राहिला. तिनं चटकन दोन्ही कानावर हात ठेवले आणि आपल्या सुंदर डोळ्याची हालचाल करीत विचारल,

'ईऽ ! कुणाचं हे रक्त ?'

'बाई, अर्जुन गोळेचं रक्त आहे हे ! त्यांचा खून केल्याच्या आरोपावरून आम्ही अटक करतोय तुम्हाला !' शेजारी उभे असलेले डिटेक्शन ऑफिसर म्हणाले.

'नाही, मी कुठे खून केलाय कुणाचा ? मला कशाला पकडताय, मला तर काहीच माहीत नाही होऽ !' एवढं बोलून कल्पना सर्वांसमोर ओक्साबोक्शी रडू लागली. बढेआजींनीही डोळ्यांना पदर लावला, अश्रूंच्या साक्षीनं शेवटी बेडी कल्पनाच्या मनगटात अडकली !

□

रात्रपाळीचे ॲक्टिंग संपादक अकाची जुळवाजुळव संपवून तंबाखूची डबी उघडून बसले होते. यंत्राचं काम चालावं तशी माणसाची कामं चाललेली होती आणि सकाळी सहाच्या ठोक्याला मुंबईकरांच्या हातात वर्तमानपत्र पडणार होतं. अगदी आयत्या वेळेला आपल्या हातात एखादी जबरदस्त स्टोरी येईल असं ॲक्टिंग संपादकांना मुळीच वाटत नव्हतं. पण त्याचा तंबाखू चुन्यात एकजीव होतोय न होतोय तोच टेलिफोन ठणाणला ! कुणा तरी हिंदी बोलणाऱ्या

**नाही, मी कुठे खून केलाय कुणाचा ? मला कशाला पकडताय ?**

माणसानं पलीकडून सांगितलं. 'इधर भगवान के हाथों मर्डर हुआ है साब, कल फोटु आयेगा नं साब, पेपर में ?' रात्रपाळीचे संपादक सावरून बसले. 'कौनसा मर्डर, किसका मर्डर, कब–कैसे–क्यूं–कहाँ–' संपादकाची धादल आणि प्रथम शंभर नंबर फिरवून पोलीसकंट्रोलरूमशी संपर्क. नंतर मात्र ते उठले आणि त्यांनी स्पॉट रिपोर्टिंगसाठी स्टाफ गोळा केला. अशी स्टोरी कव्हर करायलाच हवी होती. कारण नाही तर दुसरे दिवशी सकाळी संपादक गरम झाले असते ! फ्यूचर प्रॉस्पेक्टस्वर त्यामुळं परिणाम झाला असता.

आता तिथे 'कंटेम्प्ट ऑफ दि कोर्ट', वगैरेची पर्वा करत बसण्यात अर्थ नव्हता. कल्पनाला बेड्या घालत असतानाच बातमीदारांची गर्दी नवनाथाच्या मठाबाहेर जमा झालेली होती. त्यांना समजावता समजावता हवालदारांची पुरेवाट झाली. फोटोग्राफर्सनी निरनिराळ ॲंगल्स् साधून नवनाथाच्या मठाचे फोटो घेतले. आतल्या बाजूला मात्र कॅमेऱ्याना प्रवेश मिळाला नाही. मॅटर गोळा करून सिगरेट फुंकत रिपोर्टरमंडळी खमंग बातमी मिळाली म्हणून खुष होऊन निघून गेली!

दुसरे दिवशी दैनिकानी ह्या खुनाला मोठमोठाले आणि मजेशीर मथळे दिले. वाचक अवाक् झाले! घराघरातून ह्या खुनाची चर्चा सुरू झाली. देशभर निरनिराळ्या भाषातून, निरनिराळ्या लिप्यांतून कल्पनाचं, गोळेचं, नवनाथाच्या मठाचं नाव छापून आलं. संध्याकाळच्या सायं दैनिकांनी तर गोळेचा आणि कल्पनाचा फोटोही छापला. विषयातील नाविन्यामुळ सपादकाच्या एक दिवसाच्या एडिटोरियल्सची सोय लागली. शिवाय नंतर कोर्ट-प्रोसिडिंग्जनाही मजा येणार होती. पेपराचा खप वाढविण्यासाठी हा खून म्हणजे एक वरदान होतं !

¤

वर्तमानपत्रं घरोघर पोहोचली तशी ती सहानीकडेही पोहोचली. गोळेचा खून झाल्याचं वाचून त्याला अतिशय दुःख झालं. तो खून कल्पनाच्या हातून व्हावा ह्या दुर्दैवाबद्दल त्याला विषाद वाटला. ह्या गुन्ह्याबद्दल कल्पनाला काहीही सजा होता कामा नये, ती संपूर्णत: निर्दोष आहे, अशी सहानीची ठाम समजूत झाली. कल्पनाच्या हातात बेड्या पडाव्यात ही गोष्ट त्याला अतिशय खेदजनक वाटली; पण ह्या खटल्याचं शेवटी नेमकं होणार तरी काय ह्याचा विचार करून करून तो थकून गेला. तो सबंध दिवस उपवास केल्यासारखा सहानीनं बाटलीला स्पर्शही केला नाही !

¤

संतोष आगरवालनं जेव्हा सकाळी 'मुंबई समाचार' पाहिला तेव्हा त्याच्या डोळ्यांवरचा चष्मा जागच्या जागेवर थरथरला. एकदा गोळेला त्यानं लिफ्ट दिली होती. कल्पना पकडली जावी हे त्याला धंद्याच्या दृष्टीनंही चागलं लक्षण वाटलं नाही. तो मनातल्या मनात म्हणाला, "ह्या बाईचा त्यात काहीच दोष नाही. तिच्या अंगात देवी आली होती. तिनच जर हे केलं तर त्याची शिक्षा त्या बाईला का ?"

¤

पुरणगावाला जेव्हा ती बातमी मुकुंदराव चव्हाणानं वाचली तेव्हा त्याला आश्चर्य वाटलं. दरम्यान त्याचं लग्नही झालेलं होतं आणि एरणगावानं ते मागच प्रकरण आठवणीतून काढून टाकलेलं होतं. आप्पासाहेब चव्हाणनाही त्या बातमीमुळं थोडं विचित्र विचित्र वाटलं. मुकुंदराव मनातल्या मनात म्हणाला, "केस एकदम इंट्रेस्टिंग. कोर्टात जायला पाहिजे ऐकाला!"

¤

"सातोस्कर आणि सातोस्करकाकू ह्या दोघांनाही तीव्र मानसिक धक्का बसलेला होता. त्यामुळं ब्लडप्रेशरवर परिणाम होण्याची दाट शक्यता होती. ते दोघेही अंथरुणावर पडून होते. डॉक्टरांची तशी सक्त ताकीदच होती !

¤

गोळे वारला हे ऐकल्यावर सुदरलालशेठनं आपला जबडा तसाच बराच वेळ उघडा ठेवून आश्चर्य आणि धक्का व्यक्त केला. शेठाणीच्या अंगावर काटा आला. त्यामुळं तिनं खादे उडवले. पण हे पुढं फार वेळं चाललं नाही. पोलीसपार्टी सुदरलालशेठच्या वाड्यात शिरली आणि गोळेच्या घराचं कुलूप फोडती झाली. शेठ आणि शेठाणीलाही जबानी द्यावी लागली. शेठला उगाचच वाटलं की, ह्या प्रकरणात आपलाही फोटो कदाचित पेपरात छापून येईल! शेठाणीला सारखी भीती वाटू लागली की, पोलीस शेठला पण पकडतील का काय ?

¤

साने, धारगळकर, बढे वगैरे चाळीतली बिऱ्हाडं बिचारी घाबरूनच गेलेली होती. त्यातल्या त्यात त्याना कीव येत होती ती श्यामकांताची ! त्याचे मधल्या मध्ये हाल होते. त्याला चाळकऱ्यांची पूर्ण सहानुभूती होती. शक्य तेवढी मदत होती.

¤

नाथाकाका आणि काकू ह्याना ह्या प्रकरणामुळं शॉकच बसला. घटना घडली तेव्हा नीलू त्यांच्याकडेच होती. नाथाकाकांनी ताबडतोब रजा टाकली आणि ते श्यामकांताच्या मदतीला धावले. गोळेसारख्या माणसाला असं विचित्र मरण यावं याचं त्यांना वाईट वाटलं. कल्पनाची मन:स्थिती नेमकी काय असेल याची काळजी काकूना वाटत होती. त्यांनी ठरवून टाकलेलं होतं की, आता नीलूला आपल्याकडेच ठेवायची. लागल्या वणव्याची झळ तिला नाही लागू द्यायची !

¤

श्यामकांत जवळजवळ वेडापिसा झाल्यासारखा झाला होता. नाथाकाकांनीच चांगला वकील पाहिला. वकीलमंडळीना अशी केस म्हणजे मेजवानीच वाटत होती. एक तर प्रसिद्धी भरपूर आणि दुसरं म्हणजे प्रतिस्पर्धी वकिलाची भंबेरी उडविण्याची उत्तम संधी! शिवाय इंडियन पीनल कोडाच्या २९९ व्या कलमाप्रमाणे हा खटला धड होमिसाईडही ठरत नव्हता आणि ३०० प्रमाणे मर्डरही ठरत नव्हता. वकील ठरला ! नाथाकाका म्हणतील त्याप्रमाणे श्यामकांत मान हलवत होता. त्याचा आवाज घशातच अडकल्यासारखा झाला होता. अजूनीही त्याला नीट बोलवत नव्हतं. नाथाकाका आपल्या टकलावरचा घाम गंभीरपणे पुसत कर्तव्य पार पाडत होते !

केस लौकरच कोर्टात उभी राहणार होती. लोक विचार करीत

होते, अशा विचित्र खटल्यातून कल्पना निर्दोष सुटणार की फाशी जाणार ?

¤

अर्जुन गोळे खूनखटल्यासाठी पुरव्याची जमवाजमव ही साधी सोपी गोष्ट नव्हती. नेहमीच्या केसमध्ये जसे पुरावे गोळा करतात तसा प्रकार इकडे नव्हता. कुणाचा खून झालाय आणि तो कुणी केलाय हे केवळ पोलिसांनाच नव्हे तर संपूर्ण जगाला कळलेलं होतं. आय विटनेस म्हणून शे-सव्वाशे माणसं उभी करणं पोलिसांना अवघड नव्हतं. गोळेचा खून केल्यानंतर 'पृथ्वीमाते, तू आता मुक्त झालीयस संकटातून !' वगैरे असं काही तरी कल्पना बडबडली होती, ते लोकांनीही ऐकलं होतं. वरकरणी चित्र दिसतं होतं ते असं की, देवी महालक्ष्मीचा गोळे ह्या माणसावर कोप झाल्यामुळं त्याचा देवीच्याच हस्ते वध झाला. प्रचीतीनं निघालेला सुरा हा त्यासाठीचा दैवी पुरावा होता.

क्राइमब्रँचचे हुषार आणि नावाजलेले इन्स्पेक्टर आचार्य यांच्या हातात ह्या केसची सूत्रं सरकारनं सुपूर्द केलेली होती. ह्या केसची यशस्वी उकल हे आचार्यांपुढचं प्रचंड आव्हान होतं. केसची पार्श्वभूमी ऐकून स्कॉटलंड यार्डचे पोलीसही गोंधळून गेले असते याची आचार्यांना जाणीव होती. ह्या नाजूक केसचा ते अगदी बारकाईनं विचार करीत होते.

ह्या केसच्या संदर्भात आचार्यांची सर्वांत मोठी निराशा जर कोणी केली असेल तर ती खुद्द कल्पनानंच ! खुनाच्या दिवशी रात्री साडेबाराच्या सुमारास जेव्हा तिला पोलीसठाण्यावर आणण्यात आलं तेव्हा ती काहीही बोलण्याच्या मन:स्थितीत नव्हती. अंगात येऊन गेल्यानंतरचा जबरदत थकवा आणि गोळेच्या खुनाचा धक्का तिच्या चेहेऱ्यावर स्पष्ट दिसत होता. तिला सारखी ग्लानी येत होती. शेवटी आचार्यांनी तिला झोपण्याची परवानगी दिली. आचार्यांना ह्यामध्ये एक आशा वाटत होती की, कदाचित कल्पना झोपेत काही तरी बडबडेल आणि इथूनच कदाचित पहिला क्लू मिळेल; पण तसं झालं नाही. कल्पना शांत गाढ झोपून गेली. आचार्यांची झोप मात्र उडाली होती. आपल्या केबिनमध्ये बसून त्या खुनाच्या तपासासाठी डावपेचाचं जाळं विणू पहाणारं त्यांचं खाकी मन आता नेहमीसारखं साथ देत नव्हतं.

खुनाच्याच रात्री घेतलेल्या जबान्या, पंचनामा आणि इतर नोंदी ह्यावरून गोळे आणि कल्पना यांची चांगली ओळख होती, एवढंच नव्हे तर नेहमी येणं-जाणं होतं ही गोष्ट आचार्यांना कळली होती आणि म्हणूनच त्यांना ह्या प्रकरणात दैवी कोपापेक्षा खुनाचाच वास अधिक येत होता. त्यांचं पोलिसी मन मग भोवऱ्यात फिरणाऱ्या कागदासारखं त्याच त्याच ठिकाणी घुटमळत राही.

दुसरे दिवशी सकाळी कल्पना झोपेतून उठल्यानंतर पोलीसस्टेशनवर थोडा गोंधळ उडाला. आजूबाजूचा पोलीसलॉकअप आणि भीतीचं वातावरण पाहून कल्पनाला रडू कोसळलं. ओक्साबोक्सी रडत रडत तिनं डयुटी-हवालदारांपासून ते आचार्यांपर्यंत सर्वांना एकच गोष्ट विनविली, 'मला खरंच काहीच माहीत नाही हो! मी नाही केलेला कधी कोणाचा खून-मला सोडा!' तिचं ते रडणं, अस्ताव्यस्त पसरलेले लांबसडक केस आणि उतरलेला चेहरा हे पोलीसमंडळींना नेहमीपेक्षा थोडं वेगळं वाटत होतं. आचार्यांनी आटोकाट प्रयत्न करूनही कल्पनानं काहीच माहिती दिली नाही. आचार्य प्रश्नांवर प्रश्न विचारत, कल्पना 'माहीत नाही, आठवत नाही' इतकंच सांगत राहिली. शेवटी आचार्यांनी तिच्याकडून माहिती काढण्याचा प्रयत्नच सोडून दिला. त्याच इंट्रॉगेशनरूममध्ये भलेभले गुन्हेगार आचार्यांनी उघडे पाडले होते; पण ह्या केसमध्ये आचार्यांना तेथून हात हलवत परतावं लागलं !

तपासासाठी घेतलेला १४ दिवसांचा रिमांड काही प्रमाणात उपयोगी पडला. काही महत्त्वाचे धागेदोरे जमा झाले; पण केस अद्यापही आचार्यांच्या हाताबाहेरच उभी होती. तपासातला सर्वांत महत्त्वाचा धागा असलेला तो अणकुचीदार रामपुरीछाप चाकू हवेतून कसा आला हे जरी आचार्यांना कळू शकलं नाही तरी चाकूच्या निरीक्षणानंतर त्याच्या मुठीशी आडवी कोरलेली 'डिलक्स' ही अक्षरं त्यांना सतावू लागली. देवीनं प्रचीतीनं काढलेला चाकू, तर मग त्यावर 'डिलक्स' ही अक्षरं कशी ? कुठली ही डिलक्स कंपनी? ह्या कंपनीचे चाकू विकणारे कोण कोण आहेत ? वगैरे प्रश्न आचार्यांच्या नजरेसमोर फटाफट उठून उभे राहू लागले. हा मुद्दा आचार्यांनी क्राइमब्रँचमध्ये केस पिकलेल्या एका हवालदाराकडे दिला आणि तो तपासासाठी साध्या वेषात बाहेर पडला.

¤

हवालदाराला चाकूच्या तपासासाठी बाहेर पाठवल्यानंतर आचार्यांना स्वत:चच हसू आलं. प्रचितीच्या चाकूवर संशय व्यक्त करतांना कल्पनाच्या अंगात आलेलं नव्हतं हे सिद्ध करण्याची जबाबदारीही मग आचार्यांवर होती. अष्टमीच्या दिवशी कल्पनाच्या अंगात आलेलं नव्हतं, हे जर आचार्य सिद्ध करू शकले असते तर प्रत्येक शुक्रवारी कल्पनाच्या अंगात येत नव्हतं हेही आपोआपच सिद्ध झालं असतं. म्हणजेच दर शुक्रवारी खोटं अंगात आणून कल्पना भक्तगणांना फसवत होती हाही आणखी एक ४२० चा आरोप कल्पनावर लागला असता.

आचार्यांना ह्या 'जर' आणि 'तर'च्या लढाईत विजय मिळणं जवळजवळ अशक्य होतं.

¤

विचार करता करता आणखी एक महत्त्वाचा मुद्दा आचार्यांच्या डोक्यात आला. दर शुक्रवारी कल्पनाच्या अंगात येत असे. खून झाला त्या दिवशी मंगळवार होता. म्हणजे ह्याही शुक्रवारी कल्पनाच्या अंगात येणार काय ? आचार्यांपुढे आणखी एक प्रश्न उभा राहिला. ह्या शुक्रवारी लॉकअपमध्ये तिच्या अंगात आलं तर काय पावलं उचलायची ? एकामागोमाग एक प्रश्नचिन्हं वाढत होती. कल्पनाचं अंगात येणं हे खोटं होतं ही गोष्ट आपल्याला पंचांसमक्ष सिद्ध करता येईल काय ? हे नाजूक काम कसं करायचं ? आचार्य जसाजसा

**पण केस अद्याप आचार्यांच्या हाताबाहेरच उभी होती....**

विचार करत होते तसतसे ते खोल खोल रुतत गेल्यासारखे झाले होते.

पोरगेल्या ज्युनियर सबइन्स्पेटरनं चर्चेत बोलताबोलता आणखी एक महत्त्वाचा मुद्दा दिला. त्याच्या म्हणण्याप्रमाणे अंगात येणं हे संपूर्णत: झूठ असं सिद्ध करणं अवघड होतं; परंतु अंगात आल्यानंतर 'मानवी भान' काही प्रमाणात जागृत असतं आणि त्या जागेपणीच कल्पनानं हा खून केला हे जर सिद्ध करता आलं तर पोलिसाच्या पदरात ही केस पडणार याची निश्चिती होती. मानसशास्त्राचा हा मुद्दा निश्चतपणे महत्त्वाचा होता. कोर्टातही त्यावर खल होणार ह्याची आचार्यांना कल्पना होती. त्यानी ठरवलं, ह्यासाठी एका कसलेल्या मानसशास्त्रज्ञाची मदत घ्यायची आणि तीही ह्या येत्या शुक्रवारीच ! कल्पनाच्या अंगात आल्यानंतर तिला Psychic treatment द्यायची. ह्या विचाराच्या भरात आचार्यांनी टेलिफोन उचलला आणि मुबईतले सुप्रसिद्ध सायकिॲट्रिस्ट डॉ. धारकर याचा नंबर फिरवायला सुरुवात केली.

¤

एका बाजूला आचार्य पुराव्याचं जाळं विणण्याचा प्रयत्न करीत होते, दुसऱ्या बाजूला कल्पना लॉकअपमधल्या भयाण एकाकी वातावरणात अक्षरश: कोमेजत चालली होती. नीलूच्या आठवणीनं ती वेडी होत होती. नेहमी स्वयंपाकघर आणि चाळीत मोकळ्या गप्पांच्या वातावरणात राहिलेली कल्पना लॉकअपच्या गजामागं पुटं चढलेल्या फरशीवर वेळ घालवत होती. 'आपल्या मुलीला भेटायचय, नवऱ्याला भेटायचंय' ही विनंती ती वारंवार पोलिसांना करीत होती आणि आचार्यांनी तिच्या विनंतीला होकारही दिलेला होता.

जेव्हा श्यामकांत आणि नाथाकाका नीलूला घेऊन आले, तेव्हा लॉकअपच्या गजांना भिडून तिनं दोन्ही हातांनी नीलूच्या सोनेरी केसांवरून हात फिरविला. तो प्रसंग पाहून एरवी गुन्हेगारांचं रक्त फुटेपर्यंत हात चालविणारा काळा राकट हवालदारसुद्धा 'च्या आयची' अस मनातल्या मनात गदगदून ओरडला ! आपल्या आईला असं कोंडून का ठेवलंय हे लहानग्या नीलूला कळत नव्हतं. तिनं आपल्या आईला गोड आवाजात बोबड्या सुरात तिला घरी चलायला सांगितलं, तेव्हा कल्पनाला हुंदका दाटून आला. ती ओक्साबोक्शी रडू लागली ! 'खरचं सांगते हो, मी नाही केला गोळेभावजीचा खून, खरचं सांगते ! उगाच पकडलयं मला !' कल्पना रडत रडत बोलत होती. श्यामकांत साफ कोसळल्यासारखा होऊन गेला होता. नाथाकाका दोघांनाही सावरत होते, धीर देत होते. देवावर विश्वास ठेवायला सांगत होते. आईला रडताना पाहून मग नीलूनंही जोराचं भोकाड पसरलं आणि त्या पोलीसलॉकअपबाहेर काही क्षण असह्य कटकट झाली. नीलू, श्यामकात आणि नाथाकाका तिघंही तिथून गेल्यानंतर दोन्ही तळव्यात तिनं आपला सुंदर पण आता उतरलेला चेहरा झाकून टाकला ! रोज सकाळी उठली की कल्पना हवालदाराला जवळ बोलावून 'आपल्या मुलीला भेटायचंय, तिला आणायला सांगा !' असं हक्कानं सागितल्यासारखं सागायची. त्यासाठी ओरडायची आणि रडायची !

जे जे शक्य ते ते पोलीस करीत होते. एका बाजूला कल्पनाला शक्यतो चांगली वागणूक आणि दुसऱ्या बाजूला तिच्या विरुद्ध साक्षीपुराव्याची साखळी अशा दोन्ही तोंडांकडून ते फास आवळण्यासाठी ताकद लावत होते.

¤

डॉ. धारकरांना कुठलाही प्रयत्न करता आला नाही. मानसशास्त्राचं त्यांचं ज्ञान कल्पनापुढं कुचकामी ठरल्यासारखं झालं Human consciousness बाबतचा मुद्दा पोलिसाना कोर्टात वापरता येणार नाही आणि कल्पनाचं अंगात येणं खरं की खोटं हेही सिद्ध होऊ शकणार नाही अशी परिस्थिती त्या शुक्रवारी निर्माण झाली. आचार्य मनातून खूपच निराश झाले !

डॉ. धारकरांनी शुक्रवारच्या आपल्या बहुतेक सर्व अपॉइन्टमेंटस् रद्द केलेल्या होत्या आणि एका इंटरेस्टिंग पेशंटला पहाण्यासाठी ते भल्या सकाळी पोलिसात येऊन दाखल झाले होते. आपल्या गोड गोबऱ्या चेहेऱ्यावरचा चष्मा नीट करून ते आचार्यांकडे पाहून ओठात मंद हसले आणि समोरच्या खुर्चीत त्यांच्या खास लकबीनं हात टाकून रेलून बसले.

तो शुक्रवार तसाच गेला. त्या सबंध दिवसभर कल्पनाच्या अंगात आलंच नाही. ती नेहमीसारखीच चिंताग्रस्त आणि कोपऱ्यात बसून राहिली. आचार्य डॉक्टर धारकराना घेऊन जेव्हा लॉकअपपाशी गेले त्या वेळी कल्पनाच्या अंगावर पांढरी साडी होती, केस नीट विंचरलेले नव्हते, डोळे तारवटलेले दिसत होते, कपाळावरचं कुंकूही नीट जागेवर नव्हतं.

कल्पनाला पाहून डॉक्टर धारकर चक्रावून गेले. ह्या नाजूक स्त्रीनं एवढ्या निर्घृणपणे खून केला असेल ही गोष्ट मानायला त्या मानसशास्त्रज्ञाचं मन तयार होईना. कल्पना शांतपणे उठून उभी राहिलेली पाहून आचार्यही थोडेसे चक्रावले. कारण एव्हाना अंगात येण्याची काही चिन्हं तिच्यात दिसायला हवी होती; पण तसं तिच्या चेहेऱ्यावर काहीच दिसत नव्हतं.

आपल्याला इतर कुणाशी काहीही बोलण्याची अजिबात इच्छा नाही, असं कल्पनान स्पष्ट सागितलं आणि धारकराशी बोलायला आणि त्याच्या प्रश्नांची उत्तर द्यायला तिनं नकार दिला "आज तुमच्या अगात का नाही आलं ? शुक्रवार आहे आज!" ह्या आचार्यांच्या बोलण्यावर कल्पना म्हणाली, "अंगात येणं न येणं हे माझ्या हातात नाही!"

कल्पनाच्या असहकार्यामुळं तिच्यावर मानसिक उपचार आणि प्रयोग करणं आचार्यांना शक्य झालं नाही.

तो दुवा न साधता आल्यानं ते थोडे खट्टू झाले; परंतु खून झाल्या दिवसापासून तिच्या अंगात येण्याचं बंद व्हावं हा मुद्दा पोलिसांच्या जमा बाजूकडेच पडणार होता. तेवढंच आचार्यांना समाधान होतं. धारकरांना मात्र तो दिवस फुकट गेल्याचं दु:ख झालं. कल्पनाचा विचार करीत आपली गाडी घेऊन ते हॉस्पिटलात निघून गेले.

¤

जेव्हा जेव्हा कोर्टात अर्जुन गोळे खूनखटल्याच्या तारखा लागू लागल्या त्या त्या वेळेस कोर्टात प्रचंड गर्दी उसळली त्या गर्दीला आवरताना आणि गप्प करताना पोलिसांची दमछाक झाली! न्यायाधीशमहाशयांना चित्रपटासारखं खरोखरच सारखी हातोडी आपटावी लागेल अशी परिस्थिती होती. वर्तमानपत्राचे बातमीदार शब्द न शब्द लिहून घेत होते. अक्षर न अक्षर छापत होते. साक्षीदार कावऱ्याबावऱ्या

नजरेनं कल्पनाकडे पहात पिंजऱ्यात येऊन शपथेवर साक्ष देत होते. त्यांची साक्ष ऐकायला कोर्टात जमलेली गर्दी पाहून बाहेर बसणारा टायपिस्ट आपली बोटं उचलत म्हणाला, "साला, रेडिओवर कॉमेंट्रीच करायला पाहिजे या खटल्याची!"

आश्चर्याची गोष्ट म्हणजे जग्गू चाकूवाल्यानं कल्पनाला बरोबर ओळखलं होतं. त्यानं कल्पनाला विकलेला चाकूही अनेक चाकूंमधून ओळखून काढला होता.

मुकुंदराव चव्हाणानं जग्गू चाकूवाल्याची साक्ष ऐकली होती. एरणगावाला आपल्या मळ्यात पेंडाच्या माडवाखाली बसून सिगरेट फुंकता फुंकता तो ती साक्ष आठवत होता, डोळ्यांपुढं आणत होता—

"तुझं पूर्ण नाव काय?"

"जगन भालो चव्हाण, साहेब!"

"बरं. जगन, मला असं सांग की ह्या बाईंना तू ओळखतोस?"

"हां, वळखतो!"

"कसा?"

"ह्या बायनं माझ्याकडून चाकू विकत घेतला व्हता. फणस कापायला चाकू पायजे असं म्हणाली व्हती मला आणि चाकूचे दोन रुपये पाडून पाडून मागितले. साहेब, आठ रुपयाचा चाकू साहेब, मी ह्या बायला सा रुपयाला दिला. हां साहेब!"

ही साक्ष चालू असताना कल्पना मध्येच मोठ्यानं ओरडली, "नाही नाही, खोटंय, हे खोटंय. साफ खोटंय!"

"आता तिच्यायला." जग्गू चाकूवाला तोंडावर बोट ठेवून अवाक झाला. "बाय माणूस इक्त खोट बोलती! आवो, बाई तवा नाह्य का तुम्ही गर्दीत आला व्हता सांजेच्या येळला. मी बत्ती पेटवत होतू..."

मुकुंदरावाला आठवलं. न्यायमूर्तींनी हात आपटून चकित झालेल्या जग्गू चाकूवाल्याला गप्प केलं आणि विचारलेल्या प्रश्नांपुरतीच उत्तरं द्यायला सांगितलं. कल्पनाच्या वकिलानी जग्गूची उलटतपासणी घेतली आणि जग्गूची भंबेरी उडवल्याचंही मुकुंदराव आठवत होता—

"जग्गू, तू कोर्टात कितव्यांदा साक्ष देतोयस रे?"

"तशी साहेब, दोन–तीन लफड्यात साक्ष दिलीय!"

"अच्छा, जग्गू मला सांग, की तू तिकडे तुझ्या चाकूची गाडी लावतोस त्याच्या समोर चाकूचं आणखी एक दुकान आहे?"

"असल साहेब!"

"मी म्हणतो की तू विनापरवाना तिकडे गाडी लावतोस आणि पोलिसांनी तुला त्रास देऊ नये म्हणून तू ही खोटी साक्ष देतोयस!"

मुकुंदरावाला अधूनमधून ती साक्ष आठवत राहिली. तो एकंदर केसवर उगाचच विचार करत होता. मंद वाऱ्यावर समोर उसाचे तुरे थरथरत होते. मुकुंदराव प्रत्यक्ष ऐकलेली साक्ष आणि वर्तमानपत्रात आलेली साक्ष ताडून पहात होता.

¤

(क्रमश:)

---

**भा. क. संघटना...**

पृष्ठ ३ वरून

दि. १५ व दि. १९ रोजी प्रभारी प्रकल्प व गटविकास-अधिकारी आणि शिक्षणाधिकारी श्री. दवडे यांना व दि. २० रोजी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. काबळे याना दिली असून परीक्षा पुन्हा घेण्याची मागणी केली आहे.

उपरोक्त ४ गावाशिवाय खंडकाळे खुर्द व बुद्रुक, खडकी, भूषा, सोन बुद्रुक गावातही परीक्षा झाल्या नाहीत अशी निश्चित माहिती मिळाली असून एकूण निम्म्यापेक्षा जास्त शाळात परीक्षा झाली नाही असेही पत्रकात म्हटले आहे.

अशी स्थिती उद्‌भवेल असा इशारा दि ९ मार्च १९८२च्या पंचायत समितीच्या सभेत एक ठराव करून देण्यात आला होता; पण जि. प. व संबंधितानी त्याची दखल घेतली नाही, त्याचीही चौकशी करावी, अशी मागणी पत्रकात केली आहे.

सातपुड्याच्या ३ऱ्या व ४थ्या रांगेत असलेल्या या तालुक्यात ज्या शाळा आहेत, तेथे शिक्षक कधी जात नाहीत आणि शाळेचे सारे खोटे दप्तर तयार करून फक्त पगार घेतात व त्याच पद्धतीने परीक्षाही घेतात आणि न शिकता व परीक्षा न देता वर्षानुवर्ष विद्यार्थी पुढच्या वर्गात पाठवले जातात आणि त्यामुळे प्राथमिक शाळेनंतर पुढे शिकण्याचा प्रश्न आणि सधी संपत. पहाडातला आदिवासी विद्यार्थी कायम अज्ञानातच राहतो आणि परिणामतः दारिद्र्यात खितपत पडतो. ह्या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेऊन उच्चस्तरीय चौकशी व्हावी आणि पुन्हा परीक्षा घ्याव्या व मास्तरांना गावोगावी शाळा चालविण्यास भाग पाडावे अशी कळकळीची मागणी पंचायत समितीचे तरुण सभापती रूपसिंग पराडके आणि भारतीय कष्टकरी संघटनेचे धरमचंद चोरडिया व लक्ष्मण कदम यांनी केली आहे.

धुळे–दि. २३।४।८२

वीस व्यक्तिशोधांचा संग्रह

**देवाघरचा पाऊस**

लेखक : रवींद्र पिंगे

आवृत्ती : दुसरी

किंमत : दहा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे

दूरदर्शन

# सत्यजित रे आणि 'सद्‌गती'

अविनाश सहस्रबुद्धे

मुन्शी प्रेमचंदाच्या कथेवरचा 'शतरंज के खिलाडी' दिग्दर्शित केल्यावर आता प्रेमचंदांच्याच कथेवरचा 'सद्‌गती' हा लघुचित्रपट सत्यजित रेंनी दूरदर्शनसाठी तयार केला आहे. गेल्या रविवारीच मुंबई दूरदर्शनने तो दाखवला.

बी. डी. गर्ग यांनी सत्यजित रेंवर एक लघुचित्रपट काढला आहे, 'क्रिएटिव्ह आर्टिस्ट ऑफ इंडिया.' त्यात सत्यजित रे एका प्रश्नाचे उत्तर देताना सांगतात की, 'मी चित्रपटमाध्यमाकडे वळलो ते त्या माध्यमावरील उत्कट प्रेमापोटी.' मध्यप्रदेशातील एका खेडेगावात 'सद्‌गती' चेच चित्रीकरण चालू असतानाची गोष्ट. रेंचा रक्तदाब वाढल्याची शंका येऊन त्यांच्या पत्नीने शेजारच्या गावातून डॉक्टराना बोलावून आणले. डॉक्टरांनी बी. पी. घेताना सहज रेंना त्यांचे वय विचारले. 'साठ' रेंनी, सांगितले. त्यावर डॉक्टर म्हणाले, 'या वयातही तुमची प्रकृती चांगली आहे. बी. पी. ही 'नॉर्मल' आहे. रे लगेच हसत म्हणाले, 'आय कीप बेस्ट व्हेन आय ॲम शूटिंग.' याचे कारणही चित्रपटकलेवरचे रेंचे गाढ प्रेम हेच आहे.

'शतरंज के खिलाडी' च्या निर्मितीच्या वेळीच रेंनी झपाटलेल्या अवस्थेत प्रेमचंदांच्या इंग्रजीत अनुवादित झालेल्या बहुतेक सर्व कथा वाचून टाकल्या. 'सद्‌गती' ही त्यांनी इंग्रजीतच वाचली व त्याच वेळी त्या कथेने चित्रपटासाठी त्यांच्या मनात घर केले. नंतर केव्हा तरी दूरदर्शनने त्यांना दूरदर्शनसाठी लघुचित्रपट काढायला सांगताच त्यांनी लगेच 'सद्‌गती' चीच त्यासाठी निवड केली. कारण 'सद्‌गती' तील सामाजिक आशय त्यांना आजच्या संदर्भातही उपयुक्त वाटला. शिवाय या कथेत दृश्य माध्यमासाठी अनेक चांगल्या जागा आहेत, असे त्यांना कथेच्या प्रथम वाचनातच जाणवले. रेंच्या मते प्रेमचंदांच्या या लघुकथेत श्रेष्ठ साहित्यकृतीची सर्व तत्त्वं आढळतात.

सत्यजित रेंनी दूरदर्शनसाठी 'सद्‌गती'च्या निर्मितीचा निर्णय घेताच त्याबद्दल उलट–सुलट प्रतिक्रिया सुरू झाल्या. पन्नास–साठ वर्षांपूर्वी प्रेमचंदांनी लिहिलेली कथा. त्या काळाइतका आज अस्पृश्यतेचा प्रश्न बिकट राहिलेला नसून चित्रपटातून तो उकरून काढल्यास स्पृश्य–अस्पृश्यामधील तणाव नव्याने प्रकट होईल असे काहींचे म्हणणे; परंतु रेंचा या कथेकडे पाहाण्याचा दृष्टिकोनच भिन्न आहे. त्यांना 'सद्‌गती' ही कथा काळाच्या बंधनात अडकून रहाणारी कथा वाटत नाही, तर ती कुठल्याही काळात समकालीन वाटावी अशी कालातीत आहे असे ते समजतात. शिवाय या कथेत प्रेमचंदांनी फक्त स्पृश्य–अस्पृश्यामधील जातीय विषमतेचा प्रश्न उपस्थित केला नसून या प्रश्नाचे स्वरूप मुळातून संपन्न व विपन्न, शोषक व शोषित यांच्यातील संघर्ष हा आहे असे त्यांना वाटते. 'सद्‌गती' ही मनुष्याद्वारे मनुष्याच्या होणाऱ्या शोषणाची कथा आहे. त्यांनी एका मुलाखतीत सांगितले होते की, 'जेव्हा कधी मी बनारसला जातो व तिथले मानवी जीवन पहातो तेव्हा वाटतं की, गेल्या पाच हजार वर्षांत भारतीय समाज बदललेलाच नाही. या भूमीत साम्यवाद येण्याची सुतराम शक्यता नाही. आजही काशीनगरीत असे ब्राह्मण आहेत जे अस्पृश्यांच्या प्रेताला हात लावायला तयार होणार नाहीत! आजही जर ही परिस्थिती आहे तर 'सद्‌गती' आजच्या संदर्भात विसंगत कशी ठरू शकते?' रेंचा हा प्रश्न रास्तच आहे. चित्रपटातील ब्राह्मणाप्रमाणे अस्पृश्य व्यक्तीचे प्रेत आज कदाचित फरफटत नेले जाणार नाही; पण म्हणून या प्रश्नाची तीव्रता कमी झाली आहे असे आजचे खेड्यापाड्यातील दलित–जीवन पाहिल्यावर म्हणता येणार नाही. आजही दलित समाजाचे तेच प्रश्न आहेत जे पन्नास–साठ वर्षांपूर्वी प्रेमचंदांनी ही कथा लिहिली त्या वेळी होते. स्पृश्यास्पृश्यता आज जरी तेवढी पाळली जात नसली तरी दलितांच्या आर्थिक–सामाजिक परिस्थितीत फारसा फरक स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही पस्तीस वर्षांत पडलेला नाही! शंकरराव खरातांच्या 'तराळ–अंतराळ' या आत्मचरित्रातही 'सद्‌गती' तील प्रसंगासारखाच एक प्रसंग आहे. 'सद्‌गती'त दुखिया चांभाराला ब्राह्मणाने आपल्या घरी मुलीच्या लग्नाचा मुहूर्त काढून द्यायला यावे असे वाटत असते. त्यासाठी तो ब्राह्मणाला बोलवायला जातो. ब्राह्मण आधी टाळाटाळच करतो. मग नंतर त्याला घरातली कामं करायला सांगतो. लाकडं फोडायला सांगतो. ब्राह्मणाने आपल्या घरी यावं म्हणून दुखिया तो सांगेल ती कामं करतो. लाकडं फोडायलाही तयार होतो. 'तराळ–अंतराळ' मधील शंकररावांच्या वडिलांना, 'अण्णाला'ही त्याला आलेलं पत्र वाचून घेण्यासाठी गावातील मास्तराच्या घरची लाकडं उन्हातान्हात फोडावी लागतात. लाकडं फोडून झाल्यावरच मास्तर पत्रातला 'अण्णाची बहीण तिच्या गावी निधन पावल्याचा' मजकूर अण्णाला सांगतो.

सत्यजित रेंनी 'सद्‌गती'ची चित्रपटा-

साठी निवड केली त्यामागे त्यांना कथेतील सामाजिक आशय त्यांच्या मनाला स्पर्शून गेला, हे जसे एक कारण तसाच त्यांचा चित्रपटमाध्यमाकडे बघण्याचा विशिष्ट दृष्टिकोण हे दुसरे कारण. आज कलात्मक चित्रपटनिर्मितीच्या जागतिक नामावळीत सत्यजित रेंचे नाव पहिल्या श्रेणीत मानले जाते. कलात्मकतेचे भान रेंच्या चित्रपटांमध्ये नेहमीच असते, हे जरी खरे असले तरी रे चित्रपटांना फक्त कलामाध्यम समजत नाहीत, तर ते एक महत्त्वाचे लोकमाध्यम आहे, हा विचारही त्यांच्या चित्रपटनिर्मिती-मागे नेहमी असतो. 'सद्‌गती'च्या निर्मिती-मागेही हाच विचार प्रामुख्याने आहे. आज दुर्बोधता व कलात्मकतेची जी जोड प्रायोगिक किंवा कलाचित्रपटामध्ये (मायादर्पण, दुविधा, घाशीराम कोतवाल, उसकी रोटी, सतह से उठता आदमी इत्यादि) पहायला मिळते ती सत्यजित रेंना मान्य नाही. चित्रपट हा आजच्या समाजवास्तवाशी नातं सांगणारा असला पाहिजे, शिवाय तो सर्व-साधारण प्रेक्षकांना समजला पाहिजे, अशीच त्यांची धारणा आहे. कारण चित्रपट हे एक प्रभावी लोकमाध्यम आहे, असे ते समजतात. दलित समाजावर आजही होणारे अन्याय, त्याचे शोषण याचे चित्र 'सद्‌गती'मध्ये पहायला मिळते व ते प्रेक्षकांपर्यंत प्रभावीपणे नेता येईल असे वाटल्यानेच त्यांनी 'सद्‌गती' कथेची चित्रपटासाठी निवड केली.

'सद्‌गती' पाहिल्यावर चटकन जाणवते ते हे की, प्रेमचंदांना त्यांच्या कथेतून जो सामाजिक प्रश्न, जे वास्तव उभे करायचे होते, ते सर्व रेंनी पडद्यावर अत्यंत सूचकतेने व तितक्याच प्रभावीपणे उतरवले आहे. सत्यजित रेंच्या आजपर्यंतच्या चित्रपट-परंपरेतलाच हा चित्रपट आहे. इतकेच नव्हे तर रेंच्या पहिल्या चित्रपटाशी—'पाथेर पांचाली'शीही त्याचे अनेक बाबतीत साम्य आहे. 'पाथेर पाचाली'ही विभूतीभूषण भट्टाचार्यांची कादंबरी १९३० साली बंगाल-मधल्या लोकप्रिय दैनिकात क्रमशः प्रसिद्ध झाली. वाचकांना ती कादबरी आवडली नाही तर तिचे प्रकाशन स्थगित करण्यात येईल असे लेखकाने आधीच जाहीर केले होते. कादंबरी आत्मचरित्रात्मक होती व पार्श्वभूमी बंगालमधल्या दुष्काळग्रस्त खेड्याची होती. त्या कादंबरीला पुस्तकरूपाने प्रसिद्ध करायला कोणताही प्रकाशक धजत नव्हता; परंतु कादंबरीचा पुढचा भाग अपु अन् दुर्गा क्रमशः प्रसिद्ध व्हायला लागल्यावर वाचकांच्या प्रतिक्रिया बदलल्या! मग मात्र पुस्तक रूपातही 'पाथेर पांचाली' चांगलीच गाजली!

आपल्या पहिल्या चित्रपटासाठी सत्यजित रेंनी 'पाथेर पाचाली' कादंबरीचीच निवड का केली? रे म्हणतात, 'कादंबरीतील मानवतेचा स्पर्श, वास्तवाचे दर्शन व सत्याची कास या तीन गोष्टींनी मला तिच्यावर चित्रपट काढण्यास प्रेरित केले.' 'सद्‌गती'च्या बाबतीतही नेमके हेच म्हणता येईल. 'पाथेर पांचाली'च्या निर्मितीच्या वेळी डि-सिकाच्या 'बायसिकल थीफ'चा आदर्श त्यांच्यापुढे होता. त्यांनी कादंबरी वाचली त्याच वेळी चित्रपटाची पटकथा त्यांच्या डोळ्यांपुढे उभी रहायला लागली. त्यातील पात्रं अपू, दुर्गा त्यांचा पाठपुरावा करू लागली. सत्यजित रेंनी चित्रकलेचे धडे शांतिनिकेतनमध्ये नन्दलाल बसु या प्रख्यात चित्रकाराच्या हाताखाली घेतले होते. त्यामुळे कथा हाताशी येताच त्यावरून चित्रपटकथा तयार कर-ताना प्रत्येक दृश्याचे रेखाकन ते स्वतः सहजपणे करतात. त्यात कॅमेऱ्याचा वापर, अँगल, की-शॉटचे कांपोझिशन सर्व काही आधीच तयार असते. निर्माता, पटकथाकार, दिग्दर्शक, संगीतकार अशा विविध भूमिका रे एकाच वेळी अत्यंत कुशलतेने पार पाड-तात. 'पाथेर पांचाली'प्रमाणेच 'सद्‌गती'च्या निर्मितीतही त्यांनी या सर्व भूमिका एकटयाने बजावल्या आहेत! 'पाथेर पांचाली' व 'सद्‌गती' दोन्ही चित्रपटांचं सारं चित्रीकरण लोकेशनवर होतं. 'सद्‌गती'च्या चित्री-करणासाठी रेंनी मध्यप्रदेशातील रायपूर


**दलित-दलितेतर या भेदांना ओलांडून जाणारे गोष्टीरूप आंबेडकर चरित्र**

सर्व मराठी मुलांच्या हाती हा 'कथा-संग्रह' देणे योग्य ठरेल! दलित—दलितेतर या भेदांना ओलांडून जाणारा हा स्फूर्तिदायक कथा-संग्रह संस्कारक्षम मुलांना अत्यंत उद्‌बोधक वाटेल. इतिहासाचे सर्जनशील साहित्यात कथारूपाने जे रूपांतर होते ते सिद्धहस्त लेखक कसे सोन्यासारखे करून दाखवितो त्याचा पुरावा बागुलांच्या या गोष्टीरूप चरित्रातून मिळतो.

—रा. ग. जाधव
(केसरी, रविवार, ६-१२-८१)

# आं बे ड क र भा र त

लेखक बाबुराव बागुल

राजहंस प्रकाशन, पुणे. मूल्य : वीस रुपये

जिल्ह्यातली दतान व केशवा ही लहानशी खेडी निवडली. केशवा गावातले एक झोपडी-वजा घर त्याच्या दृष्टीस पडताच त्याना वाटले की, प्रेमचंदानी हे घर पाहिल्यावरच आपली कथा लिहिली असावी. लगेच त्यांनी चारी बाजूनी त्या घराची रेखाचित्रं काढली व चित्रपटातील दुखिया चांभाराचे घर म्हणून ती जागा निश्चित केली. 'पाथेर पांचाली 'त एक-दोन नावं वगळता बाकीची कामं करणारी मंडळी साधी, अभिनयाचा कुठलाही अनुभव नसलेली माणसं, मुलं-मुली होत्या. 'सद्‌गती 'तही ओम पुरी, मोहन आगाशे, स्मिता पाटील व गीता सिद्धार्थ सोडल्यास इतर सर्व यापूर्वी कॅमेऱ्यासमोर न आलेलीच मंडळी आहेत. दुखियाच्या मुलीचे काम ऋचा मिश्र व ब्राह्मणाच्या मुलाचे काम सलिल दिवान या मुलानी केले आहे. गोंडच्या कामासाठी मध्यप्रदेशातल्याच राजनांदगावच्या भैय्यालाल हेडाऊला सत्य-जित रेंनी घेतले. त्याला पाहिल्यावरच रे 'यूरेका 'च्या आविर्भावात ओरडले होते, 'आय हॅव फाउन्ड हिम!' भैय्यालालच्या आवाजाने रे विशेष प्रभावित झाले होते. भैय्यालाल आदिवासी गोंड तर वाटतातच; पण त्यांचा आवाजही सरळ पोटातून आल्या-सारखा धीरगंभीर आहे. चित्रपटातील इतर कलाकार शेफाली शुक्ल, रंजना भट्ट, आनंद चौबे, केसरी वाजपेयी याचाही हा पहिलाच चित्रपट आहे.

'पाथेर पांचाली' चित्रपटात कोणी 'नायक' नव्हता. त्यातील प्रमुख पात्र हरिहर राय एक अभिशप्त अ-नायक, 'अँण्टी हीरो' होता. 'सद्‌गती' तील दुखिया चांभार हाही अ-नायक, 'अँण्टी हीरो' च आहे. या दोन्ही अ-नायकांमध्ये नियतीगत एकरूपता असली तरी त्याची परिस्थिती, संघर्ष वेगवेगळे आहेत. हरिहर राय कर्जातून सुटका व आपली मुलगी दुर्गाच्या विवाहाचे स्वप्न पहातो. ते स्वप्न प्रत्यक्षात कधी येतच नाही. शेवटी दुर्गा मरण पावते व हरिहरच्या कुटुंबाला गाव सोडून जावे लागते. 'पाथेर पाचाली' तला हरिहर रायचे दुःख हे व्यक्तिगत पातळीवर व्यक्त होते. याउलट 'सद्‌गती' तल्या दुखिया चाभाराचा संघर्ष हा त्याच्या एकट्याचा न रहाता समुदायाचा, शोषित समाजाचा संघर्ष होतो. तेव्हा 'पाथेर पाचाली' ते 'सद्‌गती' हा रेंचा प्रवास हा 'व्यक्ती' कडून 'समुदाया'-पर्यंतचा वैचारिक प्रवास आहे असे म्हणता येते. दोन्ही चित्रपटात 'मृत्यू' चे समान तत्त्व ('कॉमन फॅक्टर') आढळते व 'मृत्यू' चे हे प्रतीक दोन्ही अ-नायकांना नियतीच्या एकाच स्तरावर घेऊन जाते. अंतर असेल तर इतकेच की, 'सद्‌गती' त दुखिया चाभाराच्या नियती-गत मृत्यूला रे सामाजिक अंतर्विरोधाच्या पार्श्वभूमीची जोड देतात व म्हणूनच मृत्यू-नंतर ही दुखिया चांभाराची अदृश्य उपस्थिती शेवटपर्यंत कायम रहाते व चित्रपट संपल्या-वरही मनात घोटाळत रहाते.

दुखियाच्या मृत्यूनंतर गोंड वस्तीतल्या दलिताना एकत्र करतो व अत्याचारांविरुद्ध संघटित व्हायला सांगतो. पन्नास-साठ वर्षां-पूर्वी प्रेमचंदांनी भविष्यातील दलित-दलितेतर संघर्षाची कल्पना केली होती. चित्रपटाच्या अखेरच्या दृश्यातली दुखिया फोडत असलेल्या लाकडाच्या बुंध्यावरची अडकून बसलेली आडवी कुऱ्हाड, हा संघर्ष पुढेही चालू रहा-णार आहे हेच सुचवते.

चित्रपटातील दुखियाच्या गावात रावणाची मूर्ती काही दृश्यामध्ये ठळकपणे दिसते. चित्रपटाच्या चित्रीकरणाच्या वेळी रेंना ही मूर्ती गावाच्या मध्यभागी उभी केलेली दिसली. चौकशी केल्यावर त्यांना कळले की, दरवर्षी त्याच जागी दसऱ्याच्या दिवशी रावणाच्या प्रतिमेचे दहन केले जाते. ही मूर्ती मात्र कायम उभी असते. त्या जागेचेही 'रावणभाटा' असे नाव पडले आहे. रेंनी चित्र-पटासाठी त्या मूर्तीचा उपयोग करून घ्यायचे ठरवले व अधमवृत्तीच्या प्रतीकाच्या स्वरूपात त्यानी तिचा चित्रपटभर वापर केला. चित्र-पटात रावणाची ही मूर्ती ब्राह्मणाच्या घरा-बाहेरच्या जागेत उभी असलेली दिसते. उच्चवर्णीयांमधील राक्षसी प्रवृत्तीचेच जणू प्रतीक.

आणखी एका प्रतीकाचा उत्कृष्ट वापर रेंनी चित्रपटात केला आहे. चित्रिकरणाच्या वेळी ते गावातल्या गायीगुरांना सकाळी गावाबाहेर चरायला जाताना व सायंकाळी परतताना पहायचे. सकाळ व संध्याकाळच्या प्रतीकासाठी या गायीगुराचा उपयोग करून घेण्याची कल्पना त्यांना सुचली व ती कथेतही नेमकी बसणारी होती. कारण हे कथानकच सकाळ ते संध्याकाळ या अवधीतलं आहे. दुखिया सकाळी आपल्या घरातून निघतो त्या वेळी गावातली गुरं जंगलाच्या दिशेने जाताना दिसतात. संध्याकाळच्या अस्फुट प्रकाशात दुखियाच्या मृत्यूची खबर जेव्हा त्याच्या बायकोला मिळते तेव्हा गुरं घराकडे परतत असतात. मागून गायीगुराचा कळप येतो आहे याची जाणीवही दुःखात बुडालेल्या व धाय मोकलून रडणाऱ्या दुखियाच्या बाय-कोला नसते! ती रस्त्यातच कोसळते. गुरांच्या कळपातच सापडते. चित्रपटातील हे एक मार्मिक दृश्य आहे.

दुखिया चांभाराचे प्रेत बेवारशासारखं कोसळत्या पावसात ब्राह्मणाच्या घरासमोर पडलेलं असतं. त्याची बायको येते व नव-ऱ्याच्या प्रेतावर रडत-रडत, बेशुद्ध होऊन पडते. चित्रपटातील या प्रसंगात स्मिता पाटीलने अभिनयसामर्थ्याची साक्ष दिली आहे!

सत्यजित रेंवर असा एक आरोप केला जातो—हल्लीच नर्गिसने केला होता—की, 'ते त्याच्या चित्रपटामधून भारतातील दारिद्र्या-चेच तेवढे चित्रण करतात.' यावर रेंचं म्हणणं असं की, 'आय विश, आय कुड मेक मोअर फिल्मस् अबाउट पॉवर्टी.' भारतातील दारि-द्र्याचा, विषमतेचा, शोषणाचा प्रश्न इतका उग्र आहे की, रेनी कितीही चित्रपट त्यावर काढले तरी ते कमीच ठरतील! दुसरे असे की, 'पाथेर पांचाली' सारख्या किंवा 'अशानि संकेत' सारख्या चित्रपटातून त्यांनी भारतातील दारिद्र्याचा प्रश्न माडला असला तरी त्यांचा आजवरचा चित्रपट-प्रवास पाहिला तर असे दिसते की, त्यानी इतरही अनेक विषयांवर चित्रपट काढले आहेत. इतकेच नव्हे तर 'फॅन्टेसी,' 'कॉमेडी' सारखे प्रकारही हाता-ळले आहेत. संगीतप्रधान चित्रपटाचीही निर्मिती केली आहे. रेंचे वैशिष्ट्य हे की, त्यानी भारतीय समाजातील वास्तवाचेच चित्रण केले नाही तर माणसा-माणसामधील संबंधाचा, नात्याचा शोध घेण्याचाही प्रयत्न त्यांनी केला आहे. 'सद्‌गती'त ही मानवी संबंधाचा शोध घेताना रे दिसतात. त्यामुळेच वर्गावर्गातील संघर्षाबरोबरच मानवी संबंधा-मधील पापुद्रही ते हळुवारपणे उलगडून दाखवतात.

'सद्‌गती' द्वारे रेंनी दूरदर्शन-चित्र-पटांची सुरेख सुरुवात करून दिली आहे. तिला परंपरा निर्माण करून देण्याची जबाब-दारी आता दूरदर्शनची आहे. सत्यजित रें सारख्या प्रतिभावंताच्या सहाय्याने दूरदर्श-नला हे सहज करता येण्यासारखे आहे. □

चित्रपट

# ये नजदीकियाँ

एखादा विषय पब्लिकला अपील झाला तर त्याचा किती कीस काढायचा याचं कोष्टक आपल्यासारख्या सामान्य माणसाला जमत नाही हेच खरं! एखादा पदार्थ आवडल्यानंतर अगदी ओ येईपर्यंत खाण्यातलाच हा प्रकार! विवाहबाह्य संबंधावर आधारित विनोद पांडे यांचा 'ये नजदीकियाँ' हा असाच एक फॉर्म्युला–चित्रपट. आता विवाहबाह्य संबंध हा विषय सिनेसृष्टीला नवीन नाही. कारण अमिताभ–रेखा, संजय खान– झीनत अमान, धर्मेंद्र– हेमामालिनी, शत्रुघ्न सिन्हा–रिना रॉय... अशी अनेक प्रेमप्रेकरणं या विषयाची जिती–जागती उदाहरणं आणि 'पती, पत्नी और वो', 'तुम्हारे बीना', 'गृहप्रवेश', 'एक बार फिर' वगैरे चित्रपटात हाच विषय वेगवेगळ्या प्रकारानी हाताळलेला! 'ये नजदीकियाँ' ही त्याच माळेत बसणारा विनोद पांडे यांचा दुसरा चित्रपट. 'एक बार फिर' चं कौतुक होताच यशस्वी चित्रपटाची नाडी आपण बरोबर पकडली, अशा भावनेतून काढलेला. त्यामुळेच 'ये नजदीकियाँ'चं साधं सरळ परीक्षण करायचं तर 'पुरुषप्रधान एक बार फिर' असं करायला हरकत नाही.

सुनील, शोभना, मिनू आणि एक छानसा पमेरियन कुत्रा (फॅमिली मेंबरपैकीच एक) असं हे 'हम दो, हमारे दो'च्या चौकटीतलं सुखी कुटुंब. एका जाहिरातसंस्थेत आर्ट-डिरेक्टरसारख्या उच्चपदावर असणारा सुनील, 'मल्टिडायमेन्शनल रिलेशनशिप' मध्ये विश्वास बाळगणारा आणि कर्मधर्मसंयोगाने शोभना या रिलेशनशिपच्या चौकटीत अगदी फिट बसणारी. त्यामुळं दोघांचेही स्वभाव अगदी तंतोतंत जुळतात; पण सुनील हा अ‍ॅड फिल्म्स् तयार करीत असल्यानं निरनिराळ्या चंट मॉडेल्सचा रंगीबेरंगी सहवास त्याला सतत लाभत असतो. पण तरीही घरी बायकोकडून सगळ्या प्रकारचं सुख पुरेपूर मिळत असल्यानं हा कामाव्यतिरिक्त कुणाकडेही नजर टाकत नाही. पुढे किरण येते मात्र आणि याच्या एकपत्नीव्रताला धक्का लागतो! दोघांचाही स्वत वरचा ताबा सुटतो आणि दोघंही अल्पावधीतच प्रेमात पडतात. शोभनाला याची कुणकूण लागते; पण ही आर्यपतिव्रता 'हम एक दूसरेको ओन नही बिलींग करते है' असं तत्त्वज्ञान सांगून शेजारणीला वाटेला लावते; (शेजारणीच्या भूमिकेत भारती आचरेकर दोन मिनिटातसुद्धा लक्षात राहते.) पण पुढे किरण आणि सुनीलला गळ्यात-गळे घालून शॉपिंग करताना पाहून शोभनाचे डोळे उघडतात; पण बाई भलतीच समजूतदार! नवऱ्याला ताळ्यावर आणण्यासाठी थोडे दिवस चेंज म्हणून बाहेरगावी जाते आणि तिथे आज जाऊ, उद्या जाऊ करत एकेक दिवस लांबवते. तिकडे किरण अकेलापन महसूस करायला लागते आणि सरळ सुनीलच्या इथं येऊन थडकते. सुनील खोटं सांगून किरणला भेटतो, हे शोभनाला कळतं आणि परतताना वेगळं राहण्याचा शोभनाचा निर्णय पक्का होतो. शांतपणे ती नवऱ्याला आपला निर्णय सागते. रडणं नाही की भेकणं नाही. 'अपनी अपनी Identity prove करनेका बडा अच्छा मौका किस्मतने मुझे दिया है–उसे मैं खोना नही चाहती!' असं म्हणत आपला गाशा गुंडाळते आणि एकटी राहण्याचा निश्चय करते. (हीच ती स्त्री मुक्ती!) ती गेल्यानंतर सुनील किरणला घेऊन नवा गडी नवा राज सुरू करतो. नव्या नवलाईचे चार दिवस संपल्यानंतर मग सुरू होते झक्काझक्की आणि चिडचिड! मग एक डान्सर सुनीलची कानउघडणी करते. त्यालाही जाणवायला लागतं की, किरणविषयीचं आकर्षण हे फक्त शारीरिक होतं. त्यांची मनं कधीच जुळली नव्हती. याउलट शोभना आणि तोच 'मेड फॉर ईच अदर' होते. त्यांच्या भावना एकमेकात बांधल्या गेल्या होत्या, तर किरणशी फक्त शारीरिक ओढीचा व्यवहार साधला होता. इकडे भूतकाळ विसरत शोभना रेकॉर्डस्, कॅसेटस्, पार्श्वगायक, उपसंपादक अशी चढत्या भाजणीप्रमाणे पुढे पुढे चाललेली असते, तर शोभनाला सोडल्यानंतर सुनीलला त्याची प्रेरणाच गेल्यासारखं वाटायला लागतं. शोभनाच्या आठवणींनी तो कासावीस होतो. इथं या कथेला एक वेगळाच टर्न मिळतो. कारण सुनीलची अवस्था बघून किरणला कळून चुकतं की, याच्या आयुष्यात आपल्याला स्थान नाही. ती गेली तरी त्याच्या आयुष्यात काही उणीव येणार नाही. मग एके दिवशी भल्या पहाटे उठून ती निर्णय घेते, घर सोडायचं. 'ही का ती' अशा गोंधळात सापडलेला सुनील कात्रीत हापडतो. कारण 'ही' पण जाते आणि 'ती' पण जाते. शेवटी परत जातो शोभनाकडे आणि 'मैं तुम्हारे बीना जो नही सकता' अस सागतो. शोभना समजूतदारपणाचा कळस गाठत त्याचा परत स्वीकार करते. ('एक बार फिर'मध्ये पतीला सोडून प्रियकराचा स्वीकार करणारी नायिका–हे समीकरण प्रेक्षकाच्या फारसं पसंतीला न पडल्यानं विनोद पांडे यांनी या सिनेमाचा असा गोड शेवट केला असावा.)

चित्रपटासाठी विवाहबाह्य संबंध असा खळबळजनक विषय घेतल्याने मिठ्या–बेडसीन्स यांना चित्रपटात भरपूर वाव आहे. थिएटरवर झळकणाऱ्या 'हाउस फुल'च्या बोर्डमागचं गमक मुख्यत्वेकरून हेच असलं तरी शबाना, परवीन आणि मार्क झुबेर या तिघांना विसरून चालणार नाही. आपल्या डोळ्यांनी बोलण्याचं काम करणाऱ्या शबानानं शोभनाची भूमिका त्याच सहजतेनं केली. किरण या मॉडेल गर्लच्या भूमिकेत असलेल्या परवीनच्या शरीर-सौंदर्याचा यात मॉडेलिंगच्या अनुषंगान पुरेपूर (आणि काही काही प्रसंगात नको तितका) उपयोग करून घेतला आहे. विशेष उल्लेख करावासा वाटतो तो मार्क झुबेर या नवोदित नटाचा. मूळचा भारतीय; पण इतके दिवस लंडनमध्ये राहिलेल्या या नटाचं हिंदी चित्रपटसृष्टीतलं हे पहिलं पाऊल! 'एक बार फिर'मध्ये विनोद पांडेनं न्यूयॉर्कमध्ये लहानाची मोठी झालेल्या भारतीय दीप्ती नवलला घेऊन लंडनमध्ये शूटिंग अशी त्रिस्थळी यात्रा केली होती, तर या सिनेमात लंडनच्या मार्क झुबेरला घेऊन मुंबईतच शूटिंग केलं आहे. लंडनच्या 'वेबर डग्लस अ‍ॅकॅडमी ऑफ ड्रामॅटिक आर्ट' मध्ये अभिनयाचं शिक्षण घेतलेला मार्क सिद्दिक अहमद सिद्दिकी या प्रख्यात पत्रकाराचा मुलगा. रेडिओ, टी. व्ही. यांवरील

नाटकांशिवाय 'दि सी व्हुल्ज', 'पेन्नी गोल्ड', 'दि प्रायव्हेट एन्टरप्राईझ' वगैरे अनेक इंग्लिश चित्रपटांत त्यानं काम केलं आहे, त्यामुळं या सिनेमात त्याचं नवोदितपण जाणवत नाही. प्रसन्न व्यक्तिमत्त्व आणि देखणा चेहरा यामुळं हिंदी हिरोची टिपिकल प्रतिमाही त्यानं नक्कीच बदलली आहे. अर्थात या चित्रपटातील नायक हा लग्नाला १०–१२ वर्षं उलटून गेलेला आहे आणि काहीशा प्रौढ भूमिकेतच तो योग्य वाटतो. त्यामुळं हिंदी हिरोच्या भूमिका त्याला कितपत मानवतील शंकाच आहे.

कथा, पटकथा, संवाद, निर्देशन आणि अभिनय अशा पाच आघाड्या विनोद पांडे यांनी सांभाळल्या आहेत. 'एक संवेदनशील निर्देशक' म्हणून गाजलेल्या विनोद पांडे यांची निर्देशनातील संवेदनशीलता या सिनेमात 'एक बार फिर'च्या मानाने कमी आढळते आणि ही त्रुटी त्यांनी संवादातून भरून काढली आहे. तसंच 'यहाँ से शहर देखो' नंतर या सिनेमातील छायाचित्रणानं आपली योग्यता सिद्ध करणारा छायाचित्रकार नदीम खान ही आणखी एक जमेची बाजू.

संगीतकार रघुनाथ सेठ यांनी संगीताच्या बाबतीत फारशी भरीव कामगिरी केली आहे असं म्हणता येणार नाही; पण त्यातल्या त्यात 'एक दौर वो भी था' हे खास कैफी आझमी 'टच' असलेलं गाणं आणि 'कितनी हसीन है ये नजदीकियाँ' हे टायटल साँग उल्लेखनीय; पण या सिनेमाच्या संगीतावरही 'एक बार फिर'च्या संगीताची सावली जबरदस्त जाणवते. *

# खास बात

आप जैसा कोई' वाला बिड्डू निर्माण करीत असलेल्या 'स्टार'ची अवस्था परत बिकट झाली आहे. या चित्रपटाची घोषणा केली तेव्हा त्यात कुमार गौरव आणि रती अग्निहोत्री यांच्याबरोबर विनोद खन्नाचं नाव झळकत होतं; पण रजनीश–प्रकरणापासून विनोद खन्ना जो अमेरिकेला गायब झाला तो परतलाच नाही ! त्यामुळे त्याने विनोदऐवजी राज बब्बरला घेण्याचं ठरवलं व त्याप्रमाणे राज बब्बरनं ती भूमिका स्वीकारली; पण जेव्हा त्याला कळलं की, ही भूमिका कुमारगौरवच्या मोठ्या भावाची आहे, तेव्हा चित्रपटसृष्टीतलं स्वतःचं डळमळीत स्थान पाहता ही भूमिका स्वीकारणं धोक्याचं आहे, या विचारानं राज बब्बरही बिड्डूच्या हातावर तुरी देऊन पळाला ! शेवटी बिड्डूने राजकिरणकडे धाव घेतली. जेमतेम एखाददुसरी भूमिका हातात असलेल्या राजकिरणने मोठा तर मोठा भाऊ म्हणून ती स्वीकारली. शूटिंगही धुमधडाक्यात सुरू झालं; पण आता बिड्डू आणि राजकिरणमध्येही मतभेद निर्माण झाल्याने राजकिरणनेही ही भूमिका सोडून दिली आहे. त्यामुळे बिड्डू आता परत नव्या नटाच्या शोधात फिरतो आहे.
¤

युसुफमियाँ आणि असमा खान यांच्या शादीची बातमी आता शिळी झाली; पण या गुपचूप शादीचं पितळ उघडं पडल्यापासून दिलीपकुमार अतिशय नाराज झाला आहे. कारण लग्नाच्या वेळेस त्या दोघांनीही ही बातमी लपवून ठेवण्याची शपथ घेतली होती. त्यामुळे ही बातमी पसरली तेव्हा दिलीपकुमारनं कानावर हात ठेवले; पण निकाहनामाच जेव्हा प्रेसवाल्यांच्या हातात पडला तेव्हा सत्य खुलं करण्यावाचून त्याला गत्यंतरच नव्हतं. दिलीपकुमारच्या नाराजीचं मुख्य कारण म्हणजे हा निकाहनामा असमाच्या कुटुंबियांकडे होता आणि तोच नेमका प्रेसवाल्याच्या हातात पडल्यानं दिलीपकुमार नाराज झाला. तसंच असमाचा पहिला घटस्फोटही कैक वर्षांपूर्वी झालेला असून त्याही बाबतीत तिनं आपल्याला खोटं सांगितल्याचा दावा करून युसुफमियाँ असमाला घटस्फोट द्यायला निघाले होते. त्यामुळं 'आयदर यू ऑर मी' असं ठणकावून सांगणाऱ्या सायराला ही बातमी कळताच कोण आनंद झाला ! पण दिलीपच्या घरवाल्यानी मात्र त्याला असं काही करू दिलं नाही. आता दिलीपनं असमाची अवस्था अक्षरशः नजरबंद्यासारखी केली आहे. तो स्वतः तर तिला भेटत नाहीच; पण लोकांनाही तिला भेटू देत नाही. एवढंच नाही तर त्याच्या परवानगीशिवाय ती कुठेही जाऊ शकत नाही, त्यामुळं तिची अवस्था 'आगीतून सुटून फुफाट्यात' अशी झाली आहे.
¤

रिचर्ड अॅटेन्बरो तयार करीत असलेला 'गांधी' सिनेमा आधी बऱ्याच कारणांवरून वादग्रस्त ठरला आहे. त्यात आता मोरारजीभाई देसाईंनी नवी भर घातली आहे. त्यांच्या मते गांधीच्या संपूर्ण आयुष्यावर एका विदेशी माणसानं सिनेमा तयार करावा ही कितीही कौतुकाची गोष्ट असली तरी या सिनेमात भारतीय इतिहासातील अनेक घटनांची विल्हेवाट लावण्यात आली आहे आणि या गोष्टीचा आपण गंभीरपणे विचार केला पाहिजे. अंधश्रद्धेच्या नावाखाली 'आक्रोश' सारख्या चित्रपटाला परवानगी नाकारणाऱ्या माहिती आणि नभोवाणी मंत्र्यांनी या गोष्टीची दखल घेतलेली दिसत नाही. कारण ही गोष्ट अंधश्रद्धेपेक्षाही भयानक आहे ! या चित्रपटासाठी एन. एफ. डी. सी. ने थोडेथोडके नाहीत तर बारा करोड रुपये खर्च केले आहेत आणि त्या बदल्यात आपण आपल्याच इतिहासातील चुकीचा संदर्भ परदेशामध्ये मांडावा, हे मान्य नसल्याने त्यांनी आंदोलन सुरू केलं असून या चित्रपटातील असे प्रसंग जोपर्यंत कट केले जात नाहीत, तोपर्यंत गांधी चित्रपटाविरुद्धचं आंदोलन मागं घेतलं जाणार नाही, असाही मोरारजीभाईंनी इशारा दिला आहे !
¤

'ये वादा रहा' या चित्रपटात ऋषीकपूर, पूनम धिल्लों आणि टीना मुनीम यांच्या प्रमुख भूमिका आहेत. पूनम धिल्लोंचा अपघात झाल्यामुळे तिच्या चेहऱ्यावर प्लॅस्टीक सर्जरी केली जाते व यात तिचा चेहरा बदलतो व ती टीना मुनीमसारखी दिसायला लागते. ही कथाकल्पना घेऊन दिग्दर्शकाने जरा नावीन्य हाताळण्याचा प्रयत्न केला आहे; पण त्याच्यापुढे एक वेगळाच प्रश्न नंतर उभा राहयला. कारण चेहरा बदलला असला तरी आवाजात काही फरक पडत नाही आणि त्यामुळं डबिंग कुणाच्या तरी एकीच्याच आवाजात करणं भाग होतं; पण पूनमच्या आवाजात डबिंग करावं तर टीनाला राग आला असता आणि टीनाच्या आवाजात डबिंग करावं तर पूनमनं थैमान केलं असतं. शेवटी या दोघींचेही आवाज न घेता सगळं डबिंग जया बच्चनच्या आवाजात केलं गेलं.

–शुभदा रानडे